दैनिक
समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ७ वे अंक –७४ शुक्रवार दि.२० नोव्हेंबर २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-7th Issue- 74 Friday, Dt.20 November 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

पालकसचिव जिल्ह्यांमधील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेणार

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश
चार तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यास मान्यता

मुंबई ।प्रतिनिधी

राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करून आवश्यक उपाययोजनांना गती देण्यासाठी पालकसचिवांनी अधिवेशनापूर्वी राज्यातील सर्व जिल्ह्यांना भेट देऊन दुष्काळाच्या सर्व निकषांनुसार परिस्थितीचा सविस्तर आढावा घेऊन त्याबाबतचा अहवाल मुख्य सचिवांकडे सादर करावा, असे निर्देश महसूल मंत्री तथा दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

चिपळूण, दिंडोरी, वाडा आणि विक्रमगड या चार तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यास मान्यता बैठकीत मान्यता देण्यात आली असून, दुष्काळाची मागणी होत असलेल्या हातकणंगले, गडहिंग्लज, कागल, करवीर यासह अन्य तालुक्यांचे निकषांनुसार संपूर्ण सर्वेक्षण करून पुढील बैठकीत अहवाल सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.महसूल मंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाच्या दुष्काळ उपसमितीची बैठक मंत्रालयात झाली. या बैठकीस कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मदत व पुनर्वसन विभागाच्या अपर मुख्य सचिव विनिता वेद सिंघल आदी उपस्थित होते.

धाराशिव या आकांक्षित जिल्ह्यात केवळ ५.३४ टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याने तेथे विशेष उपाययोजना करण्याची आवश्यकता असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले. यासाठी विशेष बैठक घेऊन पुढील आठ ते दहा महिन्यांचे पाणी नियोजन करण्याची सूचना त्यांनी केली.

जिल्हा नियोजन समितीकडे (डीपीसी) निधी उपलब्ध असल्यास जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानिक गरजेनुसार पाणीटंचाई निवारणाच्या कामांबाबत निर्णय घ्यावेत.

नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना लाभ देण्याबाबत कृषीमंत्री भरणे यांनी विचार करण्याची मागणी केली. यावर १ एप्रिल २०२७ नंतर प्रोत्साहन निधी दिला जाणार असल्याची माहिती देण्यात आली. पाणीटंचाई निवारणासाठी जिल्हास्तरावर उपलब्ध साधनसंपत्तीचा प्रभावी वापर करावा. तसेच शहरी भागातील खासगी मालकीच्या विहिरींचा व्यावसायिक वापर करण्याऐवजी अशा विहिरी महानगरपालिकांच्या ताब्यात देण्याबाबत विचार करणे आवश्यक असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी बैठकीत नमूद केले.

दुष्काळी परिस्थितीवरील उपाययोजनांचा समन्वय आणि प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती स्थापन करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली.

यावेळी बैठकीस वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, पाणीपुरवठा विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन-नैनुटिया, जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, पशुसंवर्धन विभागाचे सचिव एन. रामास्वामी, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, ग्रामविकास विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार आणि जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर आदी उपस्थित होते.

जलसंधारणासाठी पाच हजार कोटींच्या आराखड्याचे पुनर्नियोजन...

दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन मृद व जलसंधारण विभागाचा यापूर्वी मंजूर करण्यात आलेला पाच हजार कोटी रुपयांचा नियोजन आराखडा रद्द करून नव्याने आराखडा तयार करण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. या नवीन आराखड्यात विदर्भ आणि मराठवाड्यासह भीषण दुष्काळी परिस्थिती असलेल्या तालुक्यांना प्राधान्य देण्यात यावे. यासाठी पुढील एक-दोन महिन्यांत कार्यपद्धती (एसओपी) निश्चित करावी, असे निर्देश बावनकुळे यांनी दिले.
शिरपूर पॅटर्नप्रमाणे राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जलसंधारणाची कामे हाती घ्यावीत. यामुळे भूजल पातळीत वाढ होण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले. जलसंधारण आणि जलसंपदा विभागाच्या यांत्रिकी विभागातील यंत्रसामग्री कार्यान्वित करून तलावांमधील गाळ काढण्याची कामे सुरू करावीत. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक अधिकार द्यावेत. गाव तलाव आणि साठवण तलावांच्या कामांना ग्रामविकास विभागाने प्राधान्य द्यावे, अशा सूचनाही देण्यात आल्या.

पाणीटंचाईच्या उपाययोजनांना प्राधान्य

पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर करण्यात येणाऱ्या दहा उपाययोजनांबाबत येत्या एक-दोन दिवसांत शासन निर्णय जारी करण्यात येणार आहे. जलजीवन मिशनअंतर्गत योजना पूर्ण झाल्यास ज्या गावांमध्ये टँकरची आवश्यकता भासणार नाही, अशा १३ तालुक्यांतील २१२ योजनांच्या कामांसाठी वित्त विभागाने ८३.१८ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. तसेच रेट्रोफिटिंगसाठी ४०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. पाणीटंचाईच्या कामांसाठी यापूर्वीची ३४९ कोटी रुपयांची थकबाकी पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध होणार असून हा निधी डिसेंबरअखेरपर्यंत मिळेल, अशी माहिती यावेळी देण्यात आली. रिचार्ज शाफ्टच्या कामांसाठी एजन्सींची संख्या वाढविण्याची आवश्यकता असून, या कामांची दर्जात्मक मानके निश्चित करावीत. त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक अधिकार द्यावेत, अशा सूचना मंत्री बावनकुळे यांनी यावेळी केल्या.

चारा उपलब्धतेसाठी मका, ज्वारी लागवडीवर भर..

पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी व्ही.बी.-जी. राम जी योजनेंतर्गत मका आणि ज्वारी या चारा पिकांची लागवड करण्याबाबत जिल्हास्तरीय यंत्रणांना कळविण्यात आले आहे. तलावांच्या बाजूला चारा लागवड करण्याबाबतही आदेश जारी करण्यात आले आहेत. पाणीटंचाई निवारणासाठी स्वयंसेवी संस्था कार्यरत असल्यास त्यांच्यासोबत जिल्हास्तरावर करार करून कामे करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

कोल्हापुरातील बाहुबली आणि कुंथुगिरी तीर्थक्षेत्रांच्या विकासाला गती देण्यात येणार

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीच्या बैठकीत तीर्थक्षेत्र विकास आराखड्याला प्रशासकीय मान्यता

मुंबई ।प्रतिनिधी

कोल्हापूर जिल्ह्यातील महत्वाची श्रद्धास्थाने असलेल्या श्री क्षेत्र बाहुबली आणि श्री क्षेत्र कुंथुगिरी तीर्थक्षेत्रांच्या सर्वांगीण विकास आराखड्याला मान्यता देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीच्या बैठकीत या दोन्ही तीर्थक्षेत्रांच्या विकास आराखड्यातील एकूण १८ कोटी २० लाख ६४ हजार रुपयांच्या प्रस्तावित कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली.



विधान भवन येथील कॅबिनेट हॉल येथे झालेल्या बैठकीला नगरविकास राज्यमंत्री तथा कोल्हापूरच्या पालकमंत्री माधुरी मिसाळ, आमदार डॉ. अशोकराव माने, माजी आमदार प्रकाश आवाडे, वित्त विभागाचे प्रधान सचिव विजय वाघमारे, ग्रामविकास विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार उपस्थित होते. तसेच दूरदृश्यप्रणालीद्वारे पुणे विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी विजय राठोड आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जसमिन सहभागी झाल्या होत्या.

कोल्हापूर जिल्ह्यातील मौजे कसबा कुंभोज येथील श्री क्षेत्र बाहुबलीच्या विकासासाठी ९ कोटी रुपयांच्या आराखड्यातील कामांना मंजुरी देण्यात आली. यामध्ये तीर्थक्षेत्र परिसरात पाथवे तयार करणे, शाळेच्या प्रांगणात पेव्हिंग ब्लॉक बसविणे व काँक्रिटीकरण करणे, भाविकांसाठी बसण्याकरिता बाकडयांची व्यवस्था करणे, प्रशासकीय कार्यालयासमोर पेव्हिंग ब्लॉक बसविणे, अंतर्गत रस्त्यांच्या बाजूने सोलर स्ट्रीट लाईट उभारणे आदी कामांचा समावेश आहे.तसेच माईन कुंडी ते मुख्य मंदिराला जोडणाऱ्या अंतर्गत सिमेंट काँक्रिट रस्त्याचे बांधकामही करण्यात येणार आहे. या सुविधांमुळे तीर्थक्षेत्र परिसरातील अंतर्गत वाहतूक आणि भाविकांची ये-जा अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे.

हातकणंगले तालुक्यातील मौजे आळते येथील श्री क्षेत्र कुंथुगिरी तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी ९ कोटी २० लाख ६४ हजार रुपयांच्या कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये मंदिरासमोर पेव्हिंग ब्लॉक बसविणे, अंतर्गत रस्त्यांचे काँक्रिटीकरण, वाहनतळाचे काँक्रिटीकरण, उर्वरित संरक्षण भिंतीचे बांधकाम आदी कामे करण्यात येणार आहेत.

राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ७ ते १८ डिसेंबरदरम्यान नागपूर येथे

विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत निर्णय

मुंबई ।प्रतिनिधी

महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सोमवार, ७ डिसेंबर ते शुक्रवार, १८ डिसेंबर २०२६ या कालावधीत नागपूर येथे आयोजित करण्यात येणार आहे. विधानभवन येथे आयोजित विधानसभा आणि विधानपरिषदेच्या विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात आला.

या बैठकीला विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानपरिषदेचे उपसभापती सचिन अहिर, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, उच्च व तंत्रशिक्षण तथा संसदीय कार्यमंत्री चंद्रकांतदादा पाटील, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, विधानसभा सदस्य सुधीर मुनगंटीवार, दीपक केसरकर, नाना पटोले, विजय वडेट्टीवार जितेंद्र आव्हाड, सुनील प्रभू, अमीन पटेल, विधानपरिषद सदस्य अनिल परब, विक्रम काळे, सतेज पाटील, प्रवीण दरेकर आणि विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत आगामी हिवाळी अधिवेशनाच्या कालावधीबाबत सविस्तर चर्चा करून ७ ते १८ डिसेंबर २०२६ या कालावधीत अधिवेशन आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच दोन आठवड्यांच्या विधिमंडळ कामकाजाच्या नियोजनाचा आढावा घेऊन त्याबाबतही सविस्तर चर्चा करण्यात आली.

बीड सी.ई.ओ. घाटनांदुर येथील सोमेश्वर शिक्षण संस्थेच्या अनागोंदी कारभाराची स्वत: चौकशी करणार....?

काही निवडक नामांकित शिक्षणसंस्था सोडल्या तर बहुतांशी संस्था असाच गैरमार्गानेच पैसा कमावण्यात गुंतल्याने शिक्षणाचा काळाबाजार आणि घोडेबाजार एकत्रितच नांदतो आहे हे कुठेतरी थांबायला हवं ना.... ?

महायुतीचे सरकार ज्येष्ठ नागरिकांची आवेहलना कदापी सहन करणार नाही. अशी वल्गना करणारे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री आणि आपल्या खात्याची जबाबदारी म्हणून खुद्द शिक्षणमंत्री या प्रकरणात लक्ष घालणार का..... ??

घाटनांदुर येथील सोमेश्वर शिक्षण संस्थेने बेकायदेशीर रित्या सरकारी गायरानात शाळेच्या इमारतीचे प्रत्यक्ष बांधकाम केले असून, या संस्थेला ज्या गटामध्ये विठ्ठल जाधव यांनी जमीन दान दिली होती. त्या गटात इमारत न बांधता इमारत त्याच गटात आहे असे दर्शवून लाखो रुपयांचे इमारत भाडे, निरनिराळे अनुदान आजपर्यंत उचलण्याचे काम या शिक्षण संस्थेने केले असून आजतागायत बोगस जागेत इमारत असून शाळेची इमारत दान दिलेल्या जागेतच असल्याचे दाखवून शासनाला करोडो रुपयांना चुना लावणाऱ्या या संस्थेचे भिंग फोडण्याचे काम तक्रारदार विठ्ठल जाधव यांनी शासन दरबारी विविध कार्यालयात तक्रार अर्ज दाखल करून केले आहे.

गेल्या अनेक वर्षापासून सातत्याने अंबाजोगाई गटशिक्षणाधिकारी कार्यालय, बीड जिल्हाधिकारी कार्यालय, विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर कार्यालयात खेटे मारून मारून ते पुरते दमले आहेत. तरीही शासनाला व प्रशासनातील अधिकाऱ्यांना एक बूद (थेंब) भरही घाम फुटलेला नाही. आपले थकलेले शरीर, हाताश मन, जीवनातील नैराश्य सारकाही बाजूला ठेवून आज वयाच्या ८० व्या वर्षी सुद्धा हे सदग्रस्थ अर्थात ज्येष्ठ नागरिक आपल्या दुखावलेल्या भावनेसाठी आणि शासनाच्या करोडो रुपयांच्या झालेल्या फसवणुकीसाठी शासकीय कार्यालयांसह माननीय हायकोर्टाच्या चकरा मारत आहेत.

परंतु बीड जिल्ह्याच्या बाबतीत आता एक नवीनच पायंडा अलीकडच्या काळात पडला असून तो मोडून काढण्याचे काम कुठलाही अधिकारी करण्याच्या मानसिकतेत दिसून येत नाही. बीड जिल्ह्यात अगदी कसब पणाला लावून तुम्ही कोणत्याही सरकारी कार्यालयातील भ्रष्टाचार उघडा केला. त्या संबंधित अगदी ठोस पुरावे जरीकरिता दिले. तरीही कारवाई मात्र शून्य होते. नेमके या अधिकाऱ्याचे हात खूप लांब आहेत की, शासनाला केवळ भंपकबाजी करून लोकांना मूर्खात काढायच आहे आणि कुठल्याच प्रकरणाचा छंडा लावायचा नाही...? हे कळायला मार्गच नाही.

ज्येष्ठ नागरिक चक्क वय वर्ष ८० असलेले निराधार तक्रारदार विठ्ठल जाधव यांचा आत्मविश्वास पाहून तरी मायबाप शासनाला, नाहीतर नामदार मुख्यमंत्री दोन्ही उपमुख्यमंत्री आणि शिक्षणमंत्री यांना तरी पान्हा फुटेल का....? महायुतीचे सरकार ज्येष्ठ नागरिकांचे अवहेलना होऊ देणार नाही या घोषणेची तंतोतंत अंमलबजावणी विठ्ठलराव जाधव यांच्या बाबतीत होणार का.....?? असे एक ना अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहेत. कमीत कमी त्यांच्या वयाची आणि त्यांच्या हिमतीची दखल घेऊन त्यांच्या तक्रारीला दाद देता येईल का...? बीड जिल्ह्यामध्ये रुजू झाल्यापासून अगदी नौकरीच्या पहिल्या दिवसापासून बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष सीईओ, जिल्हाधिकारी म्हणून ओळख निर्माण केलेल्या जतीन रहमान आणि विवेक जॉन्सन या दोन प्रमुख अधिकाऱ्यांना तरी तक्रारदाराच वय पाहता आपणही कधीतरी त्या वयात जाणार आहोत. आपल्या घरात आपलेही आई-वडील इतर नातेवाईक म्हातारे (ज्येष्ठ नागरिक) आहेत. शिवाय समाजात भोवताली आपल्या आजूबाजूला हजारो जेष्ठ नागरिक आहेत. याचे भान राखून तरी विठ्ठल जाधव यांना न्याय मिळेल का नाही....? याकडे आता संपूर्ण बीड जिल्ह्याचे तर लक्ष लागून आहेच. परंतु मनाने खूप संवेदनशील-हळवे म्हणून घेणारे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि संकटात अडकलेल्या कुणाचीही तात्काळ दखल घेणारे म्हणून राज्यभर स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केलेले माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे यांच्यासह एक मन दुखावलेल्या उपमुख्यमंत्री श्रीमती. सुनेत्रा पवार आणि राज्याचे शिक्षणमंत्री यांच्या भूमिकेकडे मात्र जास्तीचे लक्ष लागून आहे...!





(अंबाजोगाई/सुनील सीरसाट)
अंबाजोगाई पासून थोड्या अंतरावर असणाऱ्या घाटनांदुर येथील सोमेश्वर शिक्षण संस्थेच्या इमारतीसाठी जागा दान घेतली. जागा घेतली खरी परंतु शाळेची इमारत दुसऱ्याच ठिकाणी बांधली असल्याचा आरोप करत विठ्ठल तुकाराम जाधव यांनी जिल्हा व विभागीय शासन दरबारी आणि मा. हायकोर्टात दाद मागितली आहे.

संपादकीय....

संशयाची सुई

अजित पवार यांच्या विमान अपघाताला साडेनऊ महिने उलटूनही तपासात ठोस माहिती समोर आलेली नाही. विमान कंपनी व्हीएसआरचे प्रमुख व्ही. के. सिंग आणि त्यांचे पुत्र रोहित सिंग यांच्याशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे जवळचे संबंध असल्याने ते कंपनीला वाचवत असल्याचा आरोप आमदार रोहित पवार यांनी केला.'व्हीएसआरला वाचवणारा मफलर मॅन म्हणजे देवेंद्र फडणवीस' अशी टीकाही त्यांनी केली. जयपूरमध्ये नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या रोहित सिंग याच्या विवाह सोहळ्याला फडणवीस उपस्थित होते. त्यामुळे रोहित पवार यांची संशयाची सुई फडणवीसांच्या दिशेने फिरू लागल्याचे दिसते. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणात व्हीएसआर विमान कंपनी आणि मालक व्ही. के. सिंग यांना वाचवणारा 'मफलर मॅन' म्हणजे मुख्यमंत्री फडणवीस हेच आहेत, असे जाहीर करत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार आणि अजितदादांचे पुतणे रोहित पवार यांनी सोमवारी खळबळ उडवून दिली.

मफलर घातलेला फोटो दाखवतानाच, फडणवीस यांचा या अपघातात हात आहे असे मी म्हणत नाही, असेही रोहित पवार म्हणाले. असे असले तरी या प्रकरणात थेट फडणवीसांनाच ओढल्यामुळे एकच खळबळ उडाली. अजित पवार यांच्या अपघाती निधनासंबंधातील संभ्रम त्यांच्या मृत्यूनंतर सुमारे दहा महिन्यांनंतरही कायम आहे. हा विषय रोहित पवार यांनी अत्यंत आक्रमकपणे लावून धरला आहे. या अपघातासंदर्भातील काही महत्त्वाचे मुद्दे त्यांनी यापूर्वीच मांडले असून, हा अपघात नसून घातपातच आहे असा निष्कर्ष त्यावेळीच काढला होता. जर तो घातपात असेल तर तो घडवला कोणी हा यातला मुख्य मुद्दा आहे.

त्यामुळे त्या अनुषंगाने रोहित पवार नव्याने काय माहिती देतात याविषयी उत्सुकता होती. रोहित पवार यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेऊन थेट मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दिशेने संशयाची सुई फिरवली आहे. रोहित पवार यांची पत्रकार परिषद होण्याआधी मुंबईत आणि पुण्यात काही ठिकाणी एका 'मफलर मॅन'विषयी संशय व्यक्त करणारी पोस्टर्स जारी करण्यात आली होती. सस्पेन्स संपवताना रोहित पवार यांनी सनसनाटी पद्धतीने फडणवीस यांचा संशयित आरोपी व्यक्तींबरोबरचा मफलरमधला फोटो पत्रकारांना दाखवला. अजित पवार यांच्या ज्या विमानाला अपघात झाला ते विमान ज्या कंपनीच्या मालकीचे आहे त्या कंपनीच्या मालकावर रोहित पवार यांचा संशय आहे. त्या मालकाशी फडणवीस यांचे व्यक्तिगत संबंध असल्याचे आरोप त्यांनी पत्रकार परिषदेत केले. निवडणुकीचा निकाल ज्या दिवशी जाहीर होणार होता त्या दिवशी फडणवीस या आरोपीशी संबंधित एका लग्न समारंभासाठी जयपूरला गेले होते. रोहित पवारांचे म्हणणे की, राज्याच्या निवडणुकांची धुरा ज्या व्यक्तीच्या खांद्यावर होती ती व्यक्ती निवडणूक निकालाच्या दिवशीच असे बाहेरगावी जाण्याची शक्यता नाही, तरीही फडणवीस गेले याचा अर्थ त्यांचा या संशयिताशी खूप निकटचा संबंध आहे आणि तेच त्यांना वाचवत आहेत. रोहित पवारांनी आरोप केले त्याच दिवशी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा सुद्धा पुण्यात होते. त्यावेळी फडणवीस यांनी त्यांच्याकडे अजित पवार यांच्या अपघात चौकशीचे काम त्वरित पूर्ण व्हावे अशी मागणी केली. यातील दोषींना फासावर लटकवण्याचे मनोगतसुद्धा त्यांनी व्यक्त केले. याद्वारे फडणवीस यांनी आपल्यावरील संशयाचे मळभ दूर लोटण्याचा प्रयत्न केला आहे. असे असले तरी मूळ विषयावरून निर्माण झालेले संशयाचे धुके पूर्णपणे दूर झालेले नाही.

भारताच्या शैक्षणिक क्रांतीचे आद्यप्रवर्तक
क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले

बीड ।प्रतिनिधी

शिक्षणाने माणसाला तिसरा डोळा दिला, असे सांगणारे क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले हे आधुनिक भारतातील शैक्षणिक क्रांतीचे आद्यप्रवर्तक आहेत. शिक्षणाचे मानवी जीवनातील, विशेषतः वंचित आणि शोषित घटकांच्या जीवनातील महत्त्व त्यांनी ज्या प्रखरतेने अधोरेखित केले, तसे यापूर्वी मराठी समाजजीवनात कोणीही केले नव्हते. त्यांनी 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथातून शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना मांडलेली 'विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली' ही केवळ काव्यपंक्ती नसून एका व्यापक समाजक्रांतीचा जाहीरनामा आहे. अविद्येमुळे व्यक्तीचे, समाजाचे आणि राष्ट्राचे किती अपरिमित नुकसान होते, याची जाणीव महात्मा फुले यांना होती. शिक्षणावरील त्यांचा प्रगाढ विश्वास केवळ पुस्तकी नव्हता, तर तो त्यांच्या संपूर्ण जीवनकार्याचा, चळवळीचा आणि संघर्षाचा प्रेरणास्रोत होता. शिक्षण हे शोषणाविरुद्ध लढण्याचे सर्वांत प्रभावी शस्त्र आहे, अशी त्यांची धारणा होती. महात्मा फुले यांनी शिक्षणाचे जे बीज पेरले, त्याचा वटवृक्ष भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या कार्यातून विस्तारला. समाजाच्या प्रगतीची नाळ स्त्रियांच्या शिक्षणाशी जोडलेली आहे, असे महात्मा फुले मानत होते.

अविद्या हे अनर्थाचे मूळ कारण –

महात्मा जोतिबा फुले यांनी 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथात शिक्षणाअभावी होणाऱ्या सामाजिक अधोगतीचे अत्यंत वास्तववादी आणि भेदक चित्र रेखाटले आहे. ते लिहितात, 'विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली। नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले। वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले।' या पंक्तींमधून महात्मा फुले यांनी अज्ञानाचा भयंकर चक्रव्यूह स्पष्ट केला आहे. जेंव्हा माणसाकडे विद्या अर्थात शिक्षण नसते, तेव्हा त्याची विचार करण्याची क्षमता म्हणजेच मती कुंठित होते. मतीचा अभाव निर्माण झाला की चांगल्या-वाईटाची जाणीव करून देणारी नीती नष्ट होते. नीतीचा अभाव असला की समाजाची प्रगती अर्थात गती खुंटते. ज्या समाजाची प्रगती थांबते, त्याचे आर्थिक सामर्थ्य अर्थात वित्तही नष्ट होते. आर्थिक सामर्थ्य हरवल्यामुळे शेतकरी, कष्टकरी आणि शूद्र-अतिशूद्र समाज खचून जातो. परिणामी, हा समाज शोषणाच्या आणि गुलामगिरीच्या विळख्यात अडकतो. महात्मा फुले यांच्या मते, बहुजन समाजाच्या दारिद्र्याचे आणि गुलामगिरीचे मूळ केवळ आर्थिक नसून त्यामागे शैक्षणिक आणि मानसिक वंचितताही होती. समाजातील उच्चवर्गीयांनी बहुजनांना शिक्षणापासून वंचित ठेवून वर्षानुवर्षे अज्ञानाच्या अंधारात ठेवले. हा अज्ञानाचा अंधार दूर केल्याशिवाय माणसाला स्वतःच्या हक्कांची जाणीव होणार नाही, हे त्यांनी ओळखले होते. त्यामुळे अविद्या नष्ट करणे हे त्यांनी आपल्या जीवनकार्याचे प्रमुख ध्येय बनवले.

शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा :-

महात्मा फुले यांच्या मते, माणसाला निसर्गाने दोन डोळे दिले आहेत. त्याद्वारे तो भौतिक जग पाहू शकतो. मात्र, सृष्टीतील कार्यकारणभाव समजून घेण्यासाठी, स्वतःचे हित-अहित ओळखण्यासाठी आणि मानवी मूल्यांची जपणूक करण्यासाठी शिक्षणाच्या तिसऱ्या डोळ्याची आवश्यकता असते. हा तिसरा डोळा माणसाला विवेक देतो. अंधश्रद्धा आणि रूढी-परंपरांच्या जाचक बंधनांतून मुक्त होण्याचे सामर्थ्य देतो. शिक्षण हे केवळ अक्षरओळख किंवा उदरनिर्वाहाचे साधन नसून मानवी मुक्तीचे प्रभावी माध्यम आहे, यावर फुले यांचा दृढ विश्वास होता. ज्या काळात बहुजन समाजातील व्यक्ती आणि महिलांना शिक्षण घेण्यापासून वंचित ठेवले जात होते, त्या काळात महात्मा फुले यांनी शिक्षणाचे व्यापक आणि सार्वत्रिक महत्त्व प्रतिपादन केले. शिक्षणामुळे माणसाला आपण कोण आहोत आणि आपले शोषण कोण करीत आहे, या प्रश्नांची उत्तरे शोधता येतात. त्यामुळे शिक्षण हे शोषणाविरुद्ध लढण्याचे सर्वांत प्रभावी शस्त्र आहे, अशी त्यांची ठाम धारणा होती.


विश्वासातून आकारास आलेले क्रांतिसूर्याचे कार्य :

शिक्षणावरील याच प्रगाढ विश्वासातून महात्मा फुले यांचे संपूर्ण कार्य प्रेरित झाले होते. केवळ उपदेश करून समाजात परिवर्तन घडणार नाही, हे जाणून त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून समाजसुधारणेचे कार्य केले. स्त्रिया हा समाजाचा अर्धा भाग आहेत. त्या शिक्षणापासून वंचित राहिल्या, तर पुढील पिढीची सर्वांगीण प्रगती होणे कठीण आहे, हे जोतिबांनी ओळखले होते. म्हणूनच त्यांनी १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील बुधवार पेठेतील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू करून स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. समाजातील प्रचंड विरोध आणि अपमान सहन करूनही त्यांनी आपले कार्य थांबवले नाही. पत्नी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना शिक्षण देऊन त्यांना स्त्रीशिक्षणाच्या कार्यासाठी तयार केले. सावित्रीबाई फुले यांनी भारतातील पहिल्या महिला शिक्षिकेच्या रूपात महत्त्वपूर्ण योगदान दिले. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत, तसेच गावकुसाबाहेर ठेवण्यात आलेल्या वंचित समाजघटकांपर्यंत शिक्षण पोहोचविण्यासाठी त्यांनी विविध शाळा सुरू केल्या. यामध्ये अस्पृश्य समाजातील मुलांसाठी १८५१ मध्ये सुरू केलेल्या शाळांचा विशेष उल्लेख करावा लागेल. १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना करून या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी धार्मिक अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमतेवर प्रहार केला. बहुजन समाजातील मुला-मुलींच्या शिक्षणासाठी रात्रशाळा आणि विविध शैक्षणिक उपक्रमांनाही प्रोत्साहन दिले. महात्मा फुले यांच्या संपूर्ण कार्याला एकाच सूत्रात बांधणारा विचार म्हणजे 'शिक्षणाशिवाय मुक्ती नाही.'

हंटर कमिशनसमोर साक्ष :-

शिक्षणाबाबत महात्मा फुले यांचा दृष्टिकोन किती व्यापक आणि दूरदृष्टीचा होता, याचे महत्त्वपूर्ण उदाहरण म्हणजे १८८२ मध्ये हंटर शिक्षण आयोगासमोर त्यांनी मांडलेले विचार होय. या आयोगासमोर साक्ष देताना त्यांनी प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारावर विशेष भर दिला. सरकारने उच्चवर्गीयांच्या उच्च शिक्षणावर मोठ्या प्रमाणात खर्च करण्याऐवजी प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारासाठी अधिक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी भूमिका त्यांनी मांडली. प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे असावे, अशी मागणी त्यांनी केली. तसेच शिक्षणाचा अभ्यासक्रम केवळ पुस्तकी न ठेवता त्यामध्ये शेती, उद्योग आणि व्यावहारिक कौशल्यांचा समावेश असावा, असा आग्रह त्यांनी धरला. आज आपण ज्या व्यावसायिक आणि कौशल्याधारित शिक्षणाचा पुरस्कार करतो, त्याची पाळेमुळे महात्मा फुले यांच्या विचारांत आढळतात.

महात्मा जोतिबा फुले यांचा शिक्षणावरील प्रगाढ विश्वास केवळ एका पिढीपुरता मर्यादित नव्हता, तर त्यांनी आधुनिक भारताच्या उज्ज्वल भविष्याचा पाया रचला. एका अविद्येमुळे निर्माण होणारे अनर्थ टाळण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजपरिवर्तनासाठी समर्पित केले. आज शिक्षणामुळे बहुजन समाज, महिला आणि वंचित घटकांना सन्मानाने जगण्याच्या आणि प्रगतीच्या संधी उपलब्ध होत आहेत. महात्मा फुले यांनी दिलेला शिक्षणाचा हा तिसरा डोळा आजच्या माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात अधिक प्रगल्भ करण्याची गरज आहे. केवळ पदव्या मिळवणे म्हणजे शिक्षण नव्हे, तर त्या शिक्षणाचा समाजाला कसा लाभ होईल, याचा विचार करणेही महत्त्वाचे आहे. समाजात समता, बंधुता आणि विवेकवाद रुजवणे हेच खऱ्या शिक्षणाचे उद्दिष्ट असले पाहिजे. सर्व मानवांनी एकमेकांशी सत्याने आणि प्रेमाने वागावे, हा विचार महात्मा फुले यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म' या ग्रंथातून मांडला. मानवतेचा आणि विश्वबंधुत्वाचा संदेश देणारा हा विचार आजही तितकाच मार्गदर्शक आहे. हाच क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या जीवनकार्याचा मूलभूत संदेश आहे.



– एम. ई. तुपसमिंद्रे,
जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, बीड

ब्रिटनचे राजकुमार विल्यम यांची धर्मा प्रॉडक्शनला भेट

मुंबई, दि. १८ : ब्रिटनचे राजकुमार विल्यम यांनी अंधेरी येथील धर्मा प्रॉडक्शनला भेट दिली.राजकुमार विल्यम यांचे चित्रपट दिग्दर्शक करण जोहर यांनी स्वागत केले. यावेळी सिने अभिनेता सैफ अली खान, अभिनेत्री करीना कपूर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारकांनी हयातीचे दाखले हा जीवन प्रमाण पोर्टलवरून ऑनलाईन पद्धतीने सादर करावेत- जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष

सांगली (जि. मा. का.)

राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारक आणि कुटूंब निवृत्तीवेतनधारकांनी जीवन प्रमाण पोर्टलवरून ऑनलाईन पद्धतीने हयातीचे दाखले सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी केले.केंद्र शासनाच्या निर्देशानुसार दिनांक ०१ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत निवृत्तीवेतनधारक आणि कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना हयातीचे दाखले ऑनलाइन पद्धतीने सादर करण्याबाबत राबविण्यात येत असलेल्या विशेष अभियानाचा आढावा जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी घेतला. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीस कोषागार अधिकारी रेणुका पाटील, अप्पर कोषागार अधिकारी रोहन शेटे, कोषागार कार्यालयाचे शुभम कदम, अग्रणी जिल्हा प्रबंधक निखिल सावळे, बँक ऑफ महाराष्ट्र जिल्हा प्रतिनिधी संजीवनी कुंभार, स्टेट बँक ऑफ इंडिया जिल्हा प्रतिनिधी विठ्ठल फातले यांच्यासह सांगली जिल्हा पेन्शनर्स असोसिएशनचे अध्यक्ष सुरेंद्र पेंडुरकर, मनोहर भोई आणि दिलीप पाटील उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष म्हणाले, दरवर्षी हयातीचे दाखले सादर करण्यासाठी निवृत्ती वेतनधारकांना कोषागार कार्यालय किंवा बँकेत प्रत्यक्ष जावे लागते. वाढते वय, आरोग्यविषयक समस्यांमुळे ज्येष्ठ नागरिकांसाठी ही प्रक्रिया अनेकदा त्रासदायक ठरते. हा त्रास कमी होण्याच्या दृष्टीने बँकेने आणि पेन्शनर संघटनेने याबाबत व्यापक प्रसिद्धीसह मेळावे आयोजित करून हयातीचे दाखले ऑनलाईन पद्धतीने सादर करण्याबाबत कार्यवाही करावी, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले. निवृत्तीवेतनधारकांनी गुगल प्ले स्टोअर वरून -वहरी ऋरलश ठऊ तसेच जीवन प्रमाण हे ॲप (हीींिी://क्षशर्शीरपारिाररप.सीं.ळप) डाऊनलोड करून ऑनलाइन पद्धतीने हयातीचा दाखला नोंद करावा. काही तांत्रिक अडचण असल्यास (आधार क्रमांक, बँक खाते क्रमांक व झझज क्रमांक यासह) बँक, तालुका स्तरावरील सर्व उपकोषागार कार्यालय तसेच जिल्हा कोषागार कार्यालय सांगली येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी केले आहे.

दादर रेल्वे स्थानकाला 'चैत्यभूमी' नाव देण्यासाठी विधिमंडळ अधिवेशनात आवश्यक पूर्तता करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई ।प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबईतील चैत्यभूमी येथे येणाऱ्या अनुयायांसाठी विविध सुविधा, सुरक्षा, वाहतूक, आरोग्य आणि स्वच्छतेच्या व्यवस्थांचे काटेकोर व समन्वित नियोजन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. तसेच दादर रेल्वे स्थानकाला 'चैत्यभूमी' हे नाव देण्यास राज्य शासनाने यापूर्वीच तत्वतः मान्यता दिली असून, केंद्र शासनाकडून प्राप्त मार्गदर्शनानुसार विधानमंडळाच्या समितीशी संबंधित आवश्यक प्रक्रियेची पूर्तता विधीमंडळ अधिवेशनात करून नामकरणाची कार्यवाही करण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी येथील तयारीचा मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत आढावा घेण्यात आला. विधानभवनातील मंत्रिमंडळ सभागृहात आयोजित बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, गृह राज्यमंत्री योगेश कदम, माजी मंत्री संजय बनसोडे, समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे, भाई गिरकर यांच्यासह विविध विभागांचे सचिव, वरिष्ठ पोलीस अधिकारी, रेल्वे, मुंबई महापालिका आणि भारतीय बौद्ध महासभा, अखिल भारतीय बौध्द भिख्खू संघ, आदी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

महापरिनिर्वाण दिनाचे गांभीर्य व पावित्र्य कायम राखणे आवश्यक असून, या दिवशी उत्सवी स्वरूपाचे आयोजन टाळण्यात यावे. हा दिवस दुःखाचा असल्याने उत्सवी स्वरूपाच्या कार्यक्रमाऐवजी अनुयायांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील चित्रपट अथवा त्यांच्या विचारांशी सुसंगत अन्य उपक्रम आयोजित करता येतील का, याबाबत विचार करण्यात येईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

दादर स्थानकाच्या नामकरणाची प्रक्रिया अधिवेशनात

दादर रेल्वे स्थानकाला चैत्यभूमी नाव देण्याच्या मागणीसंदर्भात राज्य सरकारने यापूर्वीच तत्वतः मान्यता देऊन केंद्र सरकारला पत्र पाठवले आहे. मात्र, या प्रक्रियेसाठी विधानमंडळाच्या समितीबाबत केंद्राकडून मार्गदर्शन प्राप्त झाले आहे. त्यामुळे विधिमंडळाच्या अधिवेशनात आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली जाईल. त्यानंतर स्थानकाचे नामकरण करण्यात येईल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

अनुयायांना सर्व सुविधा देणार – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चैत्यभूमीवर येणाऱ्या लाखो अनुयायांची कोणतीही गैरसोय होऊ दिली जाणार नसल्याची ग्वाही दिली. पुढे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, महापरिनिर्वाण दिनानिमित्त येणाऱ्या लाखो अनुयायांना



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनी अनुयायांसाठी सुविधा, सुरक्षा व वाहतुकीचे काटेकोर नियोजन करण्याचे निर्देश

सुविधा देण्यासाठी शासन पूर्णपणे तयारी करत आहे. मुंबई महानगरपालिका, पोलीस, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगर विकास विभाग आणि अन्य संबंधित विभागांनी एकत्रितपणे केलेल्या नियोजनातून दरवर्षी व्यवस्थांमध्ये सुधारणा करण्यात येत आहे. समन्वय समिती व विविध संघटनांकडून प्राप्त होणाऱ्या सूचनांची दखल घेऊन त्यांची अंमलबजावणी करण्यात येईल.

अनुयायांच्या सुविधा व सुरक्षिततेस प्राधान्य – उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी देशभरातून आणि राज्याच्या विविध भागांतून येणाऱ्या अनुयायांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देण्यात यावे, असे सांगितले. चैत्यभूमी परिसरासह मुंबईत येणाऱ्या भाविकांसाठी आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध कराव्यात. सर्व शासकीय विभागांनी परस्पर समन्वयाने काम करून कोणतीही अनुचित घटना घडणार नाही, यासाठी सतर्क राहावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. प्रशासनाने सज्ज राहून नागरिकांच्या सुविधा आणि सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असेही त्यांनी नमूद केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे यांच्यासह विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी बैठकीत विविध सूचना मांडल्या. यंदा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ७० वा महापरिनिर्वाण दिन असून, ५ व ६ डिसेंबरला चैत्यभूमी आणि शिवाजी पार्क परिसरात भाविकांची संख्या सुमारे १५ लाखांपर्यंत जाण्याची शक्यता असल्याने उपलब्ध सुविधा वाढविण्यात याव्यात, अशी मागणी त्यांनी केली.



जनजाती गौरव दिन निमित्त मोफत आरोग्य व नेत्र तपासणी शिबिर संपन्न

मुखेड ।प्रतिनिधी

दिनांक १७ नोव्हेंबर २०२६ रोजी क्रांतिसूर्य बिरसा मुंडा यांच्या १५१ वी जयंती व जनजाती गौरव दिन निमित्त उपकेंद्र लोहा ता. हदगाव येथे भव्य मोफत आरोग्य तपासणी व नेत्र तपासणी आणि औषधी वाटप शिबिर संपन्न झाले.या शिबिराचे उद्घाटन लोह्याचे सरपंच सौ. रेखाताई रामराव कौसले यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. या प्रसंगी सेवानिवृत्त आरोग्य सहाय्यक श्री एस. पी. राठोड, सौ. संगीताताई विजयराव कौसले, सौ. ज्योती वाळके, उपकेंद्र लोहा येथील समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. सौ. रेणुका सुधाकर तहाडे, आरोग्य सेविका श्रीमती जयश्री आंबादास श्रीरामवार, आरोग्य सेवक श्री आप्पाराव मेटकर व श्री साईप्रसाद कंठे, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय हदगाव येथील पर्यवेक्षक श्री. राहुल वाघमारे, सर्व आशा स्वयंसेविका व मदतनीस उपस्थीत होते.

सदरील आरोग्य शिबिरात ९२ रुग्णांची आरोग्य तपासणी, १२२ रुग्णांची नेत्र तपासणी, ४२ रुग्णांची क्ल तपासणी करून त्यांना औषध उपचार देण्यात आले. तसेच आयुष्यमान आणि आभा कार्ड काढण्यात आले.

सदरील आरोग्य तपासणी उपकेंद्रातील समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.रेणुका सुधाकर तहाडे यांनी केली तर नेत्र तपासणी साईदृष्टी नेत्रालय, नांदेड येथील नेत्रचिकित्सा अधिकारी श्री सत्यनारायण डुबुकवाड व श्री गोविंदराज हंबरडे यांनी केली. औषधी उपलब्धी व वाटप श्री अरुण जाधव यांनी केले.नेत्र तपासणी मधे १४ रुग्ण मोतीबिंदू आजाराचे आढळले, या सर्व मोतीबिंदू रुग्णांना उपजिल्हा रुग्णालय हदगाव येथे नेत्र शस्त्रक्रियेसाठी संदर्भित करण्यात आले.

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)
वेचक वृत्त
शुक्रवार दि.२० नोव्हेंबर २०२६
FRIDAY, DT.20 NOVEMBER 2026
पान -३
PAGE - 3

मंत्री शंभूराज देसाई साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त
बाजीराव दादा चव्हाण यांचा माणुसकीचा उपक्रम

कुणाच्या हातात शिक्षणाची बॅग, तर ऊसतोड कामगारांच्या घरात किराण्याचा आधार

बीड ।प्रतिनिधी

सातारा जिल्ह्यातील पाटण या ठिकाणी महाराष्ट्रातील अनेक कुटुंब ऊस तोडण्यासाठी गेलेले आहेत. आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी अनेक ऊसतोड कामगारांना दरवर्षी आपले घर, गाव आणि कुटुंबीयांना मागे सोडून रोजगाराच्या शोधात परजिल्ह्यांत तसेच परराज्यांत जावे लागते. ऊसाच्या फडात दिवसरात्र कष्ट करून आपल्या कुटुंबाचा संसार चालवणाऱ्या या कामगारांच्या आयुष्यात अनेक आर्थिक आणि कौटुंबिक अडचणी असतात. त्यांच्या कष्टांची जाणीव ठेवत त्यांच्या कुटुंबांना आधार देण्याच्या उद्देशाने युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांनी पाटण येथे सामाजिक बांधिलकी जपत एक विशेष उपक्रम राबविला.

महाराष्ट्र राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या प्रेरणेने खासदार श्रीकांत शिंदे साहेब आणि युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेशजी सरनाईक साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यटन, खनिकर्म व माजी सैनिक कल्याण मंत्री तथा सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. श्री. शंभूराज देसाई साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. वाढदिवस म्हणजे केवळ शुभेच्छा, सत्कार आणि उत्सव नव्हे, तर समाजातील गरजू आणि दुर्लक्षित घटकांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याची संधी असते, ही भावना केंद्रस्थानी ठेवून बाजीराव दादा चव्हाण यांच्या वतीने गोरगरीब कुटुंबांना किराणा किटचे वाटप करण्यात आले. रोजच्या संसारासाठी आवश्यक असणाऱ्या किराणा साहित्याचा समावेश असलेल्या या किटमुळे आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या कुटुंबांना मोठा आधार मिळाला.

ऊसतोड कामगारांचे घरातील दैनंदिन गरजा, मुलांचे संगोपन आणि संसाराचा खर्च यांचा ताळमेळ घालताना अनेक कुटुंबांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. ही परिस्थिती लक्षात घेऊन त्यांच्या घरापर्यंत मदतीचा हात पोहोचवण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. गरजू कुटुंबांच्या



घरात किराण्याच्या माध्यमातून दिलासा पोहोचविणे, हा या उपक्रमाचा महत्त्वाचा हेतू ठरला.ऊसतोड कामगारांच्या आरोग्यालाही प्राधान्य.!

केवळ किराणा साहित्याचे वाटप करून न थांबता ऊसतोड कामगारांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचेही आयोजन करण्यात आले. ऊसतोडणीचे काम शारीरिकदृष्ट्या कष्टाचे असून कामगारांना अनेक तास शेतात मेहनत करावी लागते. अशा परिस्थितीत आरोग्याची नियमित तपासणी होणे महत्त्वाचे आहे. मात्र, कामाचा व्याप आणि आर्थिक अडचणींमुळे अनेकदा कामगारांना स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. ही बाब लक्षात घेऊन कामगारांना मोफत आरोग्य तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. आर्थिक परिस्थितीमुळे आरोग्यसेवेपासून वंचित राहू नये आणि कामगारांनी आपल्या आरोग्याबाबत जागरूक राहावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. तसेच ऊसतोड कामगारांच्या मुलांना शालेय साहित्य वाटप आणि बॅग सुद्धा देण्यात आल्या. मंत्री शंभूराज देसाई साहेब यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून सामाजिक बांधिलकीचा एक वेगळा संदेश देण्यात आला. समाजातील कष्टकरी, गोरगरीब आणि गरजू कुटुंबांच्या अडचणी समजून घेऊन त्यांच्या गरजेच्या वेळी मदतीचा हात पुढे करणे, हीच खऱ्या अर्थाने माणुसकी असल्याची भावना या उपक्रमातून व्यक्त झाली. राजकारण, पद किंवा प्रसिद्धी यापलीकडे जाऊन सामान्य माणसाच्या अडचणीत त्याच्या पाठीशी उभे राहणे, त्याच्या संसाराला हातभार लावणे आणि त्याच्या आरोग्याची काळजी घेणे, या विचारातून बाजीराव दादा चव्हाण यांनी हा उपक्रम राबविला. एकीकडे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारे उपक्रम, तर दुसरीकडे कष्टकरी कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना जीवनावश्यक साहित्याचा आधार देणारे उपक्रम अशा सामाजिक कार्यातून वाढदिवस साजरा करण्याची संकल्पना पुढे येत आहे. वाढदिवस एका व्यक्तीचा असला, तरी आनंद अनेक कुटुंबांच्या घरात पोहोचला पाहिजे,

बुद्ध लेणी (खरोसा) येथे बौद्ध धम्म परिषद आणि दहा फूट उंच बुद्ध मूर्ती लोकार्पण सोहळ्याचे आयोजन

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू व भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भीमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या हस्ते उद्घाटन

लातूर ।प्रतिनिधी

बुद्ध लेणी खरोसा, तगरभूमी चॅरिटेबल ट्रस्ट, धाराशिव, बोधीवृक्ष फाउंडेशन, सोलापूर, प्रबुद्ध भारत चॅरिटेबल ट्रस्ट व नालंदा बुद्ध विहार, बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने बुद्ध लेणी (खरोसा) ता.औसा जि.लातूर येथे मंगळवार दि.२४ नोव्हेंबर २०२६ रोजी दु.१२.३० वा. बौद्ध धम्म परिषद आणि दहा फूट उंच बुद्ध मूर्ती लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या धम्म परिषदेच्या अध्यक्षस्थानी पू.भिक्खू महाविरो थेरो (काळेगाव) यांची उपस्थिती लाभणार असून उद्घाटक म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू व भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भीमराव यशवंतराव आंबेडकर, स्वागताध्यक्ष म्हणून रवी गायकवाड (बसवकल्याण, कर्नाटक) आणि आमदार अभिमन्यू पवार (औसा) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.तसेच पू.भिक्खू पय्यानंद थेरो (लातूर), पू.भिक्खू धम्मसार थेरो (किल्लारी), पू.भिक्खू सुमंगल थेरो (कराळी), पू.भिक्खू धम्मबोधी (पानगाव), पू.भंते राहुल (काळेगाव) आणि पू.भंते सोनुत्तर (काळेगाव) आदि भिक्खू संघ उपस्थित राहून धम्म देसना देणार आहेत.या धम्म परिषदेमध्ये स.९.३० वा. धम्म ध्वजारोहण, स.१०.०० वा. मुख्य लेणी स्तूप वंदना, स.११.०० वा. भिक्खू संघास भोजनदान आणि दु.१२.३०. वा. बुद्ध मूर्ती लोकार्पण व धम्म परिषदेचे उद्घाटन सर्व मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये संपन्न होणार आहे.या धम्म परिषदेमध्ये भारतीय बौद्ध महासभा सभेचे राज्य संघटक प्रा.बापूसाहेब गायकवाड आणि डी.एस.नरसिंगे यांच्यासह शारदाताई हजारे, वंदनाताई कांबळे, आशाताई चिकटे, अभिमन्यू लामतुरे, राजाराम साबळे, गौतम बनसोडे, राजेंद्र क्षीरसागर, विलास आल्टे, कैलास कांबळे, दिलीप बौद्धवीर, मारुती कांबळे, गौतम अवचारे, बाळासाहेब कांबळे, प्रा.डॉ.बी.आर.गायकवाड, प्रा.अनिल गाडे, भागेश कांबळे, ॲड.आर.वाय.कांबळे, संतोष कांबळे, इंजि.अश्विन धसवाडीकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.या धम्म परिषदेला विश्वजीत अनिलकुमार गायकवाड, डॉ.श्याम लोकरे, विनोदभाऊ खटके, ॲड.अतिश चंद्रकांत चिकटे, इंजि.सचिन अर्जुन गायकवाड, निळकंठ अवचारे, प्रवीण



गायकवाड, अंकुश ढेरे, चंद्रकांत चिकटे, लक्ष्मण कांबळे, रमेश शृंगारे, नितीन वाघमारे, राजेंद्रआबा बनसोडे, मिलिंद कांबळे, ॲड.जगदीश सूर्यवंशी, दिलीप भालेराव, धम्मानंद काळे, संतोष माने, अनिल हजारे, रामलिंग पडसाळगे, रमेश कांबळे, विजय भाऊ मस्के, मंगेश दिलीप सोनावळे, आनंद बनसोडे, संजय पाईकराव, डॉ.प्रदीप रोडे, रोहित बनसोडे, रजनीकांत कांबळे, अनंत लांडगे, युवराज गायकवाड, विशाल शिंगाडे, सुनील बनसोडे, विशाल गायकवाड, कैलास शिंदे, संतोष सुरवसे, पी.एम.सोनटक्के, शरद बनसोडे, आनंद कांबळे आणि संजय सोनकांबळे आदींचे धम्मदान मिळाले आहे.

या बौद्ध धम्म परिषद आणि दहा फूट उंच बुद्ध मूर्ती लोकार्पण सोहळ्याला लातूर, धाराशिव, सोलापूर, नांदेड जिल्ह्यासह मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यातील उपासक-उपासिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजक भंते सुमेधजी नागसेन यांनी केले आहे.

धन्य धन्य नामदेवा.! केला उपकार जीवा..!!

संत नामदेव : वारकरी संप्रदायातील समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेच्या क्रांतीचे आद्य प्रवर्तक

महाराष्ट्राच्या संतपरंपरेने देशाला सामाजिक समता, बंधुता आणि मानवतेचा महान विचार दिला. या परंपरेत संत नामदेव महाराजांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. वारकरी संप्रदायाला व्यापक लोकचळवळीचे स्वरूप देत जातिभेद, वर्णभेद आणि धार्मिक विषमतेविरुद्ध त्यांनी विचारांची क्रांती घडवली.

त्या काळात विठ्ठल मंदिरातील दर्शनावर वर्णव्यवस्थेचे बंधन होते. अशा प्रतिकूल परिस्थितीत संत नामदेवांनी सर्वांना ईश्वरभक्तीचा समान अधिकार असल्याचा विचार मांडला. त्यांनी उपेक्षित, वंचित आणि बहुजन समाजाला भक्तीच्या प्रवाहात सामावून घेतले. संत चोखामेळा, संत जनाबाई, संत सावता माळी, संत गोरोबा कुंभार, संत सेना महाराज अशा संतांना सोबत घेऊन समतेचा विचार समाजात रुजवला.

संत ज्ञानेश्वर आणि त्यांच्या भावंडांशी नामदेवांचे जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले. नामदेव-ज्ञानदेव या संतजोडीने वारकरी संप्रदायाला स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेचा वैचारिक पाया दिला. मंदिरापुरती मर्यादित असलेली भक्ती त्यांनी चंद्रभागेच्या वाळवंटात सामान्य माणसांपर्यंत पोहोचवली. त्यामुळेच 'नामदेव कीर्तन करी, पुढे नाचे पांडुरंग' ही भक्तीपरंपरा लोकप्रिय झाली.

संत नामदेव हे केवळ अभंगरचनाकार नव्हते, तर ते आद्य संत चरित्रकार आणि समाजपरिवर्तनाचे महान विचारवंत होते. त्यांनी समकालीन संतांची चरित्रे लिहून संतपरंपरेचा अमूल्य ठेवा जतन केला. महाराष्ट्राबाहेरही त्यांनी संतविचारांचा प्रसार केला. पंजाबमध्ये जाऊन भक्ती आणि समतेचा संदेश दिला. शीख धर्माच्या पवित्र गुरुग्रंथ साहिब या ग्रंथात संत नामदेव महाराजांचे ६१ अभंग समाविष्ट असणे ही त्यांच्या विचारांच्या व्यापकतेची साक्ष आहे.

संत चोखामेळा महाराजांनी नामदेवांच्या कार्याचा गौरव करताना म्हटले आहे,

धन्य धन्य नामदेवा । केला उपकार जीवा ।।१।।

माझा निरसिला भेवो । दाखविला पंढरिरावो ।।२।।

मंत्र सांगितले सोपा । निवारिले भवतापा ।।३।।

माझ्या कृपेची माउली । चोखा म्हणे पान्हा घाली ।।४।।

आज संत नामदेव महाराजांच्या विचारांची समाजाला पुन्हा एकदा गरज आहे. जात, धर्म, पंथ आणि उच्च-नीचतेच्या भिंती दूर करून माणुसकीचा धर्म जपणे हीच त्यांच्या कार्याला खरी आदरांजली ठरेल. वारकरी संप्रदायाचे मूळ स्वरूप जपत संतविचारांचा प्रचार आणि प्रसार करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

संत नामदेव महाराज हे केवळ वारकरी संप्रदायाचे संत नव्हते, तर समता, बंधुता आणि सामाजिक परिवर्तनाची मुहूर्तमेढ रोवणारे महान क्रांतिकारक होते. त्यांच्या विचारांचा वटवृक्ष सदैव मानवतेला दिशा देत राहो, हीच त्यांच्या चरणी विनम्र वंदना!

लेखक :
प्रा. डॉ. विठ्ठल खंडुजी जायभाये
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय,
सोनपेठ, जि. परभणी (महाराष्ट्र)
मो. ९१५८०६४०६८



चौसाळा ते वाढवाणा पाच कोटी रुपयाचे
काम निकृष्ट दर्जाचे-पांडुरंग आवारे

चौसाळा/ प्रतिनिधी

दिवंगत अजित पवार यांनी गत वर्षी बीड तालुक्यातील चौसाळा येथे पूरग्रस्तातील नुकसान झालेल्या पहानी दौऱ्यावर चौसाळा येथे आले आसता त्यावेळेस आदरणीय दादांची प्रतेक्ष भेट घेऊन पांडुरंग आवारे-पाटील व माळेवाडी, रूईगव्हाण, पिंपळगाव घाट, वाढवाणा, मानेवाडी ग्रामस्थांनी मागणी केली होती की, आमच्या पाच गावांकडे चौसाळा ते वाढवाणा हा रस्ता अतिशय खराब झाला असून त्या रस्त्यावर अपघात होत आहेत व तो रस्ता मंजूर आहे त्याच्यावर निधी टाका व आमचा चौसाळा ते वाढवाणा

प्रश्न मार्गी लावा दादा असे पांडुरंग आबारे-पाटील व बरील सर्व ग्रामस्थांनी मागणी केली होती. त्या मागणी ची दखल घेऊन तात्काळ चौसाळा ते बाढवाणा रस्त्यासाठी ५ कोटी रू. निधी टाकला होतो. त्या नंतर काही महिन्यांनी त्या रस्त्याचे काम झाले होते. त्या रस्त्याचे

काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले होते म्हणून वरील पाच गावच्या ग्रामस्थांनी रीतसर तक्रार जिल्हाधिकारी साहेब व कार्यालय बीड कडे करण्यात आली होती. संबंधीत अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले तो संपूर्ण रस्ता पून्हा आमी करून देऊत असे सांगण्यात आले, आम्ही तो रस्ता होण्याची आणि करण्याची आम्ही वाट पहात होतोत तो रस्ता आज दि. १७ नोव्हेंबर २०२६ रोजी करायला सुरवात केली होती. त्या रस्त्याचे काम राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे या भागाचे नेते पांडुरंग आबारे-पाटील यांनी व ग्रामस्थांनी बंद केले आहे. का बंद केले तर ते काम अतिशय निकृष्ट दर्जाचे व थातूरमातूर चालु होते म्हणून ते काम बंद केले आहे. म्हणून बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री आदरणीय सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांनी व जिल्हाधिकारी साहेब बीड यांनी स्वाता जातीने लक्ष घालुन चौसाळा येथून पाच गावांकडे जाणारा रस्ता व अनुसया नदीवरील पुल करून द्यावा व चौसाळा येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून चौसाळा ते अनुसया नदी पर्यंत दोन्ही ही बाजूने नाल्या करून द्याव्यात हि मागणी चौसाळा ग्रामस्थ च वरील पाच गावांतील सर्व ग्रामस्थांची आहे व पालकमंत्री सुनेत्राबहिनी अजितदादा पवार यांना बरील विषयांकित संदर्भात निवेदन देण्यात येणार आहे अशी माहिती राष्ट्रवादीकाँग्रेस पार्टीचे युवा नेते पांडुरंग आवारे पाटील यांनी केलै आहे

रोटरी क्लबतर्फे गेवराईत दिवाळीनिमित सूर संगीताची मेजवानी

स्वरसंध्याने रसिकश्रोते सुखावले -उज्वला वनवे

गेवराई (प्रतिनिधी)--संगीतामध्ये खूप मोठी जादू आहे आणि ही जादू ज्याला समजली तो खरोखरच भाग्यवान आहे. अशी जादू गेवराई येथे पहावयास मिळत आहे. बीड येथील गीतांजली कराओके क्लब व रोटरी क्लबचे कलावंत गायक आणि स्थानिक कलावंत यांचा सुरेल संगम पहावयास मिळाला. स्वरसंध्याने गान रसिकांची भूक काही प्रमाणात का होईना भागवली. ही गेवराईकरांच्या दृष्टीने चांगली बाब आहे, असे गौरव उद्गार नाट्य अभिनेत्री ,निवेदिका डॉ. उज्वला वनवे यांनी काढले. रोटरी क्लब ऑफ गेवराईच्या वतीने १२ नोव्हेंबर २०२६ रोजी दिवाळी आणि पाडव्यानिमित्त गेवराईकरांसाठी लातूर पॅटर्न क्लासेसच्या सभागृहात स्वर संध्या या संगीत रजनीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंचावर रोटरी इंटरनॅशनल ३१ ३२ चे माजी प्रांतपाल हरीश मोटवानी, सहप्रांतपाल नितीन गोपन, नाट्य अभिनेत्री डॉ. उज्वला वनवे, जेष्ठ पत्रकार सुभाष सुतार, कलावंत व पत्रकार सुशील टकले, रोटरी क्लब ऑफ मिडटाउन बीडचे सचिव मनोज थीगळे , प्रीत कुकडेजा, रोटरी क्लबचे अध्यक्ष गणेश कुलकर्णी, उपाध्यक्ष सुदाम धुपे,सचिन पुणेकर आदींची प्रमुख उपस्थिती होती .रोटरी इंटरनॅशनलचे संस्थापक पॉल हॅरीस यांच्या प्रतिमेस सुरुवातीला पुष्पमाला घाल ण्यात आली . उपस्थित मान्यवरांचे स्वागत भावी अध्यक्ष राजेंद्र



डेंगे , राधाकिशन लड्डा ,रामकृष्ण चेडे, निखिल काला ,नागनाथ घसिंग ,रामदास शिंदे, अशोक गलांडे यांच्या हस्ते करण्यात आले. फॉर वे टेस्टचे वाचन राजेंद्र डेंगे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक धर्मराज करपे यांनी तर मान्यवरांचा परिचय अध्यक्ष गणेश कुलकर्णी यांनी करून दिला.आपल्या प्रमुख भाषणात डॉ. उज्वला वनवे यांनी काव्यमय भाषेत रसिक प्रेक्षकांची मने जिंकली. गेवराईकरांच्या मनातील भावना रोटरी क्लबच्या माध्यमातून स्वरसंध्याच्या रूपाने व्यक्त झाल्या .बीड आणि गेवराईतील कलावंतांनी अप्रतिम अशी गीते गाऊन सर्वांचे मनोरंजन केले. सेवा, कार्य ,मनोरंजन आणि प्रबोधन या मुद्द्यावर रोटरी क्लब आगेकूच करत आहे ,असे त्या म्हणाल्या. प्रोजेक्ट चेअरमन राजेंद्र डेंगे यांनी उपस्थितांचे आभार मानले. यानंतर बीड येथील गीतांजली कराओके क्लबचे संचालक विवेक काटे, आशा भारती, अस्मिता अहिरे यांनी सुरांचा साज चढवला. के. एस. के. कॉलेजच्या उपप्राचार्य अनिता शिंदे व प्रा. शरद सदाफुले यांनी गीतांची गुंफण करून कार्यक्रमाचे बहारदार सूत्र संचालन केले.

स्वरसंध्या कार्यक्रमाची सुरुवात गायिका धनश्री कुलकर्णी यांच्या गणेश स्तवनाने झाली. प्रणिती पंडित सांज ये गोकुळी गीत सादर केले.सुप्रसिद्ध भजनसम्राट तुळशीराम आतकरे यांनी अभंग सादर करून प्रचंड प्रतिसाद मिळवला. प्रा.सुनील मुंढे यांनी पंकज उधास यांची एक तरफ उसका घर ही गझल अप्रतिम पेश केली. आली माझ्या घरी ही दिवाळी हे गीत शकुंतला खरात यांनी गायले. गायक शेख खाजा यांनी मेरे देशप्रेमीयो,आपसमें प्रेम करो हे गाणे गात सर्वांना देशप्रेमाची उधळण केली. ड. प्रशांत वाघमारे यांनी सोचेंगे तुम्हे प्यार तर राजेंद्र मनोर यांनी प्यार दिवाना होता है सादर केले. मैं कोई ऐसा गीत गाऊ हे गीत रवींद्र पांडे यांनी सादर केले. अमोल कांबळे यांच्या ढोलकीवादनने वेगळेच वातावरण निर्माण झाले होते. ज्ञानेश्वर मोटे व समीर कुलकर्णी, श्रीराज पंडित यांनी संगीतसाथ दिली.बीड आणि गेवराईच्या गायक कलावंत यांच्या जुगलबंदीने कार्यक्रम ४ तास कसा चालला हे कळले नाही. एव्हढे गानरसिक स्वरसागरात आकंठ बुडाले होते. कार्यक्रमास विष्णुप्रसाद खेत्रे, कैलास टोणपे, एस.वाय.अन्सारी, पत्रकार अयुब बागवान, प्रकाश भुते, किसन सागडे,वसंत पंडित, प्रा. सुरेश पाटील, प्रकाश गिरी, अशोक निकाळजे, धनंजय सुलाखे, अभय देशपांडे , हमने यांच्यासह रोटरी सदस्य, प्रतिष्ठित नागरिक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीताने स्वरसंध्या कार्यक्रमाची सांगता झाली.

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)

विविध वृत्त

शुक्रवार दि.२० नोव्हेंबर २०२६
FRIDAY, DT.20 NOVEMBER 2026

पान -४
PAGE - 4

आष्टीचे माजी केंद्रप्रमुख संपतराव धोंडे यांना मातृशोक

१०१ वर्षांच्या मालनबाई धोंडे यांचे वृद्धापकाळाने निधन;अंत्यसंस्कारास विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती



आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टीचे माजी केंद्रप्रमुख संपतराव बापुराव धोंडे यांच्या मातोश्री तथा कट्टर शिवभक्त श्रीमती मालनबाई बापुराव धोंडे (वय १०१ वर्षे) यांचे बुधवार, दि. १८ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजून १० मिनिटांनी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने धोंडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून आष्टी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

श्रीमती मालनबाई धोंडे यांनी वयाची १०१ वर्षे पूर्ण करत दीर्घायुष्य लाभलेल्या जुन्या पिढीतील आदर्श माता म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. आष्टी येथील बेलेश्वर महादेव मंदिरात त्या नियमितपणे शिवभक्ती व धार्मिक उपासना करत असत. शांत, संयमी आणि धार्मिक वृत्तीच्या असलेल्या मालनबाईंनी आपल्या आयुष्यात कुटुंबावर संस्काराचे आणि मायेचे छत्र कायम ठेवले. त्यांच्या निधनाने एका संस्कारक्षम पिढीचा आधार हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.

त्यांच्या पश्चात एकुलते एक पुत्र संपतराव धोंडे, पाच मुली श्रीमती छबुबाई श्रीरंग अनारसे, सौ. साकुबाई नवनाथ दळवी, सौ. छायाबाई ज्ञानदेव आस्वर, सौ. वत्सला उत्तम अनारसे, सौ. बबीता उत्तम बोडखे, दोन नातू सचिनशेठ धोंडे व गणेशशेठ धोंडे, नाती सौ. सविता दत्तात्रय वाचुले, सौ. कविता रमेश बोडखे, सौ. शारदा चंद्रकांत बनसोडे, सून सौ. सुनिता संपत धोंडे, नातसुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांच्या त्या सासू होत.


त्यांच्या पार्थिवावर बुधवार, दि. १८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता आष्टी येथील बसस्थानकाजवळील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि व्यापारी क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

यावेळी माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार साहेबराव दरेकर, बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजय गोल्हार, बीड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य देविदास धस, सौ. सविता गोल्हार, नियामत बेग, अण्णासाहेब चौधरी, राजेंद्र धोंडे, नगराध्यक्ष जिया बेग, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, बीड जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. सविता गोल्हार, संजयशेठ मेहेर, अमोलराजे तरटे, संतोषशेठ मेहेर, प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, नामदेव राऊत, विठ्ठलराव बनसोडे, शहाजी भोसले, योगीराज गर्जे, दिलीपराव काळे, बाबुराव अनारसे, दत्ताभाऊ सायकड, यशवंत खंडागळे, परिवंत गायकवाड, पी.वाय. काळे, एल.जी. सुरतवाले, रमेश मुळे, पी.बी. बोडखे, शांताराम पाथरकर, प्राचार्य डॉ. दत्तू शंकर बोडखे, प्रा. दत्तात्रय वाघुले, प्राचार्य डॉ. श्रीराम आरसूळ, प्राचार्य बाळासाहेब खेमगर, तानाजी भगत, चंद्रकांत शिंदे, सुरेश पवार, आदिनाथ सानप, आत्माराम फुंदे, रत्नदीप निकाळजे, प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, प्राचार्य डॉ. सोपान निंबोरे, प्राचार्य शिवदास विधाते, प्राचार्य डॉ. डी.बी. राऊत, प्रा. आर.जी. विधाते, डॉ. सत्यजित विधाते, विश्वजीत विधाते, नवनाथ गाडे, गोरक्ष सायकड, अरुण सायकड, परसराम नरोडे, अर्जुन खेडकर सर, प्रा. सय्यद अल्लाउद्दीन, बबनराव खंडागळे, भाऊसाहेब निंबाळकर, शेख अन्सारभाई, प्रा. डॉ. जी.पी. बोडखे, माऊली बोडखे, भानुदास बोडखे, सोपानकाका मुळे, राजेंद्र लाड सर, धोंडीराम झाडे, कुडलिक आस्वर, कांतीलाल आस्वर, सोपान काकडे, भीमराव विधाते, गिरीश जोशी, संजय सिंगवी, संतोष ताबे, सुनीलशेठ मेहर, ज्ञानदेव राऊत, ज्ञानदेव सोनवणे, सचिन रानडे, शरद रेडेकर आदींसह विविध क्षेत्रांतील मान्यवर, नातेवाईक, मित्रपरिवार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी संजयशेठ मेहर, विजय गोल्हार, देविदास धस, माजी आमदार साहेबराव दरेकर आणि माजी आमदार भीमराव धोंडे यांनी मालनबाई धोंडे यांच्या आठवणींना उजाळा देत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या निधनाने धोंडे कुटुंबीयांनी मायेचे, प्रेमाचे आणि संस्कारांचे छत्र गमावले असून परिसरातून शोक व्यक्त केला जात आहे.

दुष्काळाच्या संकटात दोन शेतकरी कुटुंबांना आ.सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून आधार

मुख्यमंत्री सहायता निधीतून १ लाख ८० हजार रुपयांची मदत मंजूर





अपघातग्रस्त विद्यार्थ्याला ८० हजार, तर तरुणाच्या उपचारासाठी १ लाख रुपये मंजूर

पाटोदा : प्रतिनिधी

दुष्काळाच्या संकटामुळे आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या शेतकरी कुटुंबातील दोन अपघातग्रस्तांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून एकूण एक लाख ८० हजार रुपयांची मदत मंजूर झाली आहे. लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून झालेल्या या मदतीमुळे दोन्ही शेतकरी कुटुंबांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे.

शिरूर कासार तालुक्यातील रूपूर येथील पंकज गणेश येवले हा बारावीत शिक्षण घेणारा विद्यार्थी अपघातात जखमी झाला होता. त्याच्यावर अहिल्यानगर येथील मेकअप केअर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. शेतकरी कुटुंबातील या विद्यार्थ्याचा अपघात झाल्याने कुटुंबीयांसमोर उपचाराच्या खर्चाचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. यासंदर्भात गोमळवाडा येथील सरपंच सुदाम काकडे यांनी आमदार सुरेश आण्णा धस यांना माहिती दिली. त्यानंतर आमदार धस यांनी आरोग्य विभागाचे स्वीय सहाय्यक यांना तातडीने मदतीची प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार सातत्याने पाठपुरावा करून पंकज येवले याच्या उपचारासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून ८० हजार रुपयांची मदत मंजूर करण्यात यश आले.

दुसऱ्या घटनेत बीड तालुक्यातील लिंबा रूई येथील शेतकरी कुटुंबातील तरुण शिवाजी गहिनीनाथ दराडे यांचा मुर्शिदपूर फाटा येथे अपघात झाला होता. त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील वैद्यनाथ हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. या अपघाताची माहिती अशोक नागरे यांनी आमदार सुरेश आण्णा धस यांना दिल्यानंतर त्यांनी ड. महेश बेदरे व स्वीय सहाय्यक सोमनाथ कोल्हे यांना तातडीने मदतीची प्रक्रिया राबविण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार ड. महेश बेदरे यांनी वैद्यनाथ हॉस्पिटलशी संपर्क साधून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी पाठपुरावा केला. या प्रयत्नांना यश येत बुधवार, दि. १८ नोव्हेंबर रोजी शिवाजी दराडे यांच्या उपचारासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून एक लाख रुपयांची मदत मंजूर झाली.

दुष्काळी परिस्थितीमुळे आधीच आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकरी कुटुंबांवर अपघातामुळे आलेला उपचारांचा अतिरिक्त आर्थिक भार या मदतीमुळे काही प्रमाणात हलका झाला आहे. संकटाच्या काळात विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला आणि तरुणाच्या उपचारांना आर्थिक आधार मिळाल्याने दोन्ही कुटुंबीयांनी आमदार सुरेश आण्णा धस,तसेच संपूर्ण रुग्ण मदत विभागाचे मनापासून आभार मानले आहेत.



तन्विका संतोष चाकरोड हिची राष्ट्रीय हॉकी स्पर्धेसाठी निवड!

धर्माबाद : (अशोक पडोळे) बुलढाणा येथे आयोजित राज्यस्तरीय हॉकी स्पर्धेत राजाराम काकाणी सहकार विद्या मंदिर व ज्युनिअर कॉलेज धर्माबादची विद्यार्थिनी कु. तन्विका चाकरोड हिने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत महाराष्ट्राच्या संघात स्थान मिळविले असून, तिची राष्ट्रीय स्तरावरील हॉकी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या राज्यस्तरीय स्पर्धेत महाराष्ट्रातील मुंबई, नाशिक, कोल्हापूर, पुणे, नागपूर, अमरावती, लातूर आणि छत्रपती संभाजीनगर या आठ विभागीय संघांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेतून एकूण १८ गुणवंत खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली.तन्विकाने जिद्द, मेहनत, कौशल्य आणि उत्कृष्ट खेळाच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावर झेप घेत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.तिच्या या यशामागे शाळेचे क्रीडा शिक्षक श्री. श्रीनिवास कांबळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक आदरणीय श्री. सुबोधजी काकाणी सर यांनी तन्विका व तिचे मार्गदर्शक क्रीडा शिक्षक यांचे विशेष अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेतील पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.तन्विकाच्या या उल्लेखनीय यशामुळे ठघडतच् परिवारात आनंदाचे वातावरण असून, तिच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

रोहयोतून चारा पिकांसाठी आर्थिक मदत व रोजगाराचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व सीईओ महेश पाटील

नांदेड जिल्हा प्रतिनिधी

दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी चारा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने जिल्ह्यात चारा पीक लागवडीला प्रोत्साहन देण्यात येत आहे. महाराष्ट्र रोजगार हमी योजनेंतर्गत विकसित भारत रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण) अंतर्गत चारा पिकांच्या लागवडीसाठी विशेष आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. या योजनेमुळे पशुपालकांना चारा उपलब्ध होण्यासोबतच ग्रामीण भागातील मजुरांना स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी मिळणार आहेत. त्यामुळे सिंचनासाठी पाणी उपलब्ध असलेल्या अधिकाधिक शेतकऱ्यांनी चारा पीक लागवड करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी केले आहे.

मृद व जलसंधारण विभागाच्या (रोहयो प्रभाग) ६ नोव्हेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार विविध चारा पिकांच्या लागवडीसाठी रोपे, बियाणे, मजुरी व सामग्री यासाठी आर्थिक तरतूद निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार मका लागवडीसाठी हेक्टरी ४७ हजार ३०७ रुपये व ९५ मनुष्यदिवस, ज्वारीसाठी ४२ हजार ७७८ रुपये व ८८ मनुष्यदिवस, तर बाजरीसाठी ३५ हजार ५०५ रुपये व ७४ मनुष्यदिवस रोजगार उपलब्ध होणार आहे. नेपिअर गवत लागवडीसाठी ७६ हजार ३१ रुपये व १५५ मनुष्यदिवस, मेथी घास (ल्युसर्न) लागवडीसाठी १ लाख १३ हजार २९० रुपये व २७० मनुष्यदिवस, ज्वारी मल्टीकटसाठी ५२ हजार ३६ रुपये व १०० मनुष्यदिवस, तर बाजरी मल्टीकटसाठी ७६ हजार ४५ रुपये व १८० मनुष्यदिवस रोजगाराची तरतूद करण्यात आली आहे.

दुष्काळी परिस्थितीत चारा टंचाईमुळे पशुधनाच्या संगोपनाचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी उपलब्ध सिंचनाच्या पाण्याचा उपयोग करून चारा पिकांची लागवड करणे आवश्यक आहे. या उपक्रमामुळे जनावरांसाठी चाऱ्याची उपलब्धता वाढण्यासोबतच पशुपालकांना आर्थिक दिलासा मिळणार आहे. तसेच ग्रामीण भागातील मजुरांना रोजगारही उपलब्ध होणार आहे. त्यामुळे इच्छुक शेतकऱ्यांनी चारा पीक लागवडीसाठी संबंधित पंचायत समिती कार्यालय किंवा पशुसंवर्धन विभागाशी संपर्क साधून योजनेची माहिती घ्यावी व या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

पाटोद्यात विरोधी पक्षातील जोडीन जिंकली जनतेची मने!

दुष्काळाचे राजकारण बाजुला ठेवत पशुधनासाठी मोफति पाणीपुरवठा सुरू!

पाटोदा ।प्रतिनिधी

पाटोदा : दुष्काळाच्या तीव्र संकटात राजकीय मतभेद आणि पक्षीय जोडे बाजूला सारत पाटोद्यातील दोन विरोधी पक्षांच्या युवा नेत्यांनी माणुसकीचे एक आदर्श उदाहरण समोर ठेवले आहे. काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राहुल जाधव आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे तालुकाप्रमुख मुकुंद शिंदे यांनी दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या मुक्या जनावरांसाठी मोफत पाणीपुरवठा करण्याचा स्तुत्य संकल्प केला आहे. निवडणुकीच्या राजकारणात एकमेकांविरुद्ध लढणारे हे नेते दुष्काळाच्या या बिकट काळात मात्र जनतेच्या आणि मुक्या जनावरांच्या मदतीसाठी एकत्र आल्याने पाटोदा तालुक्यात त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पाण्यासाठी वणवण करणाऱ्या पशुधनाला दिलासा

पाटोदा शहरासह परिसरात सध्या दुष्काळाचे सावट गडद होत चालले असून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत आहे. मानवासोबतच हतबल झालेल्या मुक्या जनावरांनाही पाण्यासाठी प्रचंड हाल सहन करावे लागत आहेत. हीच गरज लक्षात घेऊन राहुल जाधव आणि मुकुंद शिंदे यांनी राजकारण विसरून प्रत्यक्ष कृती करण्याचा निर्णय घेतला.या उपक्रमाची सुरुवात आज माऊलीनगर परिसरातील आसिफ यांच्या जनावरांच्या गोठ्यावरून करण्यात आली. याठिकाणी पशुधनासाठी २ हजार लिटर पाण्याचा पहिला टँकर मोफत उपलब्ध करून देण्यात आला. यापुढेही दुष्काळाची तीव्रता असेपर्यंत दररोज मुक्या जनावरांसाठी एक टँकर पाणी पूर्णपणे मोफत दिले जाणार आहे, जेणेकरून कोणत्याही पशुधनाला पाण्यासाठी वणवण करावी लागणार नाही.

नेत्यांच्या प्रतिक्रिया



सध्या पाटोदा शहरासह परिसरात दुष्काळाची अत्यंत गंभीर परिस्थिती आहे. या संकटात माणसांसोबतच मुक्या जनावरांचाही विचार करणे आपले कर्तव्य आहे. जनावरांना पिण्यासाठी पाणी मिळावे, या सामाजिक भावनेतून आम्ही हा उपक्रम सुरू केला आहे. दुष्काळ हा राजकारण करण्याचा विषय नसून सर्वांनी एकत्र येऊन मदतीसाठी पुढे येण्याची हीच खरी वेळ आहे.

- राहुल जाधव, तालुकाध्यक्ष, काँग्रेस

राजकारण आणि निवडणुका या त्यांच्या वेळेनुसार होत राहतील; मात्र दुष्काळाच्या संकटात मुक्या जनावरांना पाण्यावाचून त्रास होऊ नये, ही आमची प्रामाणिक भावना आहे. पक्षीय मतभेद बाजूला ठेवून सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी आम्ही हा उपक्रम हाती घेतला असून, पशुधनासाठी दररोज मोफत पाणी पुरवण्याचा आमचा अखंड प्रयत्न राहील.

- मुकुंद शिंदे, तालुकाप्रमुख, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट)राजकारण निवडणुकीपुरते, माणुसकी कायमची!

निवडणुकीच्या मैदानात राजकीय भूमिका, विचारसरणी आणि स्पर्धा वेगवेगळी असू शकते; परंतु दुष्काळसारख्या नैसर्गिक संकटात समाजासाठी आणि मुक्या जिवांच्या रक्षणासाठी एकत्र येणे हीच खरी सामाजिक बांधिलकी आहे, असा संदेश या दोन्ही नेत्यांनी आपल्या कृतीतून दिला आहे. निवडणुका येतील-जातील, राजकीय जोडे बदलत राहतील, मात्र संकटाच्या काळात एकमेकांच्या आणि मुक्या जनावरांच्या मदतीला धावून जाण्याची ही प्रवृत्ती पाटोद्यातील जनतेच्या मनाला भावली असून, या उपक्रमाची सर्वत्र जोरदार चर्चा सुरू आहे.



पोलीस उपमहासंचालक मधुकर पांडे यांची ग्रामीण पोलीस स्टेशन येथे भेट

नवीन नांदेड ।प्रतिनिधी

राज्याचे पोलीस उप महासंचालक मधुकर पांडे यांनी ग्रामीण भेट देऊन पोलीस स्टेशनची पुर्ण पाहणी करून कामाकाज माहिती घेऊन स्वच्छता बाबत समाधान व्यक्त केले. १८ नोव्हेंबर रोजी राज्याचे पोलीस उपमहासंचालक मधुकर पांडे हे नांदेड जिल्हा दोन दिवसीय दौरा संदर्भाने आगमन झाले,१८ नोव्हेंबर रोजी नांदेड जिल्हा पोलीस दल अंतर्गत असलेल्या ग्रामीण पोलीस स्टेशन येथे भेट दिली यावेळी नांदेड जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहीत, अप्पर पोलीस अधीक्षक संदीप जाधव, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत शिंदे, पोलीस निरीक्षक अशोक जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश नाईक, वसंत मुळे,रेखा काळे, यांच्या सह उपनिरीक्षक,व पोलीस अंमलदार उपस्थित होते. ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले, यावेळी स्टेशन पाहणी, मुद्देमाल, गुन्हे विषयक माहिती, घेऊन स्वच्छता बाबत समाधान व्यक्त केले. पाहणी संदर्भात आयोजित दौऱ्या निमित्ताने स्वच्छता करण्यात आली होती.

गौरवास्पद कामगिरी: केंद्र सरकारच्या पीएम स्वनिधी सन्मान पुरस्कारासाठी परळीची निवड !

राज्यातून तीन शहरांची निवड, २० नोव्हेंबरला नवी दिल्लीत गौरव

परळी / प्रतिनिधी

पथविक्रेत्यांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देत त्यांच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीला चालना देणाऱ्या केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री स्वनिधी (पीएम स्वनिधी) योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीबद्दल ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखालील परळी नगर परिषदेची पुरस्कारासाठी निवड झाली आहे. महाराष्ट्र राज्यासह छत्रपती संभाजीनगर, परभणी आणि परळी या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा या पुरस्कारासाठी समावेश करण्यात आला आहे. राज्यात अव्वल ठरलेल्या तीन शहरांमध्ये परळीचा समावेश आहे.त्यामुळे परळीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाच्या वतीने २० नोव्हेंबर २०२६ रोजी नवी दिल्ली येथे 'स्वनिधी सन्मान पुरस्कार २०२६' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दिल्लीतील डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल सेंटर, १५ जनपथ येथे सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम होणार आहे.पीएम स्वनिधी योजनेच्या माध्यमातून पथविक्रेत्यांना आर्थिक मदत, व्यवसायवृद्धीची संधी आणि स्वावलंबनाचा आधार देण्याचे काम केले जाते. या योजनेच्या अंमलबजावणीत परळीचा समावेश पुरस्कारासाठी झाल्याने नगर परिषदेच्या कामगिरीला राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे. परळी शहरासाठी ही निश्चितच अभिमानाची बाब आहे.



हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 (MAHARSHTRA).

पेज नंबर २ वर वाचा..
आजचा विशेष अग्रलेख..

सावध राहा, जगाच्या फुप्फुसाला भयंकर आग लागली आहे! परिणाम भयावह असतील..

दैनिक
समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकारांचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ७ वे अंक – ७१ शुक्रवार दि.२० नोव्हेंबर २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-7th Issue-71 Friday, Dt.20 November 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

दुष्काळावर मात करण्यासाठी जलसंधारणाची लोकचळवळ उभारा – ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत उत्कृष्ट ग्रामपंचायतींचा गौरव – हिंगोलीच्या दाटेगाव ग्रामपंचायतीला एक कोटी रुपयांचा विभागस्तरीय प्रथम पुरस्कार



छत्रपती संभाजीनगर, दि. १९ (विमाका) : विकसित महाराष्ट्राचे स्वप्न ग्रामीण भागातील गावे समृद्ध झाल्याशिवाय पूर्ण होणार नाही. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान गावांचा सर्वांगीण विकास करण्याची लोकचळवळ आहे. त्यामुळे सध्याच्या दुष्काळी परिस्थितीकडे जलसंधारणाची व्यापक कामे करण्याची संधी म्हणून पाहावे. प्रत्येक गावाने लोकसहभागातून जलसंधारणाची कामे हाती घेऊन दुष्काळावर मात करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी आज येथे केले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान सन २०२५-२६ अंतर्गत छत्रपती संभाजीनगर विभागातील उत्कृष्ट ग्रामपंचायतींचा विभागस्तरीय व जिल्हास्तरीय पुरस्कार वितरण सोहळा, अभियान सन २०२६-२७ संदर्भातील विभागीय कार्यशाळा आणि 'दुष्काळावर मात व समृद्ध गावाचा संकल्प' या विषयावरील परिसंवाद केंब्रिज स्कूल चौक मैदान येथे आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी श्री.गोरे बोलत होते. या सोहळ्यात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या ग्रामपंचायतींचा गौरव करण्यात आला.

याप्रसंगी इतर मागासवर्ग बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, ग्रामविकास व पंचायत राज राज्यमंत्री योगेश कदम, पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार आणि विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आमदार प्रशांत बंब, अनुराधा चव्हाण, रमेश बोरणारे, संजना जाधव, विलास भुमरे, नारायण कुचे, सुहास शिरसाट, राज्यस्तरीय अभ्यास समितीचे अध्यक्ष रितेश वानखडे (राज्यमंत्री दर्जा), इंद्रीस मुलतानी (राज्यमंत्री दर्जा), जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल, सभापती संजय गराड, कल्याण गायकवाड, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांच्यासह विभागातील विविध जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती, पंचायत समिती पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी आणि विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंत्री जयकुमार गोरे म्हणाले की, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेवटच्या नागरिकापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. ग्रामपंचायतींना सक्षम करून गावातील पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, जलसंधारण आणि नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणणे हा अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेणे आवश्यक आहे. यापूर्वी जलयुक्त शिवार अभियान आणि पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून लोकसहभागाची चळवळ उभी राहिली होती. त्याच धर्तीवर गावागावांत जलसंधारणाची कामे व्हावीत, यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात जलसंधारणाच्या कामांना सर्वाधिक गुण देण्यात आले आहेत. लोकप्रतिनिधी, सरपंच, ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी आणि ग्रामस्थांनी या कामांसाठी एकत्र यावे, असे त्यांनी सांगितले.

अभियानातील पुरस्कारांसाठी ग्रामपंचायतींच्या कामांचे निष्पक्ष आणि पारदर्शक मूल्यमापन करण्यात आले. प्रत्येक गावातील कामांची तीन वेळा तपासणी करण्यात आल्याचे सांगून मंत्री गोरे म्हणाले की, पुरस्कार मिळविण्यापेक्षा गाव समृद्ध करणे महत्त्वाचे आहे. पुरस्कार न मिळालेल्या ग्रामपंचायतींनी निराश न होता अधिक जोमाने काम करावे. प्रशासक नियुक्त असलेल्या ग्रामपंचायतींनीही या अभियानात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

अभियानाच्या पहिल्या टप्प्यात झालेल्या विकासकामांची आकडेवारी सादर करताना मंत्री गोरे यांनी सांगितले की, राज्यातील ५ हजार ७४६ ग्रामपंचायती अभियानात सहभागी झाल्या. अभियानाच्या माध्यमातून सुमारे ६९ लाख आयुष्मान भारत कार्डे, १ लाख १० हजार दिव्यांगांना ओळखपत्रे उपलब्ध करून देण्यात आली. तसेच ४ हजार १८ ग्रामपंचायतींच्या वेबसाइट तयार करण्यात आल्या आणि ४ हजार ४७ ग्रामपंचायतींमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली.

अभियान कालावधीत ३ लाख ५९ हजार घरे पूर्ण झाली, तर घरकुलासाठी जागा नसलेल्या ५४ हजार ४७७ भूमिहीन लाभार्थ्यांना जमीन उपलब्ध करून देण्यात आली. विविध योजनांच्या समन्वयातून २ हजार ७०६ किलोमीटर गावांतर्गत रस्ते आणि २ हजार ७३० किलोमीटर पाणंद रस्त्यांची कामे करण्यात आली.

याशिवाय ५ हजार ११८ स्मशानभूमींमध्ये सुविधा उपलब्ध करून देणे, २ हजार ३७८ गावांमध्ये व्यायामशाळा, ४ हजार २८२ गावांमध्ये वाचनालये, १३ हजार २३९ शाळांमध्ये मुलांसाठी आणि १२ हजार ४८७ शाळांमध्ये मुलींसाठी शौचालयांची सुविधा निर्माण करण्यात आली. अभियान कालावधीत ८१५ कोटी रुपयांची घरपट्टी आणि २४१ कोटी रुपयांची पाणीपट्टी वसुली झाली. तसेच ग्रामपंचायतींच्या माध्यमातून सुमारे ६७ लाख वृक्षांची लागवड करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या कामगिरीचे रिपोर्ट कार्ड तयार करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. अभियान यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेणाऱ्या सरपंच, ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी व कर्मचाऱ्यांचे त्यांनी विशेष कौतुक केले. उपस्थितांना अभियानात सक्रिय सहभाग घेऊन आपले गाव समृद्ध करण्याचा सामूहिक संकल्प करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

दुष्काळमुक्तीसाठी प्रत्येक गावाने पुढाकार घ्यावा – अतुल सावे

इतर मागासवर्ग बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे म्हणाले की, मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी प्रत्येक गावाने पाण्याचा प्रत्येक थेंब साठविण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे. 'जलतारा' शोषखड्डे, तलाव व विहिरींमधील गाळ काढणे, बोअरवेल पुनर्भरण, जलसंधारण आणि पाणीपुरवठ्याच्या कामांना प्राधान्य द्यावे. नदीजोड आणि वॉटर ग्रीड यांसारखे प्रकल्प भविष्यातील जलसुरक्षेसाठी महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

ग्रामपंचायतींनी सौरऊर्जेचा वापर वाढवावा. शेतीसाठी सौरपंप तसेच घरांवर सौरऊर्जा प्रकल्प उभारून विजेच्या खर्चात बचत करावी. उत्कृष्ट ग्रामपंचायतींना मिळालेले पुरस्कार हे गावातील एकजूट, लोकसहभाग आणि पारदर्शक कारभाराची पोचपावती आहेत. दुष्काळ निवारणासाठी राज्य शासन ग्रामपंचायती आणि नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

लोकसहभाग हाच अभियानाचा गाभा – योगेश कदम

ग्रामविकास व पंचायत राज राज्यमंत्री योगेश रामदास कदम म्हणाले की, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या माध्यमातून केंद्र, राज्य व जिल्हास्तरावरील विविध योजनांचा समन्वय साधण्यात येत आहे. त्यामुळे गावातील विकासकामांना गती मिळत असून नागरिकांमध्ये योजनांविषयी जागरूकता वाढली आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जलसंधारण आणि पाणीसाठवणुकीची कामे लोकसहभागातून करणे आवश्यक आहे. दापोली तालुक्यात लोकसहभागातून शासनाच्या निधीचा वापर न करता सुमारे १ हजार १०० वनराई बंधारे उभारल्याचे उदाहरण त्यांनी दिले. कोणतेही अभियान नागरिकांच्या सक्रिय सहभागाशिवाय यशस्वी होऊ शकत नाही. त्यामुळे ग्रामपंचायतींनी लोकसहभाग वाढवून अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात अधिक प्रभावी कामगिरी करावी, असे आवाहन त्यांनी केले.

दाटेगावला विभागस्तरीय प्रथम पुरस्कार

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान सन २०२५-२६ अंतर्गत विभागस्तरीय अत्युत्कृष्ट ग्रामपंचायत पुरस्कारांमध्ये हिंगोली जिल्ह्यातील दाटेगाव (ता. जि. हिंगोली) ग्रामपंचायतीने प्रथम क्रमांक मिळविला. या ग्रामपंचायतीला एक कोटी रुपयांचे पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे.

लातूर जिल्ह्यातील आनंदवाडी (गौर), ता. निलंगा ग्रामपंचायतीने द्वितीय क्रमांक मिळवून ८० लाख रुपयांचे, तर वंजरवाडी, ता. जि. बीड ग्रामपंचायतीने तृतीय क्रमांक मिळवून ६० लाख रुपयांचे पारितोषिक पटकाविले.

छत्रपती संभाजीनगर जिल्हास्तरीय अत्युत्कृष्ट ग्रामपंचायत पुरस्कारांमध्ये लाडगाव/हिवरा, ता. छत्रपती संभाजीनगर ग्रामपंचायतीने प्रथम क्रमांक मिळवून ५० लाख रुपयांचे पारितोषिक पटकाविले. जरंडी, ता. सोयगाव ग्रामपंचायतीने द्वितीय क्रमांक मिळवून ३० लाख रुपये, तर पाटोदा, ता. छत्रपती संभाजीनगर ग्रामपंचायतीने तृतीय क्रमांक मिळवून २० लाख रुपयांचे पारितोषिक पटकाविले.

जलतारा शोषखड्डे व गुणांकनाबाबत तज्ज्ञांचे मार्गदर्शन

यावेळी निवृत्त भारतीय प्रशासकीय सेवा अधिकारी तथा यशदाचे उपसंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानातील विविध गुणांकन निकषांबाबत मार्गदर्शन केले. पद्मश्री पुरस्कारप्राप्त तथा आदर्श गाव हिवरे बाजारचे प्रवर्तक पोपटराव पवार यांनी दुष्काळी परिस्थितीतही ग्रामपंचायतींनी अभियानात प्रभावी सहभाग कसा घ्यावा, याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांनी पाणी अडविण्यासाठी उपयुक्त असलेल्या 'जलतारा' शोषखड्ड्यांच्या निर्मिती व जलसंधारण प्रक्रियेविषयी मार्गदर्शन केले.

हिंगोलीतील सर्व ५६३ ग्रामपंचायतींचा सहभाग

हिंगोली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी अभियानाच्या अंमलबजावणीचे पीपीटीद्वारे सादरीकरण केले. हिंगोली जिल्ह्यातील ५६३ पैकी ११८ ग्रामपंचायती मागील अभियानात सहभागी झाल्या होत्या. नव्या टप्प्यात जिल्ह्यातील सर्व ५६३ ग्रामपंचायतींनी सहभाग नोंदविला आहे.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अपर आयुक्त सुषमा देसाई यांनी केले.

दुष्काळावर मात करण्यासाठी लोकचळवळ आवश्यक – मेघना साकोरे-बोर्डीकर

राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या की, विकसित भारत २०४७ चे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ग्रामीण भागातील प्रत्येक गाव समृद्ध झाले पाहिजे. मराठवाड्यातील दुष्काळावर मात करण्यासाठी महिला बचत गट, लखपती दीदी, तरुण पिढी, सरपंच, ग्रामसेवक आणि प्रशासनाच्या सहभागातून लोकचळवळ उभी करावी. पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हिवरे बाजारच्या ग्रामविकासाचा आदर्श तसेच 'जलतारा' जलसंधारण उपक्रमाची संकल्पना गावागावांत पोहोचवावी. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात सर्व ग्रामपंचायतींनी सहभागी होऊन जलसमृद्ध गावांचा संकल्प प्रत्यक्षात आणावा, असे त्यांनी सांगितले.

ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार म्हणाले की, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातील १०० टक्के ग्रामपंचायतींचा सहभाग बंधनकारक करण्यात आला आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीने १०० पैकी किमान ७० गुण मिळविणे आवश्यक आहे. अभियानातील आठ प्रमुख घटकांची ग्रामसभांच्या माध्यमातून माहिती देऊन नागरिकांचा सहभाग वाढवावा.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी प्रास्ताविकात सांगितले की, हा कार्यक्रम केवळ पुरस्कार वितरणाचा नसून दुष्काळावर मात करून प्रत्येक गाव समृद्ध करण्याची संकल्पसभा आहे. कार्यक्रमस्थळी सुमारे २ हजार ६०० ग्रामपंचायतींचे सरपंच व उपसरपंच उपस्थित असून, मराठवाड्यातील ७ हजार ६८९ ग्रामपंचायतींमध्ये कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

दाटेगावला विभागस्तरीय प्रथम पुरस्कार


मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान सन २०२५-२६ अंतर्गत विभागस्तरीय अत्युत्कृष्ट ग्रामपंचायत पुरस्कारांमध्ये हिंगोली जिल्ह्यातील दाटेगाव (ता. जि. हिंगोली) ग्रामपंचायतीने प्रथम क्रमांक मिळविला. या ग्रामपंचायतीला एक कोटी रुपयांचे पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे.

लातूर जिल्ह्यातील आनंदवाडी (गौर), ता. निलंगा ग्रामपंचायतीने द्वितीय क्रमांक मिळवून ८० लाख रुपयांचे, तर वंजरवाडी, ता. जि. बीड ग्रामपंचायतीने तृतीय क्रमांक मिळवून ६० लाख रुपयांचे पारितोषिक पटकाविले.

छत्रपती संभाजीनगर जिल्हास्तरीय अत्युत्कृष्ट ग्रामपंचायत पुरस्कारांमध्ये लाडगाव/हिवरा, ता. छत्रपती संभाजीनगर ग्रामपंचायतीने प्रथम क्रमांक मिळवून ५० लाख रुपयांचे पारितोषिक पटकाविले. जरंडी, ता. सोयगाव ग्रामपंचायतीने द्वितीय क्रमांक मिळवून ३० लाख रुपये, तर पाटोदा, ता. छत्रपती संभाजीनगर ग्रामपंचायतीने तृतीय क्रमांक मिळवून २० लाख रुपयांचे पारितोषिक पटकाविले.

त्रिपुरारी पौर्णिमा, गुरुनानक जयंतीनिमित्त कंकालेश्वर मंदिरात भव्य दीपोत्सव व महाआरतीचे आयोजन

हजारो दिव्यांनी शिवनगरी बीड उजळणार समस्त बीडकरांना सहकुटुंब सहभागी होण्याचे शिवप्रेमींचे आवाहन



बीड प्रतिनिधी

ऐतिहासिक आणि धार्मिक वारसा लाभलेल्या बीड नगरीतील श्री क्षेत्र कंकालेश्वर महादेव मंदिर परिसरात त्रिपुरारी पौर्णिमा, गुरुनानक जयंती, देव दिवाळी तसेच कार्तिक पर्वाच्या समाप्तीनिमित्त मंगळवार, दि. २४ नोव्हेंबर २०२६ रोजी भव्य दीपोत्सव व महाआरतीचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ४ वाजल्यापासून या भक्तिमय सोहळ्याला प्रारंभ होणार असून, हजारो दिव्यांच्या प्रकाशाने शिवनगरी कंकालेश्वर उजळून निघणार आहे.

बीडच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेला उजाळा देणारा हा दीपोत्सव केवळ दिव्यांचा उत्सव नसून श्रद्धा, भक्ती, संस्कृती आणि बीडकरांच्या एकजुटीचे प्रतीक ठरणार आहे. श्री क्षेत्र कंकालेश्वर महादेव मंदिराच्या पवित्र सान्निध्यात होणाऱ्या या सोहळ्यात महाशिवाची भव्य महाआरती करण्यात येणार आहे.

घराघरांत साजरी होणारी देव दिवाळी यंदा आपल्या आराध्य दैवताच्या चरणी हजारो दिवे प्रज्वलित करून सामूहिक भक्तीच्या माध्यमातून साजरी करण्याचा संकल्प समस्त शिवप्रेमी बीडकरांनी केला आहे. प्रत्येक नागरिकाने किमान एक दिवा श्रद्धेने प्रज्वलित करावा आणि आपल्या सहभागातून दीपोत्सवाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

या महादीपोत्सवात माता-भगिनी, युवक-युवती, ज्येष्ठ नागरिक तसेच लहान बालगोपाळांनी आपल्या कुटुंबासह मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. सर्व बीडकरांनी एकत्र येत भक्ती, श्रद्धा आणि सामाजिक एकतेचा अनोखा संदेश द्यावा, अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे.

दीपोत्सवात सहभागी होताना लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांची विशेष काळजी घ्यावी. दिवे प्रज्वलित करताना सुरक्षित अंतर ठेवून आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

एक दिवा भक्तीचा, एक दिवा श्रद्धेचा, एक दिवा संस्कृतीचा आणि एक दिवा आपल्या बीडच्या वैभवाचा, या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या भव्य सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी समस्त बीडकरांनी मंगळवार, दि. २४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता श्री क्षेत्र कंकालेश्वर महादेव मंदिर येथे सहकुटुंब उपस्थित राहावे, असे नम्र आवाहन तुम्ही-आम्ही समस्त शिवप्रेमी व शिवभक्त बीडकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

इंटर्नशिप भत्त्यात वाढ करण्याच्या निर्णयामुळे पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांना मिळाला मोठा आधार

महाराष्ट्र व्हेटर्नरी स्टुडंट्स असोसिएशनने मानले ना. पंकजाताई मुंडे यांचे आभार



मुंबई प्रतिनिधी :

पशुवैद्यकीय अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिप भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल महाराष्ट्र व्हेटर्नरी स्टुडंट्स असोसिएशन या विद्यार्थी संघटनेने राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांची आज भेट घेऊन आभार मानले. ना. पंकजाताईंच्या या निर्णयामुळे राज्यातील पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांना फार मोठा आर्थिक आधार मिळाला असल्याची प्रतिक्रिया असोसिएशनने यावेळी व्यक्त केली.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या पशुवैद्यक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या आंतर्वासिता निर्वाह भत्यात सात हजार रुपयांची वाढ करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत घेण्यात आला होता. त्या अगोदर महाराष्ट्र व्हेटर्नरी स्टुडंट्स असोसिएशनच्या विद्यार्थ्यांनी यासंदर्भात ना. पंकजाताई मुंडे यांची मंत्रालयात भेट घेऊन इंटर्नशिप भत्त्यात वाढ करण्याची मागणी केली होती. या मागणीची दखल घेऊन ना. पंकजाताईंनी हा विषय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडला होता.

ना. पंकजाताईंमुळे मिळाला न्याय..

इंटर्नशिप भत्त्यात वाढ करावी अशी मागणी गेल्या कित्येक महिन्यापासून आम्ही करत होतो पण ना.पंकजाताई मुंडे यांच्या एका निर्णयामुळे आम्हाला न्याय मिळाला अशी भावना स्टुडंट्स असोसिएशनचे अध्यक्ष दिनेश रत्नपारखी यांनी व्यक्त केली.

विद्यार्थ्यांना इंटर्नशिप भत्ता अकरा हजार रुपये दिला जात होता पण आता या निर्णयामुळे त्यांना दरमहा अठरा हजार रुपये निर्वाह भत्ता मिळणार आहे. यामुळे आनंदित झालेल्या राज्यातील विविध पशुवैद्यकीय महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थीनीच्या शिष्टमंडळाने आज ना. पंकजाताईंची रामटेक निवासस्थानी भेट घेऊन त्यांचे आभार मानले.

यावेळी स्टुडंट्स असोसिएशनचे अध्यक्ष रत्नपारखी यांच्यासह प्रणव पाटील, सुहाना रैना, प्रतिक सुवर्णकार, पवन राठोड, शिवरत्न वायकर, विशाल निंगोरे, वैष्णवी घुगे, जान्हवी ढोले, मैथिली गायकवाड, पुष्कर आनंदगावकर, शुभम वाडेकर, माधवी झेपाडे, दक्षिता नगिने आदी विद्यार्थी उपस्थित होते.

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)
संपादकीय
शुक्रवार दि. २० नोव्हेंबर २०२६
Friday, Dt. 20 November 2026
पान -२
PAGE - 2

संपादकीय

अग्रलेख

सावध राहा, जगाच्या फुप्फुसाला भयंकर आग लागली आहे! परिणाम भयावह असतील..

एल निनो किंवा सुपर एल निनो आणि त्यामुळे भारतासह जवळपास २२ देशांमध्ये पडलेल्या दुष्काळाचे संकट जणू या एकाच वर्षापुरते आहे आणि पुढच्या पावसाळ्यात स्थिती पूर्वपदावर येईल, असे म्हणायला तोवर काही हरकत नाही, जोवर सामान्य माणसे घाबरून जाऊ नयेत हा हेतू त्या सांगण्यामागे असतो. परंतु जागतिक तापमानवाढ, हवामानबदल अशा वैश्विक संकटांवर चर्चा करणाऱ्यांनी असा भ्रम बाळगायला नको.

कारण जगाचे फुप्फुस म्हणविल्या जाणाऱ्या ॲमेझॉन खोऱ्यातील सुपर एल-निनोच्या दुष्परिणामांचे जे तपशील पुढे येताहेत, ते अंगावर काटा आणणारे आहेत. मानवी समुदायाच्या भविष्याचा विचार करता धडकी भरवणारे आहेत. प्रशांत महासागराच्या विषुववृत्तीय किंवा मध्य-पूर्व टापूत समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान वाढणे म्हणजे एल निनो. ती वाढ अर्धा ते एक डिग्री सेल्सिअस असेल तर सामान्य एल निनो आणि त्यापेक्षा अधिक असेल तर सुपर एल निनो. यंदाची तापमानवाढ तब्बल २ डिग्रीपेक्षा अधिक असल्याने दीडशे वर्षांपूर्वीसारखी १८७७-७८ मधील स्थिती निर्माण झाल्याचे, हा भयंकर सुपर एल निनो असल्याचे मानले जाते. दीडशे वर्षांपूर्वी पृथ्वीवरील वृक्षाच्छादन, निसर्गसंपदा, पर्यावरणाचा समतोल आणि मधल्या काळात आपण केलेला विनाश हे पाहिले, तर यावेळच्या सुपर एल-निनोच्या दुष्परिणामाची कल्पना केली जाऊ शकते. त्यामुळेच दुष्काळाचा सामना करणाऱ्या देशांतच नव्हे, तर जगभर चिंता आहे.

सर्वाधिक चिंता ॲमेझॉन खोऱ्यातील निसर्गाच्या हानीची आहे. कारण अनेक बाबतीत हे खोरे म्हणजे जगाचे फुप्फुस आहे. जागतिक जलचक्र व पर्जन्यमानाला दिशा देणारे, आठ देश व्यापलेले ७० लाख चौरस किलोमीटर क्षेत्रफळाचे जगातील सर्वांत मोठे नदीखोरे, पेरूमधील ॲन्डीज पर्वताच्या उगमापासून अटलांटिक महासागराच्या मुखापर्यंत साडेसहा हजार किलोमीटर लांबीचा हा महाकाय नद, एरव्ही ३ ते १० किमी आणि फुगल्यानंतर तब्बल ४८ किमीपर्यंत रुंदी.

ही प्रणाली सुपर एल निनोमुळे संकटात आली आहे. समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान साडेतीन-चार डिग्रीपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. २०२३-२४ मधील एल-निनोच्या परिणामातून हे खोरे सावरलेले नाही. यंदा पुन्हा नद्या नीचांकी पातळीवर पोहोचल्या आहेत. पर्जन्यवनांची होरपळ सुरू आहे. जंगलाला वणवे लागत आहेत. ऑक्टोबर महिन्यात केवळ ब्राझीलच्या ॲमेझोनस राज्यात आगीच्या २,२७१ घटना नोंदविल्या गेल्या. संपूर्ण खोऱ्यात सुमारे १५.८ दशलक्ष हेक्टर जंगल जळले आहे. म्हणजे इंग्लंडपेक्षा अधिक क्षेत्रफळ उघडेबोडके झाले. यापैकी बराच भाग प्रयत्न केला तरी सात वर्षांत पूर्वपदावर येणार नाही. जंगलातील आगीने प्रदूषणाची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. मॅनॉससारख्या शहरात धुरामुळे हवेची गुणवत्ता पीएम २.५ पेक्षा अधिक घसरली. शाळा बंद ठेवाव्या लागल्या. वणव्यात केवळ झाडे जळतात, वाचलेल्या झाडांची वाढ मंदावते असे नाही. आगीनंतर जंगल अधिक ज्वलनशील होते. पुढचे दशकभर वणव्यांची साखळी तयार होते. त्याचे दुष्परिणाम जगाला भोगावे लागतील. कारण ॲमेझॉनचे जंगल अब्जावधी टन कार्बन डायऑक्साइड वायू शोषून घेते. याला कार्बन सिंक म्हणतात. अमर्याद वृक्षतोड, जंगले विरळ झाल्यामुळे ही कार्बन सिंक स्थिती बदलली आहे. यासोबतच हे जंगल मोठ्या प्रमाणात ऑक्सिजनची निर्मिती करते. बाष्पीभवनातून ॲमेझॉन जंगल स्वत:ची पर्जन्यसाखळी उभी करते. त्याला फ्लाइंग रिव्हर्स किंवा हवेतल्या नद्या म्हणतात. त्यातून ढग तयार होतात व पाऊस पडतो. ही प्रक्रिया धोक्यात आली आहे. वर्षावने अडचणीत आहेत. ती नष्ट होऊन गवताळ कुरणे तयार होतील, अशी अभ्यासकांना भीती आहे. तसे झाले तर तो पर्यावरणशास्त्राच्या भाषेतील टिपिंग पॉइंट असेल. म्हणजे असा टप्पा जिथून झालेले बदल उलटवणे शक्य नाही. एकप्रकारे न थांबविता येणारी घसरण. ॲमेझॉनच्या बाबतीत सांगायचे, तर नव्याने तयार होणाऱ्या कुरणांमधून पुन्हा वर्षावने उभी करणे शक्य होणार नाही. त्यावर आधारित माणूस, प्राणी-पक्षी असे जीवनचक्र प्रभावित होईल. दुष्काळ, महापूर, वणवे वाढतील. जैवविविधता संकटात येईल. आपल्या भाषेत हा टिपिंग पॉइंट म्हणजे गडावरून उतरण्याचा दोर कापून टाकणे. आता लढा किंवा कड्यावरून उड्या टाकून कपाळमोक्ष करून घ्या!

धन्य धन्य नामदेवा । केला उपकार जीवा ।।

सोनपेठ -

अखंड भारतातील महाराष्ट्र राज्य आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारे अत्यंत महत्वपूर्ण राज्य! एकूण सर्वच बाबींचा विचार केला असता केवळ भारत देशालाच नव्हे तर जगाला नवी दिशा दाखवण्याचे काम महाराष्ट्राने केले आहे असे म्हणणे वावगे ठरू नये. त्यात शैक्षणिक, सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात महाराष्ट्राचे योगदान मोलाचे राहिले आहे. महानुभाव, लिंगायत आणि वारकरी चळवळीने इथली वर्ण, लिंग आणि जातीभेदाची चौकट मोडून धर्माची भीती आणि तदनुषंगाने होणारी सामान्य माणसाची पिळवणूक, छळणूक रोखण्याचे महत्कार्य केलेले आढळून येते. त्यात वारकरी संप्रदाय अग्रेसर राहिला आहे. त्यात नरसी बामणी येथून पंढरपूरला जाऊन वारकरी सांप्रदायामध्ये क्रांती करण्याचे महत्कार्य एका युवकाने केले, तो म्हणजे नामदेव. मुळातच लढवय्या असणारा हा बलदंड युवक सात फूट उंच आणि शंभर किलो वजन, कुणाच्याही समोर उभे राहिले तर त्याला धडकी भरल्याशिवाय राहणार नाही! त्यात आपल्या तरुण वयामध्ये नरसी ते औंढा नागनाथ अशी घोड्यावर वारी केल्याचे दाखले नामदेव चरित्रात आढळतात. त्यातच आपल्या घराची पंढरपूरची वारी नियमित रहावी या न्यायाने त्यांचे संपूर्ण कुटुंब पंढरपूरला स्थायिक झाले.

तो काळ मोठा खडतर होता. प्रस्थापितांच्या वर्णवर्चस्वाखाली पांडुरंग बंदिस्त होता. ब्राह्मणेत्तरांना मंदिर प्रवेश बंदी होती. अशा काळात, ''सर्वांना ईश्वराने समान निर्माण केले असताना एकाला दर्शन आणि एकाला नाही असे कसे?'' या न्यायाने नामदेवानी बडवे, डिंगरांना दर्शनासाठी विनंती केली. ''तू शूद्र शिंपी आहेस. शूद्रांना श्री विठ्ठल दर्शनाचा अधिकार नाही'' म्हणून नामदेवाला बडव्यांनी हाकलून लावले. मुळातच नामदेवाचा स्वभाव क्रांतिकारी, बंडखोर! परिणामी विनंती करून ऐकत नसतील तर ताकदीने आपण पांडुरंगाचे दर्शन घेऊ असे ठरवून आपल्या शक्तीनिशी मंदिरामध्ये प्रवेश केला आणि दर्शन घेतले. बलदंड नामदेवांना विरोध करण्याची कुणाची हिंमत झाली नाही. पाहता पाहता पंढरपूर परीक्षेत्रांमध्ये नामदेव परिचित झाले. याचा परिणाम म्हणजे सामान्य शेतकरी वारकऱ्यांचा त्यांना पाठिंबा मिळाला. नामदेवांची संत प्रभावळ निर्माण झाली. उपेक्षित वंचित जातीतून आलेले वर्णव्यवस्थेने धिक्कारलेले विठ्ठलाचे वारकरी संत नामदेवाच्या पाठीशी उभे राहिले. ज्येष्ठ वारकरी संत सावतोबा. संत गोरोबा, संत सेना, जनाबाई आदि सर्व संत नामदेवासोबत खंबीरपणे उभे राहिले. त्यात विशेष म्हणजे संत चोखामेळा महाराजांचा विशेष उल्लेख करावा लागेल.

पुढे त्यांना श्री विठ्ठलाचा एवढा ध्यास लागला की त्यांनी सहजच भजन करत कीर्तनात उभे राहिले. आश्चर्य म्हणजे ते अभंग लिहू लागले. अभंग काव्यप्रकाराची निर्मिती करणारा आद्य क्रांतिकारक म्हणजे संत नामदेव! अभंग महाराष्ट्राला देऊन प्रचंड उपकार केले आहेत! तेंव्हा पैठण क्षेत्रात निवृत्तीनाथादी बंधूंना प्रस्थापित ब्राह्मणांनी प्रचंड छळले. ज्ञानदेवादी भावंडांना जाती बहिष्कृत केले गेले. ब्राह्मण असून वर्णव्यवस्थेचा आघात ह्या चार भावंडांवर झाला. त्याच काळात या भावंडांना पंढरपूरमधील वारकरी क्रांती माहिती झाली. मग ही भावंड पंढरपूरच्या दिशेने जाऊन नामदेवांचा वारकरी पंथ स्विकारला. नामदेवांना ज्ञानदेवासारखा एक जिवलग मित्र मिळाला. पुढे नामदेव-ज्ञानदेवांनी वारकरी संप्रदायाची आचार विचार हा स्वातंत्र्य समता बंधुता मार्गाने नेतांना एक मोठी लोक चळवळ उभी केली. त्याच काळात विशेष म्हणजे तत्कालीन उपेक्षित वंचित महारजातीतून आलेले श्री संत चोखामेळा महाराज यांना आपल्या हृदयाशी धरले, संप्रदायामध्ये आपल्या बरोबरीचे स्थान दिले. स्वतः प्रमाणे संत चोखामेळा महाराजांना कीर्तनासाठी वाळवंटात उभे केले. ही साधी गोष्ट नव्हती. एक अस्पृश्य, वर्णबहिष्कृत असलेल्या माणसाला वारकरी कीर्तन करण्याची ताकद देणारा नामदेव म्हणजे आद्य महान क्रांतिकारक, विचारवंत! त्यातूनच

धन्य धन्य नामदेवा। केला उपकार जीवा ।।१।।
माझा निरसिला भेवो। दाखविला पंढरिरावो।।२।।
मंत्र सांगितले सोपा। निवारिले भवतापा।।३।।
माझ्या कृपेची माउली । चोखा म्हणे पान्हा घाली।।४।।

असे अभंग लिहून संत नामदेवांची कृती-कीर्ती अजरामर केली.

असे असले तरी तेंव्हा सर्वांना विठ्ठल मंदिरात प्रवेश नव्हता. तेंव्हा चंद्रभागेच्या वाळवंटात एकत्र बसून विचार विनिमय केला आणि विचारांती असे ठरले की यानंतर श्री विठ्ठल मंदिरामध्ये दर्शनासाठी जाण्याचा वाद करायचा नाही. श्री विठ्ठल चराचरात आहे. द्वैतभाव संपून अद्वैतभाव पेरण्याचं काम नामदेवांनी केले. माणसामध्ये असणारा हा श्री विठ्ठल! आपण वाळवंटामध्ये भावविभोर होऊन आनंदाने भजन कीर्तन करू. भावाचा भुकेला असलेला श्री विठ्ठल नक्कीच आपल्यामध्ये येऊन नाचल्याशिवाय राहणार नाही! याचा परिणाम म्हणजे ''नामदेव कीर्तन करी पुढे देव नाचे पांडुरंग'' असे झाले. कीर्तनाद्वारे सामन्यांच्या घराघरात ज्ञानदीप लावण्याचे महान कार्य नामदेवांनी केले. मंदिरातील श्री विठ्ठल वाळवंटात आणून सामान्यांच्यामध्ये उभा केला! ही ताकत नामदेवाच्या भजन, कीर्तन, भक्ती आणि नामाची होती. त्याला सर्व संतांच्या मांदियाळीची भक्कम जोड होती.

संत नामदेव एवढ्यावर थांबले नाहीत. त्यांनी आपल्या समकालीन संतांची चरित्रे लिहिली. त्यामुळे संत नामदेव आद्य संत चरित्रकार ठरतात. दुसरीकडे ज्ञानदेवादी भावंडांना धीर-आधार देऊन भारतभर तीर्थयात्रेसाठी सोबत घेतले. त्यात ज्ञानदेवही आत्मप्रतिभेने श्रेष्ठ ठरले. ज्ञानदेवांनी सुद्धा नामदेवाप्रमाणे क्रांतिकारी काम केले. वेदाने दुर्ग्यम ठरवलेल्या श्रीमद् भगवद्गीतेवर मराठीमध्ये ज्ञानेश्वरी सारखा अलौकिक टीका ग्रंथ निर्माण करून मराठी सारस्वतांवर अनंत उपकार केले आहेत. असे हे सन्मित्र नामदेव-ज्ञानदेव आम्हा वारकऱ्यांचे नित्य हृदयस्थ आहेत. नामदेवांच्या लढाऊ बाण्यामुळे ज्ञानदेवादी इतर सर्वच वारकऱ्यांना वारकरी चळवळीमध्ये जोमाने कार्य करण्याचे बळ मिळाले. त्यामुळे संत नामदेव हे केवळ कीर्तनकार, अभंग लेखक, संत चरित्रकार न ठरता ते खऱ्या अर्थाने वारकरी चळवळीचे मुहूर्तमेढ होणारे आद्य क्रांतिकारक वारकरी संत आहेत!

सज्जनहो, नामदेवांना जाऊन एवढा काळ लोटला आहे. पंढरपूरच्या वाळवंटातून स्वातंत्र्य समता बंधुतेची उभी केलेली ही क्रांती ''वर्ण अभिमानी कोण झाले पावन ऐसे द्या सांगून मज लागी'' या संत वचनांच्या आधारावर अठरापगड जातीच्या सर्व धर्म पंथ लिंग आदि भेदाच्या पलीकडे आपला समता, एकता, स्वातंत्र्याचा महान विचार घेऊन जाणारी ही परंपरा आज वटवृक्षांमध्ये रूपांतरित झाली आहे. या वटवृक्षाचे बीज रोवणारे आद्य क्रांतिकारक संत नामदेवांचा गौरव करणे संपूर्ण महाराष्ट्राचे आद्यकर्तव्य आहे! नामदेव महाराज हे केवळ पंढरपूर पुरते मर्यादित न राहता दक्षिण-उत्तरेत वारकरी विचार पेरण्यासाठी गेले. पंजाबमध्ये गुमानगावांमध्ये जाऊन लोकांना एकत्र करून त्यांच्यातील स्वसामर्थ्य जागे करून क्रांतीचे नवे स्फुलिंग पेटवण्याचे काम नामदेवांनी केलेले इतिहासाचा पानावर नमूद आहे! त्याचा परिणाम म्हणजे शीख धर्माच्या श्री गुरु ग्रंथ साहेब या पवित्रग्रंथ ग्रंथामध्ये आपल्या नामदेवांचे एकसष्ठ अभंग समाविष्ट आहेत. आज आपण सर्वांनीच वारकरी संप्रदायाचा आचार विचार घेऊन पुढे जातांना संप्रदायाचे मूळ स्वरूप जपूया! भारतभर संत विचारांचा प्रचार प्रसार करून श्रेष्ठ-कनिष्ठता संपवून वर्णव्यवस्थेला छेद देणाऱ्या महान क्रांतिकारी नामदेवांच्या चरणी नतमस्तक होऊया!

प्रा.डॉ.विठ्ठल खंडुजी जायभाये
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ
जि. परभणी (महाराष्ट्र)
मो. ९१५८०६४०६८

लोकशाही कुणाची ? लोकांची की धनिकांची?

लोकांनी लोकांच्या हिताकरिता चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही, असे जरी आपण म्हटले, तरी 'लोक कोण?' हा प्रश्न आपल्यापुढे येतो. संविधानाच्या उद्देशिकेत 'आम्ही, भारताचे लोक' असे म्हटले आहे. पण हे भारतीय लोक नेमके कोण आहेत? ते कोणकोणत्या सामाजिक आणि आर्थिक स्तरांत राहतात? त्यांना आपले संविधानिक हक्क आणि कर्तव्ये माहीत आहेत का? ज्यांना ते लोकप्रतिनिधी म्हणून निवडून देतात, त्यांना तरी त्यांची जाणीव आहे का? लोक संविधानिकदृष्ट्या साक्षर झाले आहेत का?

या भारतीय लोकांची मने संविधानातील समता आणि नीतीच्या तत्त्वांनी चालतात का? त्यांची मानसिकता संविधानवादी आहे की धर्म आणि संस्कृतीच्या आग्रहातून घडलेली आहे? ते जातिवादी अधिक आहेत की विवेकवादी? उमेदवार निवडून देताना लोक कोणत्या मानसिकतेने निर्णय घेतात? पैसा, जात, जमीन, घराणे, काम की धर्म, यातले नेमके काय पाहतात? असे अनेक प्रश्न आज आपल्या मनाला सतावत आहेत.

१९५० मध्ये संविधान लागू होऊन एका नव्या व्यवस्थेचा जन्म झाला. त्याला पंच्याहत्तर वर्षांहून अधिक काळ लोटला, तरी आजही जातीय आणि आर्थिक विषमतेच्या परिस्थितीत जगणारा भारतीय नागरिक उद्या चांगले दिवस येतील, अशी आशा बाळगून आहे. पण तो तरी नागरिक म्हणून आपल्या कर्तव्याला जागत आहे का, हा प्रश्न आज आमच्या मनाच्या रडारवर आहे. आपण सुखस्वप्नांचे इमले भरपूर बांधतोय, पण ज्याला निवडून देतोय, तो कोण आहे?

नागरिक स्वतः नीतिमान न राहता पैसे घेऊन मत देत असेल, पैसे असलेल्याच उमेदवाराला पसंती देत असेल किंवा धर्म आणि जात पाहूनच मतदान करत असेल, तर लोकशाहीचे भवितव्य काय, हा प्रश्न पडतो. कागदावर आपण संविधानाचा आदर्श सांगतो. आपल्या व्यवहारात तो किती उतरतो? त्याच घराण्यांतील उमेदवार, संस्थानिक आणि धनिकधार्जिणी माणसे वारंवार निवडून येत असतील, तर ते घडवण्यात मतदार म्हणून आपलाही वाटा आहे. लोकच एक नसतील, तर ते नेक माणूस निवडून देतील का? मतदार प्रामाणिक नसेल, तर तो प्रामाणिक उमेदवार कसा निवडून देणार? मत देताना पैशालाच महत्त्व दिले, तर धनिक उमेदवाराला आघाडी मिळणार.

लोक कुणाला आणि का निवडून देत आहेत? सर्वसाधारण मतदारसंघातून कोणाला निवडून देत आहेत? आरक्षित मतदारसंघातून कोणाला निवडून देत आहेत? निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या मनात लोकांचे कल्याण करण्याची तळमळ आहे का? या प्रश्नांवर विचार करताना मला एक गोष्ट जाणवते. निवडणुकीला उभ्या राहिलेल्या उमेदवारांपैकी आर्थिक स्थिती चांगली असलेले दोन-चार उमेदवारच अनेकदा मतदारांच्या ध्यानात राहतात. त्यांच्यापैकीच कुणाला मत द्यायचे, असा विचार होतो. त्यात जातीचा आणि धर्माचाही आधार घेतला जातो, असे मला दिसते. त्यामुळेच आपल्या लोकशाहीला 'धनिकधार्जिणी लोकशाही' असे म्हणावेसे वाटते.

या प्रश्नांमधून माझ्या मनात एक प्रश्न अधिक ठळक होतो. लोकशाही कुणाची? लोकांची की धनिकांची?

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीपूर्वी एका जाहीर कार्यक्रमात 'लाडकी बहीण' योजनेचा उल्लेख झाला.. निवडणुकीच्या काळात एवढी रोकड कुठे आणि कशासाठी फिरते? सार्वजनिक पैशातून दिलेल्या मदतीच्या बदल्यात मताची अपेक्षा करण्याचा अधिकार कुणाला दिला?

''तुम्ही बुद्धिमान आहात, तुमच्यात तळमळ आहे. पण तुमच्याकडे पैसा, उद्योगधंदे, संस्था, जमीन नसेल, तर तुम्ही निवडून येऊन तरी काय उपयोग?'' मतदारांच्या या मानसिकतेकडे पाहिले पाहिजे. सरकारी कार्यालयात एखादे काम होण्यासाठी प्रभावशाली माणसाची ओळख लागते, असा अनुभव असेल, तर स्वतःचा दबदबा असलेला उमेदवार उपयोगी पडेल, असे मतदाराला वाटू शकते. यातून लोकांसाठी काम करण्याची तळमळ आणि प्रश्नांची समज यांना दुय्यम स्थान मिळते. सरकारी कार्यालयातून नियमाने काम होईल, असा विश्वास नागरिकाला असेल, तर प्रतिनिधीची निवड करताना त्याच्याकडे आपले वैयक्तिक काम काढून घेण्याचे साधन म्हणून पाहण्याची गरज कमी होईल.

निवडणुकीला उभे राहायचे म्हटले, तर प्रचारासाठी कार्यकर्ते हवेत. त्यांचा प्रवास, जेवण, प्रचारसाहित्य यांचा खर्च आहे. स्वेच्छेने काम करणारे असतात. पण रोजचा रोजगार सांभाळून सर्वांनाच किती दिवस प्रचार करता येणार? पैसे नसतील, तर कार्यकर्त्यांचे जाळे उभे कसे करणार? २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत ५४३ विजेत्यांपैकी ५०४ जणांनी किमान एक कोटीची मालमत्ता जाहीर केली होती. पक्षाचे पाठबळ, उमेदवाराची ओळख आणि स्थानिक परिस्थिती यांचाही निकालावर परिणाम होतो. तरीही मर्यादित साधनांनी निवडणूक लढवणाऱ्यांना मतदारांपर्यंत पोहोचण्याची किती संधी मिळते, हा प्रश्न या आकड्यांमुळे समोर येतो.

पैशाबरोबर जात आणि घराणेही उमेदवारीच्या निर्णयात येतात. काही अभ्यासात सुमारे पाचपैकी एक विद्यमान खासदार, आमदार किंवा विधानपरिषद सदस्य राजकीय कुटुंबातून आला होता. घराण्याबरोबर पक्षातील ओळख, निधी उभारण्याची क्षमता आणि कार्यकर्त्यांचे जाळे पुढच्या पिढीकडे जाते. जातीचे संख्याबळ आणि व्यवसायावरून ठरणारी सामाजिक प्रतिष्ठा यांचा हिशेबही उमेदवारीत लावला जातो. कोणत्या जातीचा उमेदवार उभा करायचा आणि त्याला किती साधने द्यायची, हे आर्थिक व संघटनात्मक बळ असणारे ठरवत असतील, तर दुर्बल गटातून आलेल्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाला किती वाव राहतो? पक्षाच्या पाठबळाने प्रतिनिधित्वाची संधी खुली होऊ शकते. पण 'हा आपले ऐकेल का?' हाच उमेदवारीचा निकष झाला, तर निवडून आल्यावर प्रतिनिधी कुणाची बाजू घेणार?

मतदार म्हणून आपणही या व्यवहाराचा भाग आहोत. अनेकदा मत देणारयांनी रोख रक्कम, मद्य किंवा भेटवस्तूंचे वाटप उमेदवार निवडताना महत्त्वाचे मानले. त्या सर्वेक्षणावरून किंवा रोकड जप्तीच्या नोंदीवरून प्रत्यक्ष किती मते बदलली, हे ठरवता येत नाही. तरीही



आपल्याला स्वतःला विचारावे लागेल. 'मी ह्यांचा, मी त्यांचा' असे सांगताना आपल्या गटाच्या नेत्याला जाब विचारण्याचे स्वातंत्र्य आपण राखतो का? आज हातात मिळणारा पैसा, उद्याच्या अडचणीत उपयोगी पडणारी ओळख आणि आपल्या गटाचे वर्चस्व या हिशेबात शाळा, आरोग्यसेवा, रोजगार यांसारखे सर्वांचे प्रश्न मागे पडत असतील, तर धनिकधार्जिण्या राजकारणाला आपल्याकडूनही बळ मिळते.. स्वतःचा प्रचारखर्च पेलू शकणाऱ्या उमेदवाराला काही पक्ष प्राधान्य देतात. त्यामुळे मतदारासमोर येणाऱ्या प्रमुख पर्यायांमध्ये संपन्न उमेदवारांचे प्रमाण आधीपासूनच जास्त असू शकते.

पैशामुळे प्रचार अधिक लोकांपर्यंत पोहोचतो. सभा, प्रवास, प्रचारसाहित्य आणि कार्यकर्त्यांची व्यवस्था यांसाठी साधने लागतात. स्थानिक काम चांगले असलेल्या उमेदवाराकडे काय साध्य केले गेले याचा अभ्यास व्हायला हवा . राज्यभर महिलांचे दीर्घकालीन आर्थिक स्वावलंबन किती वाढले, यासाठी व्यापक मूल्यमापन हवे.. योजनेचा लाभ पात्रतेवर ठरतो आणि मत कोणाला द्यायचे, हे लाभार्थी महिला ठरवते. खर्चाचा हिशेब देण्याबरोबरच तिच्या रोजगाराच्या संधी किती वाढल्या आणि आर्थिक निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य किती वाढले, हे सरकारने सांगावे .कोणतीही अडचण नसताना केवळ स्त्री आहे म्हणून जनतेचेच पैसे वाटून मताची अपेक्षा ठेवून राहणे हे कशाचे लक्षण आहे. काही वेळा समाजकल्याण विभागातील पैसे दुसरीकडे कोणत्या कारणाने वळवले याचे उत्तर काहीजण शोधत राहतात .

उमेदवारी देताना जे अवलंबित्व तयार होते, ते निवडणुकीनंतरही तपासावे लागते. ज्या पक्षाकडून निवडून आले, तो पक्ष पैसा, पद किंवा इतर लाभांसाठी सोडला असेल, तर त्या ही साधने कमी असतील, तर त्याचे काम आणि भूमिका मतदारांपर्यंत पोहोचवणे कठीण होते मतदाराला अडचणीच्या वेळी काम करून देणारा प्रतिनिधी हवा असतो. सरकारी कार्यालयात नियमाने काम होईल, असा विश्वास कमी असेल, तर ''यांची ओळख आहे, हे आमचे काम करून देतील,'' असा विचार काही मतदार करतात. भारतातील अभ्यासांत नागरिक सरकारी लाभ मिळवण्यासाठी लोकप्रतिनिधींची किंवा स्थानिक प्रभावशाली व्यक्तींची मदत घेत असल्याचे दिसते. यात उमेदवाराची संपत्ती, ओळख आणि काम करून देण्याची त्याच्याकडून असलेली अपेक्षा एकमेकांशी जोडल्या जातात.

'लाडकी बहीण'सारख्या योजना अचानक का निर्माण झाल्या? त्यात पैसे खात्यावर कशासाठी पाठवण्यात आले ? आणि त्यातून निर्णयाचा जाब विचारला पाहिजे. संविधानाच्या दहाव्या अनुसूचीत पक्षांतरामुळे अपात्रतेची तरतूद आहे. विलीनीकरणाच्या अपवादालाही अटी आहेत. अपात्रतेचा निर्णय संबंधित प्रकरणातील तथ्ये आणि पुराव्यांवर ठरतो. जनतेचे नाव पुढे करून लोकप्रतिनिधीच जर लाभार्थी होत असतील, तर नेतृत्व तपासून पाहण्याची गरज आहे. पक्ष बदलून जनतेला काय मिळाले आणि प्रतिनिधीला काय मिळाले, हा हिशेब उघड झाला पाहिजे. संविधानाचे भान असलेले नेतेही निवडून येतात. त्यांच्यासह प्रत्येकाच्या कामाची कसोटी एकच. त्यांनी आपल्याला मत न दिलेल्यांचे प्रश्न ऐकले का? सार्वजनिक निधी गरजेनुसार वाटला का? वंचितांचे प्रश्न सभागृहात मांडून त्यांचा पाठपुरावा केला का?

संविधान या प्रश्नांना दिशा देते. उद्देशिकेतील न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांवर आपण सार्वजनिक निर्णय तपासू शकतो. अनुच्छेद ३८ आणि ३९ राज्याला विषमता कमी करण्याची, स्त्री-पुरुषांना उपजीविकेची पुरेशी साधने मिळावीत यासाठी प्रयत्न करण्याची आणि संपत्तीच्या केंद्रीकरणामुळे लोकहिताला बाधा येऊ न देण्याची दिशा देतात. अनुच्छेद ५१अ नागरिकांना वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधक वृत्ती जोपासण्याचे कर्तव्य सांगतो. या दिशेने जायचे असेल, तर राजकीय पक्षांनी उमेदवारीचे निकष आणि निधीचे स्रोत जाहीर करावेत. निवडणूक यंत्रणेने प्रचारखर्च तपासावा. सरकारने कोणत्या समाजघटकाच्या शिक्षण, आरोग्य आणि उपजीविकेच्या संधी प्रत्यक्षात वाढल्या, याचा हिशेब द्यावा.

संविधानाची साक्षरता आपल्या वर्तनात दिसली पाहिजे. उमेदवारी जाहीर झाल्यावर प्रतिज्ञापत्र पाहणे, प्रचारात आश्वासनाचा खर्च आणि त्यासाठी पैसा कुठून येणार हे विचारणे, निवडणुकीनंतर ग्रामसभेत किंवा स्थानिक संस्थेत कामाचा हिशेब मागणे आणि आपल्या गटाने केलेल्या अन्यायालाही विरोध करणे, इथून विवेकाची सुरुवात होते.

लोकशाही सर्व नागरिकांच्या कल्याणाची जबाबदारी घेणारी हवी. ज्यांच्याकडे पैसा, जमीन किंवा सत्तेतील ओळख नाही, त्यांनाही आपले हक्क मिळवण्यासाठी कोणाच्या दारात जावे लागू नये. शिक्षण, आरोग्य आणि उपजीविकेच्या संधी सर्वांना मिळाव्यात. निवडून आलेल्या प्रतिनिधीने संबंधित नागरिकाने आपल्याला मत दिले की नाही, याचा विचार न करता त्याची अडचण ऐकली पाहिजे. ज्यांच्या वाट्याला आजवर सर्वांत कमी संधी आल्या, त्यांच्या आयुष्यात आपल्या निर्णयांनी काय बदल घडवला, याचा हिशेब त्याने जनतेला दिला पाहिजे.

अशी लोकशाही घडवण्यासाठी नागरिकांची सजगता मतदानाच्या दिवसापूर्वीच सुरू झाली पाहिजे. उमेदवाराचे प्रतिज्ञापत्र पाहावे. त्याने आपल्या भागासाठी काय केले, कोणते प्रश्न मांडले आणि दिलेली आश्वासने कशी पूर्ण करणार, हे त्याला विचारावे. उमेदवाराची संपत्ती, जात, धर्म किंवा घराणे यांचा आपल्या निर्णयावर किती प्रभाव पडतो, हेही आपण तपासावे. मतासाठी देऊ केलेले पैसे किंवा भेटवस्तू नाकाराव्यात. निवडणुकीच्या काळात एखादी बातमी किंवा चित्रफीत आपल्याला कितीही पटली, तरी तिची खात्री करूनच ती पुढे पाठवावी.

मतदान झाल्यावरही आपली जबाबदारी संपत नाही. ग्रामसभेत किंवा प्रभागाच्या बैठकीत मंजूर निधी कुठे खर्च झाला, काम कुठवर आले आणि त्याचा लाभ कोणाला झाला, हे विचारावे. आपल्या ओळखीचे काम झाले, तेव्हा ओळख नसलेल्या नागरिकाचे कामही नियमानुसार होते का, हे पाहावे. आपल्या पसंतीच्या प्रतिनिधीलाही इतरांइतकाच जाब विचारावा. 'माझे काम झाले का?' या प्रश्नाबरोबर 'ज्यांचा आवाज सत्तेपर्यंत पोहोचत नाही, त्यांच्यासाठी काय झाले?' हा प्रश्न आपण विचारला पाहिजे. लोकशाही खरोखर लोकांची आहे की धनिकांची, हे त्या हिशेबावरून ठरेल. कागदावर संविधानाचा आदर्श सांगत राहिलो आणि व्यवहारात पैसा, जात व घराणे यांच्याच बळावर सत्ता पुन्हा त्याच हातांत दिली, तर लोकशाहीचे भवितव्य काय असेल? या देशातले लोक विवेकी कधी आणि कसे होणार?



प्रा.डॉ.सुभाष वाघमारे
९८९०७२६४४०

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना राज्यपालांचा दिलासा; शासन खंबीरपणे पाठीशी!





लातूर।।

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी लातूर जिल्ह्याचा दौरा केला. यावेळी चाकूर तालुक्यातील आनंदवाडी येथे केळी बागेची, तर नायगाव येथे व्हीबी-जी रामजी योजनेंतर्गत सुरू असलेल्या पांदण रस्त्याच्या कामाची पाहणी केली. त्यांनी शेतकरी व मजुरांशी संवाद साधून शेतीचे नुकसान, पाणीटंचाई, जनावरांसाठी चारा आणि रोजगाराच्या प्रश्नांची माहिती घेतली.

दुष्काळाच्या संकटावर मात करण्यासाठी शासन आणि समाजाने एकजुटीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. दुष्काळ निवारणासाठी शासन तातडीच्या तसेच दीर्घकालीन उपाययो जना राबवत आहे. या प्रयत्नांमध्ये नागरिकां नीही सक्रिय सहभाग घ्यावा. या संकटका ळात सरकार शेतकऱ्यांच्या सोबत असल्याचा विश्वास राज्यपालांनी व्यक्त केला.

यावेळी पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी लातूर जिल्ह्यात अपुऱ्या पावसामुळे सोयाबीन पिकाचे मोठे नुकसान झाल्याचे सांगितले. शेतकऱ्यांना पीक विमा भरपाईसह जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, राज्यपालांच्या हस्ते जलतारा उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. तसेच विविध शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांना मंजुरी आदेश, प्रमाणपत्रे आणि प्रत्यक्ष लाभाचे वितरण करण्यात आले. यामध्ये चारा लागवडीसाठी बियाणे, ट्रॅक्टर, कडबाकुट्टी यंत्र, श्रावणबाळ योजनेची मंजुरीपत्रे तसेच अवैध सावकारीच्या ताब्यातून मुक्त झालेल्या जमिनीचे सातबारा उतारे लाभार्थ्यांना सुपूर्द करण्यात आले. ुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत असल्याचे यावेळी अधोरेखित झाले.

हदगाव मतदारसंघातील वीजप्रश्न मार्गी लावा; ऊर्जा राज्यमंत्र्यांचे निर्देश



नांदेड : हदगाव विधानसभा मतदारसंघातील वीजपुरवठ्याशी संबंधित प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवून नागरिकांना सुरळीत वीजपुरवठा उपलब्ध करून द्यावा, असे निर्देश ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिले. नवीन वीज उपकेंद्रांची उभारणी, रोहित्रांची क्षमता वाढविणे आणि वीज वितरण यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी प्राधान्याने कार्यवाही करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

ऊर्जा विभागाच्या विविध प्रलंबित प्रश्नांचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी मतदारसंघातील वीज समस्यांकडे लक्ष वेधले. कमी दाबाने होणारा वीजपुरवठा, लांब अंतरावर असलेल्या वीज उपकेंद्रांमुळे नागरिकांना व शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या अडचणी तसेच नवीन वीज उपकेंद्रांची आवश्यकता याबाबत त्यांनी विविध मागण्या मांडल्या.

या समस्यांवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी वीज वितरण व्यवस्थेतील त्रुटी दूर करणे आवश्यक असल्याचे राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी सांगितले. नवीन उपकेंद्रांची उभारणी आणि रोहित्रांची क्षमता वाढविण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने प्रस्ताव व आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश त्यांनी दिले. या बैठकीस महावितरणचे कार्यकारी संचालक चंद्रमणी मिश्रा, अंकुर कवळे, सुनील काकडे, भुजंग खंडारे तसेच अधीक्षक अभियंता नितीन काळे, संजय खंडारे आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

दुष्काळी ३०४ तालुक्यांत अनावश्यक विकासकामांना ब्रेक; पाणी-चाऱ्यासाठी निधी वळवणार!



मुंबई : राज्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन नागरिकांना पिण्याचे पाणी आणि पशुधनाला चारा-पाणी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. राज्यातील ३०४ दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये टंचाई निवारणाच्या कामांना सर्वोच्च प्राधान्य देण्याचे निर्देश नियोजन विभागाने दिले आहेत. यासंदर्भात १९ नोव्हेंबर २०२६ रोजी शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. पावसातील खंड, घटलेले जलसाठे आणि संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता जिल्हा वार्षिक योजनेतील निधीचा वापर आता प्राधान्याने पाणीटंचाई निवारणासाठी करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, दुष्काळी परिस्थिती असेपर्यंत जास्त पाणी लागणाऱ्या तसेच अत्यावश्यक नसलेल्या नवीन विकासकामांना तात्पुरती स्थगिती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

उद्यान, सुशोभीकरण आणि नवीन बांधकामांना स्थगिती : या निर्णयानुसार नवीन उद्याने, सुशोभीकरणाची कामे, प्रशासकीय इमारती, सिमेंट रस्ते आणि गटारांच्या नवीन कामांना तात्पुरता ब्रेक देण्यात येणार आहे. या कामांसाठी मंजूर असलेल्या मात्र अद्याप खर्च न झालेल्या निधीचा वापर टंचाई निवारणाच्या कामांसाठी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हा निधी ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत वळविण्याची कार्यवाही पूर्ण करण्याचे आदेश आहेत.

पाणीपुरवठा योजनांच्या कामांना प्राधान्य

गावागावांतील अपूर्ण पाणीपुरवठा योजना पूर्ण करणे, जलवाहिन्यांची दुरुस्ती, पाणी उपसा करणाऱ्या पंपांची दुरुस्ती, पाणीगळती रोखणे आणि नागरिकांना नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्यावर भर दिला जाणार आहे. त्याचबरोबर जनावरांसाठी चारा आणि पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यालाही प्राधान्य देण्यात येणार आहे.

जिल्हाधिकाऱ्यांवर नियोजनाची जबाबदारी

या शासन निर्णयाच्या प्रभावी अंमलबजा-वणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी सात दिवसांच्या आत संबंधित विभागांची बैठक घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानंतर पंधरा दिवसांच्या आत तालुकानिहाय टंचाई निवारणाचा कृती आराखडा तयार करावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे. उपसचिव नि. भा. खेडकर यांच्या स्वाक्षरीने हे आदेश जारी करण्यात आले आहेत.

एकूणच, दुष्काळी परिस्थितीत अनावश्यक विकासकामांपेक्षा नागरिकांचे पिण्याचे पाणी आणि पशुधनाचे संरक्षण महत्त्वाचे मानत शासनाने निधी वापराच्या प्राधान्यक्रमात बदल केला आहे. या निर्णयामुळे दुष्काळग्रस्त भागातील पाणीटंचाई निवारणाच्या कामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

बीडमध्ये कर्जमुक्तीच्या ८४८ तक्रारी निकाली; ४० प्रलंबित



बीड : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने हालचाली वेगवान केल्या आहेत. योजनेच्या लाभाबाबत पोर्टलवर प्राप्त झालेल्या तक्रारींचे तातडीने निराकरण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी संबंधित यंत्रणांना दिले आहेत.

या संदर्भात जिल्हास्तरीय समितीची बैठक जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत योजनेच्या अंमलबजावणीचा तसेच शेतकऱ्यांच्या तक्रारींचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून पोर्टलवर एकूण ८८८ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी प्रशासनाने ८४८ तक्रारींचे निराकरण केले आहे. मात्र, अद्याप ४० तक्रारी प्रलंबित असून त्यांचा निपटारा करण्याचे आव्हान प्रशासनासमोर आहे.

बैठकीत बँकनिहाय प्रलंबित तक्रारींची माहिती घेण्यात आली. संबंधित बँकांच्या प्रतिनिधींना प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करून पात्र शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळवून देण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

दरम्यान, ज्या शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण अद्याप पूर्ण झालेले नाही, त्यांनी ते तातडीने पूर्ण करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांना कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळण्यात कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी प्रशासनाने प्रलंबित तक्रारींचा तातडीने निपटारा करण्यावर भर दिला आहे.

मा.श्री.आर.ए. मिसाळ- यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .११६५/२०२६
बुवासाहेब वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड वाय.एच.पाटील)

ज्याअर्थी अर्जदार नामे **बुवासाहेब भागीनाथ आंधळे, रा.सुरळेगाव, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, सुरळेगाव ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांच्या वडील नामे भागीनाथ माधव आंधळे यांच्या दि.१९/१०/२०२२ रोजीची** मृत्यु नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०७/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १८/१२/२०२६

स्वाक्षरीत/- कनिष्ठ लिपीक | शिक्का | आदेशावरुन सहा. अधिक्षक फौजदारी न्यायालय, गेवराई

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा
गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, श्री.एच.एम. मोमीन यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९६३/२०२६
मुक्ताबाई व इतर वि. निरंक
(मार्फत अॅड. व्ही.आर.वराट, गेवराई)

ज्याअर्थी मयत नामे **त्रिंबक पि. मारुती सिरसट**, हे / हया दिनांक २७/०९/२०२६ रोजी **मौजे कुंभारवाडी, ता.गेवराई, जि.बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. **१ मुक्ताबाई भ्र. त्रिंबक सिरसट, वय ८० वर्षे, धंदा-घरकाम, कुंभारवाडी, ता.गे-वराई, जि.बीड अर्जदार क्र. २ वैजनाथ पि. त्रिंबक सिरसट, वय ५४ वर्षे, धंदा - शेती, रा.कुंभारवाडी, ता.गेवराई, जि.बीड अर्जदार क्र. ३ लंकाबाई भ्र. रामा समगे, वय ५० वर्षे, धंदा-शेती, रा. जोडवाडी, ता.गेवराई, जि.बीड**

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०५/११/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १४/१२/२०२६

स्वाक्षरीत /- कनिष्ठ लिपीक | शिक्का | स्वाक्षरीत/- सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई
दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई

मा.श्री.एच.एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.२ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .१०७४/२०२६
शेख जुबेर वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत अॅड एस.एस.काळे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **शेख जुबेर पि.अब्दुल रहेमान रा.गेवराई, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **न.प. गेवराई, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांच्या स्वत: नामे शेख जुबेर पि.अब्दुल रहेमान यांच्या दि.०१/७/१९८१ रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०४/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- २९/१२/२०२६

स्वाक्षरीत/- कनिष्ठ लिपीक | शिक्का | आदेशावरुन सहा. अधिक्षक फौजदारी न्यायालय, गेवराई

मा. न्यायदंडाधिकारी साहेब, शिरूर (का.), यांचे न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .१८३/२०२६
सुर्यकांत वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय, मातोरी
(मार्फत अॅड पी.पी.जरांगे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **सुर्यकांत पि. सर्जेराव घाटे, रा.मातोरी, ता.शिरूर का., जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रा.कार्यालय, मातोरी, ता.शिरूर का., जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांच्या मुलगा नामे स्वराज पि.सुर्यकांत घाटे यांच्या दि. ०३/०८/२०११ रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०३/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १९/१२/२०२६

स्वाक्षरीत/- कनिष्ठ लिपीक | शिक्का | आदेशावरुन सहा. अधिक्षक फौजदारी न्यायालय, शिरूर का.

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा
गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, श्री.एच.एम. मोमीन यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९७९/२०२६
केशरबाई व इतर वि. निरंक
(मार्फत अॅड. ए.बी.बागंर, गेवराई)

ज्याअर्थी मयत नामे **आसाराम पि.गेणु दाभाडे**, हे / हया दिनांक ३१/१०/२०२५ रोजी **मौजे चिंतेश्वर गल्ली, ता.गेवराई, जि.बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. **१ केशरबाई भ्र. आसाराम दाभाडे, वय ८० वर्षे, धंदा-घरकाम, दाभाडे गल्ली गेवराई, ता.गेवराई, जि.बीड, अर्जदार क्र. २ नारायण पि. आसाराम दाभाडे, वय ३५ वर्षे, धंदा - शेती, रा. दाभाडे गल्ली गेवराई, ता.गेवराई, जि.बीड**

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ३१/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १६/१२/२०२६

स्वाक्षरीत /- कनिष्ठ लिपीक | शिक्का | स्वाक्षरीत/- सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, बीड
दिवाणी न्यायालय, क. स्तर, बीड

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा
गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, श्री.एच.एम. मोमीन यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०२५/२०२६
द्रोपती व इतर वि. निरंक
(मार्फत अॅड. ए.बी.बागंर, गेवराई)

ज्याअर्थी मयत नामे **सुभद्राबाई पिराजी कांबळे**, हे/हया दिनांक २७/०३/२०२३ रोजी **मौजे खळेगाव, ता.गेवराई, जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत, अर्जदार क्र. **१ सरस्वती भ्र. कचरु शिंदे, वय ७२ वर्षे, धंदा-घरकाम व शेती, रा.भातकुडगांव, ता.शेवगांव, जि.अहिल्यानगर**

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०७/११/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- २१/१२/२०२६

स्वाक्षरीत /- कनिष्ठ लिपीक | शिक्का | स्वाक्षरीत/- सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई
दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा
श्री.वसंत एस.यादव साहेब ४ थे सह दिवाणी न्यायाधीश व स्तर, बीड यांचे न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १८९६/२०२६
मनिषा व इतर वि. निरंक
(मार्फत अॅड. पी.एन.जरांगे, बीड)

ज्याअर्थी मयत नामे **दिनेश पि.रामा गायकवाड**, हे / हया दिनांक ०४/०९/२०२१ रोजी **मौजे लाईफलाइन हॉस्पीटल, छ.संभाजीनगर** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. **१ मनिषा भ्र. दिनेश गायकवाड, वय ३६ वर्षे, धंदा-घरकाम, अर्जदार क्र. २ विशाखा पि. दिनेश गायकवाड, वय १८ वर्षे, धंदा - शिक्षण, अर्जदार क्र. ३ तेजस्विनी पि. दिनेश गायकवाड, वय १७ वर्षे, धंदा-शिक्षण, अज्ञान, अर्जदार क्र.४ क्रांती पि. दिनेश गायकवाड, वय १५ वर्षे, धंदा-शिक्षण, अर्जदार क्र. ५ देवयानी पि. दिनेश गायकवाड, वय १३ वर्षे, धंदा-शिक्षण, अज्ञान अर्जदार क्र. ६ रूद्राक्ष पि. दिनेश गायकवाड, वय ०८ वर्षे, धंदा-शिक्षण, अज्ञान, अर्जदार क्र. ७ हिराबाई भ्र. रामा गायकवाड, वय ६८ वर्षे, धंदा-घरकाम, सर्व रा.पाली, ता.जि.बीड.**

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०७/११/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- १६/१२/२०२६

स्वाक्षरीत /- कनिष्ठ लिपीक | शिक्का | स्वाक्षरीत/- सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, बीड
दिवाणी न्यायालय, क. स्तर, बीड

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा
गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, श्री.एच.एम. मोमीन यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९२१/२०२६
द्रोपती व इतर वि. शिवाजी
(मार्फत अॅड. ए.एस.पंडीत, गेवराई)

ज्याअर्थी मयत नामे **भगवान पि.लिंबाजी नागरगोजे**, हे/हया दिनांक १०/०२/२०२२ रोजी **मौजे रा.शेकटा, ता.गेवराई, जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत, अर्जदार क्र. **१ द्रोपती भ्र. रमाकांत जवरे, वय ७८ वर्षे, धंदा-घरकाम, रा.जवरवाडी, ता.गेवराई, जि.बीड, अर्जदार क्र. २ अर्जुन पि. भगवान नागरगोजे, वय ६४ वर्षे, धंदा - शेती, रा. शेकटा, ता.गेवराई, जि.बीड**

वि. गैरअर्जदार

शिवाजी पि. भगवान नागरगोजे, वय ६२ वर्षे, धंदा शेती, रा. शेकटा, ता.गेवराई, जि.बीड

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ३१/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :- ११/१२/२०२६

स्वाक्षरीत /- कनिष्ठ लिपीक | शिक्का | स्वाक्षरीत/- सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई
दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई

घरच्या लक्ष्मीचा सन्मान, खऱ्या लक्ष्मीपूजनाचा अर्थ..?

पिंपरी पुणे –

दिवाळी आली की सगळीकडे प्रकाश, दिव्यांचा सोहळा, सजावट आणि श्रीलक्ष्मीचे पूजन होते. घराघरात सुवासिक फुले, नवे कपडे आणि समृद्धीचे प्रतीक असलेली लक्ष्मीमूर्ती विराजमान होते. पण एक क्षण थांबून विचार करा, आपण जी लक्ष्मी पूजतो, ती आपल्या घरात आधीपासूनच नाही का ?

हो, तीच आई, पत्नी, बहीण, मुलगी.!

जी रोजच्या आयुष्यात घराचा भार उचलते, प्रेमाने आणि जबाबदारीने प्रत्येकाची काळजी घेते. तिच्या अस्तित्वाने घराला ऊब मिळते, तिच्या स्मिताने घर उजळते, तिच्या सन्मानात घराची समृद्धी टिकते. तिच्याशिवाय घर म्हणजे फक्त भिंतींचा ढाचा.

एक मुलगी जेव्हा सासरी येते, तेव्हा ती आई-वडिलांचे घर, आठवणी, स्वप्ने आणि सुरक्षितता मागे ठेवून येते. नव्या विश्वासावर, नव्या संसाराच्या आशा घेऊन ती प्रेमाचा दीप हातात धरून नवीन जीवनाची सुरुवात करते. पण काही घरांत तिला त्याऐवजी टोमणे, शंका, अपमान किंवा मानसिक त्रास दिला जातो. तिच्या भावनांचा आदर न करता तिला कमी लेखलं जातं.

ती सर्वांच्या जेवणानंतर उभी काढते, धुणीभांडी करते, घरातील प्रत्येकाची आवड-निवड जपते. कोणाला काय हवं-नको, कोणाची काय गरज आहे, हे न बोलताही तिला समजतं. संपूर्ण कुटुंबाची काळजी घेते, प्रत्येकाची जबाबदारी मनापासून पार पाडते.

पण कधी आपण थांबून तिला विचारतो का ''तुला काय हवं आहे ? तुला काय आवडतं ? तू आनंदी आहेस ना ? तुझी काही स्वप्नं आहेत का ?''

जशी ती संपूर्ण कुटुंबाची काळजी घेते, तशीच तिचीही काळजी घ्या. तिच्या आवडीनिवडी, इच्छा, भावना आणि गरजांचा विचार करा. तिच्यावर केवळ जबाबदाऱ्यांचा भार टाकण्यापेक्षा तिला समजून घ्या.

तिला दबावाखाली ठेवण्यापेक्षा तिच्या पंखांना बळ द्या, तिच्या स्वप्नांना भरारी घेण्यासाठी साथ द्या. तिच्या अस्तित्वाचा, कर्तृत्वाचा आणि स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा सन्मान करा. कारण तिलाही स्वतःचं एक मन आहे, स्वतःची स्वप्नं आहेत, स्वतःची ओळख आहे. ती केवळ कुटुंबासाठी जगणारी व्यक्ती नाही, तर स्वतःचं आयुष्य सुंदरपणे जगण्याचा पूर्ण अधिकार असलेली स्त्री आहे.

विचार करा...

घरात आलेली पत्नी किंवा सून हीच तुमच्या घरातली खरी लक्ष्मी आहे. जर तिच्या मनाला दुखावलं, तिचा अपमान केला, तिच्या कष्टांची किंमत केली नाही, तर त्या घरात सुख, शांती आणि लक्ष्मी कशी नांदेल? लक्ष्मीपूजन फक्त दिवाळीतलं नसतं. दररोजचा आदर, प्रेम, कृतज्ञता आणि तिच्या भावनांना मान देणं हेच खरं पूजन आहे.

आदर दिलात – लक्ष्मी नांदेल
त्रास दिलात – लक्ष्मी दूर जाईल

म्हणूनच,

''घरच्या लक्ष्मीची किंमत करा, तिच्या सन्मानातच घराची चिरंतन समृद्धी आहे.''



लेखिका :
प्रा. दिपाली नारायण बागानाईक
प्राध्यापिका,
डॉ. डी. वाय. पाटील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, पिंपरी, पुणे १८.

डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली २३ नोव्हेंबर रोजी अनुसूचित जाती जमाती ऐक्य परिषदेला मोठ्या संख्येने उपस्थित रहा - सतीश कापसे



बीड : डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली दि. २३ नोव्हेंबर २०२६ रोजी अनुसूचित जाती व जमाती ऐक्य परिषदेचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम *सकाळी ११.३० वाजता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड* येथे होणार आहे. या कार्यक्रमात बौद्ध धम्मांतर सोहळा, श्रामणेर शिबीर, समता सैनिक शिबीर व उपासिका शिबिर समारोप होणार आहे.

अनुसूचित जाती आणि जमातीमध्ये ऐक्य निर्माण व्हावे, समाजाने एकत्र येऊन आपल्या हक्कांसाठी लढावे, हा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला *''शिका, संघटित व्हा, संघर्ष करा''* हा संदेश घेऊनच ही परिषद काम करत आहे.

भगवान गौतम बुद्ध यांच्या समता, मैत्री, करुणा आणि अहिंसा या विचारांचा प्रसार व्हावा, समाजाने अंधश्रद्धा व व्यसन सोडून शिक्षणाकडे वळावे, यासाठी हा कार्यक्रम महत्त्वाचा आहे.

या ऐतिहासिक परिषदेला बीड जिल्ह्यातील सर्व बांधव-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन *सतीश कापसे* यांनी केले आहे.

पोलिसांना गुटख्याची माहिती दिल्याच्या संशयावरून गुटखा माफीयाची घरात घुसून पती-पत्नीला जबर मारहाण

केज/प्रतिनिधी

अवैध गुटखा विक्रीची माहिती पोलिसांना दिल्याच्या संशयावरून गुटखा माफीयांनी भर दिवसा घरात घुसून पती-पत्नीला लोखंडी पाईपने मारहाण करून दहशत निर्माण केल्याची धक्कादायक घटना केज मध्ये घडली आहे.दि.१८ नोव्हेंबर बुधवार रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास केज शहरातील प्रशांत नगर येथे घटना घडली आहे.सागर बाजीराव चाळक, आकाश बाजीराव चाळक, कृष्णा बबन चाळक आणि अनोळखी इसम एक सर्व राहणार प्रशांतनगर केज यांनी सुरेश कन्नमवार यांच्या घरात घुसून मारहाण केली.

सागर चाळक हा सुरेश कन्नमवार यांना म्हणाला की, हरामखोरा तू पोलिसांना मी गुटखा विकतो याची माहिती देऊन माझ्यावर कारवाई करायला का लावलीस ? आणि मारायला सुरुवात केली आणि याची मस्ती जिरवा असे म्हणून त्याने हातातील लोखंडी पाईपने सुरेश कन्नमवार यांना मारहाण केली तर इतराने अश्लील भाषेत शिवीगाळ करून त्याची पत्नी दैवशाला कन्नमवार व सुरेश कन्नमवार या दोघा पती-पत्नीला लाथा बुक्क्यांने व दगडाने मारहाण केली. याप्रकरणी दैवशाला कन्नमवार यांच्या फिर्यादीवरून केज पोलीस ठाण्यात सागर चाळक आकाश चाळक,कृष्णा चाळक अन्य एक या चौघां विरुद्ध गुन्हा रजिस्टर नंबर ७२१/२०२६ भा.न्या.स.११५(२),

११८(१),३३३,३५२, ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीसनिरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल बजरंग मुंडे हे पुढील तपास करत आहेत.

वरिष्ठ व निवड वेतन श्रेणी प्रशिक्षणाला मराठवाडा शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांची भेट; शिक्षकांना केले मार्गदर्शन,राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त डॉ.कविताताई गीते- कराड यांचा मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने सन्मान

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील पात्र शिक्षकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या वरिष्ठ वेतन श्रेणी व निवड वेतन श्रेणी प्रशिक्षणाला मराठवाडा शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी भेट देऊन प्रशिक्षणार्थी शिक्षकांना मार्गदर्शन केले.यावेळी मराठवाडा शिक्षक संघाचे राज्य सरचिटणीस ॲड. राजकुमार कदम सर, जिल्हा सचिव गणेश आजबे सर, तालुकाध्यक्ष मस्के सर आणि बाळासाहेब वळे सर उपस्थित होते.

तत्पूर्वी,राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते डॉ. कविताताई गीते-कराड यांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान झाल्या बद्दल मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यांच्या या राष्ट्रीय स्तरावरील गौरवामुळे संपूर्ण देशात बीड जिल्ह्याची मान उंचावली असल्याची भावनापदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. यावेळी



डॉ. कविताताई गीते-कराड यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

त्यानंतर साने गुरुजी निवासी विद्यालय,केज येथे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र,पुणे आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट),अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वरिष्ठ वेतन श्रेणी व निवड वेतन श्रेणी प्रशिक्षणाच्या वर्गाला पदाधिकाऱ्यांनी भेट दिली.यावेळी राज्य सरचिटणीस ॲड. राजकुमार कदम सर आणि जिल्हा सचिव गणेश आजबे सर यांनी उपस्थित शिक्षकांशी संवाद साधत शिक्षकांचे विविध प्रश्न, वेतनश्रेणी प्रशिक्षणाचे महत्त्व तसेच सेवा विषयक बाबींवर सविस्तर मार्गदर्शन केले.शिक्षकांनी आपल्या हक्कांबाबत जागरूक राहण्या बरोबरच शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठीही सातत्याने प्रयत्नशील राहावे,असे आवाहन त्यांनी केले.

दरम्यान, मराठवाडा शिक्षक संघाचे राज्य सरचिटणीस ॲड. राजकुमार कदम सर आणि जिल्हा सचिव गणेश आजबे सर यांचे साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले.या भेटीमुळे प्रशिक्षणार्थी शिक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.शिक्षकांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मराठवाडा शिक्षक संघ सदैव तत्पर असल्याचा विश्वास यावेळी संघाच्या पदाधिकाऱ्यांसह प्रशिक्षणार्थी शिक्षकांनी व्यक्त केला.

वरिष्ठ वेतन श्रेणी व निवड वेतन श्रेणी प्रशिक्षण -२०२६ परळी.वै येथे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण केंद्र अंबाजोगाई च्या अधिकाऱ्यांची परळी भेट

अंबाजोगाई:- प्रतिनिधी :-



परळी.वै.येथील माऊंट लिटेरा इंग्लिश स्कूल येथे गेल्या १३.११.२०२६ ते २२.११.२६ पर्यंत सुरु असलेल्या वरीष्ठ वेतन श्रेणी व निवड वेतन श्रेणी च्या प्रशिक्षणास अंबाजोगाई येथील शिक्षण व प्रशिक्षण केंद्राच्या वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ.श्रीमती भागिरथी गिरी मॅडम व डॉ.श्री.श्रीकिशन देशमुख मॅडम यांनी भेट दिली.याप्रसंगी प्रा.श्री.रमेश सरवदे सर यांनी स्वागतगीत गाऊन मान्यवरांचे स्वागत केले.

यावेळी परळी वैजनाथ येथील चारीही कुलांचे प्रशिक्षण अगदी सुरळीतपणे चालू असल्याची खात्री केली. प्रत्येक कुलामध्ये जाऊन शिक्षकांच्या उपस्थितीची नोंद घेतली. तसेच सर्व कुलप्रमुख व सुलभक शिक्षकांना व्यवस्थित प्रशिक्षण देत आहेत याचीही दखल घेतली. आणि चालू असलेले प्रशिक्षण अगदी उत्तम प्रकारे सुरु आहे असे सांगीतले. या प्रसंगी परळीचे प्रशिक्षण विभाग प्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारी मा.श्री.गोविंदराव कराड साहेब, प्रशिक्षण सहाय्यक मा.श्री. बालासाहेब दहिफळे साहेब, शालेय पोषण आहार विभाग प्रमुख मा.श्री.आशोकराव कराड साहेब, केंद्र प्रमुख मा.श्री.कुंडलिकराव गोहाडे सर, बाळकृष्ण कदमसर तसेच कुलप्रमुख मा.श्री.सुनील केंद्रे सर, मा.श्री.अमोल कांबळे सर, मा.श्री. उदय कांबळे सर आणि सुलभक म्हणुन श्रीमती.लक्ष्मि गायकवाड मॅडम, श्रीमती .ज्योती महाजन मॅडम, श्री.डी.डी. सरवदे सर, श्रीमती.प्रतिभा कटके मॅडम, श्री.शरद पवार सर, श्री.गणेश गायकवाड सर, श्री.बंकट उपाडे सर, श्री.सचिन वैरागे सर, ईथापे सर, श्री.शंकर कापसे सर, अंकुश गत्ते सर, रमाकांत दराडे सर, बोका सर, गुट्टे सर ईत्यादी मान्यवर उपस्थित होते.

पाण्यासाठी भटकंती जीवावर बेतली !लाडेवडगाव येथे साठ वर्षीय वृद्ध विहिरीत पडून गंभीर जखमी

केज/प्रतिनिधी

पाण्याची आवश्यकता असल्याने पाण्याच्या शोधात गेलेल्या साठ वर्षीय वृद्धाचाविहिरीत पडून गंभीर अपघात झाल्याची घटना केज तालुक्यातील लाडेवडगाव येथे घडली रतन घुगे असे जखमी वृद्धाचे नाव असून त्याच्यावर अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय येथे उपचार सुरू आहेत.

विशेष म्हणजे लाडेवडगाव गावातील पाणीटंचाईच्या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी दोन दिवसापूर्वीच ग्रामस्थांनी अंबाजोगाई च्या उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते. त्यानंतर उपजिल्हाधिकाऱ्यांनी गटविकास अधिकारी आणि तहसीलदारांना आवश्यक सूचना देत गावात पिण्याच्या पाण्यासाठी बोअर घेण्याची नियोजन केले होते. मात्र पाणीटंचाई चा प्रश्न सुटण्याआधीच ही दुर्दैवी घटना घडली. गुरुवार दि.१९ नोव्हेंबर रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास रतन घुगे पाण्याच्या शोधात विहिरीकडे गेले होते यावेळी अंदाज न आल्याने ते विहिरीत पडले.



घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत त्यांना विहिरीबाहेर काढले गंभीर जखमी अवस्थेत त्यांना तातडीने अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.भीषण दुष्काळा मुळे केज तालुक्यातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची भीषण तीव्रता असल्याचे समोर येत आहे.लाडेवडगाव गावातील या घटनेमुळे ग्रामीण भागातील पाणीटंचाईचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून प्रशासनाने केवळ आश्वासनावर न थांबता पाणी प्रश्न तातडीने सोडवावा अशी मागणी जनतेतून होत आहे.

शेतकऱ्यांनी रब्बी ज्वारी बियाणे मिनीकिट्ससाठी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करावी

बीडदि.१९ ,(जिमाका):- बीड जिल्ह्यातील यंदाची भीषण दुष्काळजन्य परिस्थिती आणि कमी पर्जन्यमान लक्षात घेता राज्य शासनाकडून रब्बी हंगामात शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी जिल्ह्यासाठी २० हजार रब्बी ज्वारी बियाणे मिनीकिट्सची विशेष तरतूद करण्यात आली आहे. तरी इच्छुक शेतकऱ्यांनी विहित वेळेत महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांनी केले आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियानांतर्गत पौष्टिक तृणधान्य पिकांना प्रोत्साहन देण्यासाठी सुधारित रब्बी ज्वारी बियाणे मिनीकिट वितरण योजना राबविण्यात येत आहे. कमी पाण्यात चांगले उत्पादन देणारे आणि प्रतिकूल हवामान परिस्थितीत तग धरणारे सुधारित ज्वारी वाण शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. शेतकऱ्यांना देण्यात येणारे हे बियाणे मिनीकिट ४ किलोग्रॅम वजनाचे असेल. यामध्ये प्रक्रिया केलेले सुधारित ज्वारीचे बियाणे, जैविक खताची पाकिटे आणि पीक लागवड विषयक तांत्रिक माहितीपत्रक यांसारख्या आवश्यक बाबींचा समावेश करण्यात आला आहे. अर्ज करण्यासाठी शेतकऱ्यांनी महाडीबीटीच्या अधिकृत संकेतस्थळावरील mahadbt.maharashtra.gov.in फार्मर लॉगिनचा वापर करावा. या योजनेतील लाभार्थी शेतकऱ्यांची निवड महाडीबीटी पोर्टलद्वारे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर केली जाणार आहे. योजनेबाबत सविस्तर माहिती हवी असल्यास शेतकऱ्यांनी महाराष्ट्र राज्य कृषी विभागाच्या अधिकृत संकेतस्थळाला krishi.maharashtra.gov.in भेट द्यावी. तसेच आपल्या गावातील संबंधित सहाय्यक कृषी अधिकारी, उपकृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही कृषी विभागाने प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

जिवाचीवाडीत अवैध सावकारी प्रकरणी मोठी कारवाई ; ५५ कोरे धनादेश,४ खरेदी खत जप्त,सहाय्यक निबंधक शिवराज नेहरकर यांची तिसरी धडाकेबाज कारवाई

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील जिवाचीवाडी येथे विनापरवाना अवैध सावकारी व्यवहार करणाऱ्यावर सहकार विभाग आणि पोलीस विभागाच्या संयुक्त पथकाने मोठी कारवाई केली आहे. गुरुवार, दि. १९ नोव्हेंबर २०२६ रोजी करण्यात आलेल्या या धाडीत मोठ्या प्रमाणात आक्षेपार्ह दस्तऐवज जप्त करण्यात आले आहेत. सहकार विभागाकडे केज तालुक्यातील अवैध सावकारी व्यवहारा बाबत तक्रार प्राप्त झाली होती.या तक्रारीच्या चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ च्या कलम १६ अंतर्गत जिवाचीवाडी ता.केज, जि.बीड येथील गैर अर्जदार राजाभाऊ सुखदेव केदार यांच्या राहत्या घराची झडती घेण्यात आली.

झडतीत आढळलेला मुद्देमाल–



तपासणी दरम्यान अवैध सावकारी व्यवहाराबाबत संशयित असलेले व्याज उल्लेख असलेले हिशोब,तब्बल ५५ कोरे धनादेश (ब्लँक चेक) आणि ०४ खरेदी खतांच्या प्रती पुढील चौकशीसाठी पथकाने ताब्यात घेतल्या आहेत.या प्रकरणी सावकारी कायद्यांतर्गत पुढील तपास सुरू करण्यात आला आहे.

सदर कारवाई लातूरचे विभागीय सहनिबंधक (सहकारी संस्था) नानासाहेब चव्हाण आणि बीडचे जिल्हा उपनिबंधक सतिष तोटावार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांनी या मोहिमेसाठी प्रशासकीय मदत व पोलीस संरक्षण पुरवले. पथक प्रमुख म्हणून केजचे सहायक निबंधक श्री.शिवराज नेहरकर यांनी काम पाहिले,तर पथक सहायक म्हणून श्रीमती एम.एस. वहावळे आणि व्ही.के. इंगळे यांनी सहभाग घेतला.

सहाय्यक निबंधक श्री.शिवराज नेहरकर यांच्या नेतृत्वाखाली ही तिसरी कारवाई आहे. कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून त्याची ओळख आहे. त्यांच्या या कारवाई बद्दल गोर गरीब जनतेला दिलासा मिळाला असल्याचे दिसून येत आहे. अवैध सावकारी करणाऱ्यां वर कठोर कारवाई करण्यासाठी नागरिकांनी पुढे यावे, असे आवाहन सहायक निबंधक श्री.शिवराज नेहरकर यांच्याकडून करण्यात आले आहे. अशा व्यवहारांबाबत जिल्हा उपनिबंधक कार्यालय, बीड किंवा तालुक्यातील सहायक निबंधक कार्यालयाकडे गोपनीय तक्रार दाखल करावी; तक्रारदाराचे नाव धाडीच्या कार्यवाहीपर्यंत पूर्णपणे गुप्त ठेवले जाईल, अशी माहिती त्यांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे.

डॉ.अशोक दादा थोरात यांची राजकीय एन्ट्री होणार? निवडणुकीच्या आखाड्यात तगडे आव्हान उभे करण्याची तयारी!

केज/प्रतिनिधी :

केज- अंबाजोगाई विधानसभा आणि बीड लोकसभा मतदार संघाच्या राजकीय वर्तुळात सध्या एका नव्या नावाची जोरदार चर्चा सुरू झाली असून,आरोग्य सेवेतील प्रदीर्घ अनुभव आणि प्रशासकीय कामाचा ठसा उमटविणारे डॉ.अशोक दादा थोरात हे आगामी विधानसभा निवडणुकीच्या राजकीय आखाड्यात उतरण्याच्या तयारीत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

विशेष म्हणजे, डॉ.अशोक दादा थोरात आणि त्यांच्या पत्नी डॉ.सौ. प्रतिभाताई थोरात यांनी शिवसेना शिंदे गट यांच्या माध्यमातून अंबाजोगाई, केज, किल्लेधारूरच्या वाडी- वस्त्या आणि तांड्यांवर शिवसंपर्क अभियानाच्या निमित्ताने जनसंपर्क वाढविण्यास सुरुवात केल्याने त्यांच्या राजकीय भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

डॉ.अशोक थोरात यांनी आरोग्यविभागात विविध महत्त्वाच्या पदांवर काम करताना आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. बीड जिल्ह्याचे जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून कार्यरत असताना त्यांनी आरोग्य सेवेच्या माध्यमातून उल्लेखनीय काम केले. त्यानंतर नाशिक येथे जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून जबाबदारी सांभाळली.

ऑक्टोबर २०२३ मध्ये त्यांची मुंबई येथे सहायक संचालक, आरोग्य सेवा विभाग या पदावर बदली झाली.आरोग्य प्रशासनातील अनुभव आणि राज्यस्तरावरील कामकाजाची जाण ही त्यांची जमेची बाजू मानली जाते.

डॉ.अशोक थोरात यांच्या राजकीय प्रवासालाही एक वेगळी पार्श्वभूमी आहे. केज विधानसभा मतदार संघाच्या माजी आमदार आणि तत्कालीन आरोग्यमंत्री स्वर्गीय डॉ.विमलताई मुंदडा यांचे स्वीय सहाय्यक म्हणून काम करताना त्यांनी महाराष्ट्राच्या राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली होती.

आरोग्य विभागा तील कामकाज, मंत्रालयीन पातळी वरील अनुभव आणि राजकीय नेत्यांशी असलेला संपर्क यामुळे त्यांना या भागातील राजकीय घडामोडींची चांगली जाण असल्याचे बोलले जाते. विशेष म्हणजे, आरोग्य सेवेतील निवृत्तीचा टप्पा जवळ येत असताना डॉ. अशोक थोरात यांनी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सक्रिय होण्याच्या दिशेने पावले टाकल्याचे चित्र दिसत आहे.केज विधानसभा मतदारसंघासह बीड जिल्ह्यातील राजकीय समीकरणे आगामी काळात बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अशा परिस्थितीत डॉ.अशोक थोरात यांचा वाढता जनसंपर्क, आरोग्य सेवेतील अनुभव आणि स्वर्गीय डॉ. विमलताई मुंदडा यांच्यासोबत काम केल्याचा राजकीय अनुभव



आणि डॉ. अशोक थोरात हे दांपत्य शिवसेना शिंदे गटाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांशी संवाद साधत आहे. शिवसंपर्क अभियानाच्या माध्यमा तून वाडी-वस्त्या,तांडे आणि गावागावांत पोहोचून नागरिकांच्या समस्या,अपेक्षा आणि स्थानिक प्रश्न जाणून घेण्याचा प्रयत्न सुरू आहे.डॉ.सौ.प्रतिभा ताई थोरात यामुळे त्यांच्या नावाची चर्चा अधिकच वाढली आहे.त्यांना या भागात 'दादा' म्हणून ओळखले जाते.या ग्रामीण भागातील गोर-गरीब, सर्वसामान्य, शेतकऱ्यांसी जोडलेली नाळ याचा फायदा निश्चित होणार असल्याचे बोलले जात आहे.

विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय गणिते बदलणार?

आगामी विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर डॉ. अशोक थोरात बीड जिल्ह्यातील राजकारणात सक्रिय भूमिका घेणार काय? केज अंबाजोगाई विधानसभा मतदार संघातून निवडणुकी च्या मैदानात उतरणार काय?तसेच शिवसेना शिंदे गट त्यांच्यावर कोणती राजकीय जबाबदारी सोपविणार याबाबत सध्या उत्सुकता निर्माण झाली आहे.तरीत्यांच्या वाढत्या जनसंपर्कामुळे राजकीय चर्चांना उधाण आले आहे. आरोग्य से-वेतील अनुभवाचे राजकीय भांडवलात रूपांतर करण्यात ते यशस्वी होतात काय?याकडे राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागले आहे.

एकीकडे प्रस्थापित राजकीय नेतृत्व, दुसरी कडे नव्या चेहऱ्यांची राजकीय महत्त्वाकांक्षा आणि त्यात डॉ.अशोक थोरात यांची संभाव्य एन्ट्री यामुळे केज अंबाजोगाई विधान सभा मतदारसंघातील आगामी राजकीय लढत अधिक रंगतदार होण्याची चिन्हे दिसत आहेत.

'डॉक्टर दादा' म्हणून परिचित असलेले डॉ.अशोक थोरात आता आरोग्य सेवेच्या अनुभवातून राजकीय सेवेकडे वळणार काय? त्यांच्या राजकीय प्रवेशामुळे केजच्या राजकारणात नवे समीकरण निर्माण होणार काय? या प्रश्नांची उत्तरे आगामी काळात स्पष्ट होतील.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड – ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 (MAHARSHTRA).

दैनिक
समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सद्गुरुनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ७ वे अंक–६९ गुरुवार , दि. १९ नोव्हेंबर २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-7th Issue- 69 THURSDAY, Dt.19 Novmber 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

बालविकासासह ग्रामविकासाच्या उपक्रमांची
जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी रेवगाव येथे अशिमा मित्तल
यांची क्षेत्रभेट माता,अंगणवाडी सेविका व ग्रामस्थांशी साधला संवाद

जालना शेख फारुक : जालना तालुक्यातील रेवगाव येथे जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी क्षेत्रभेट देत गावात राबविण्यात येणाऱ्या विविध विकासात्मक आणि सामाजिक उपक्रमांची पाहणी केली.या भेटीदरम्यान त्यांनी प्रारंभिक बालविकास ईसीडी उपक्रमाचा आढावा घेत माता,अंगणवाडी सेविका,क्षेत्रीय कर्मचारी आणि ग्रामस्थांशी संवाद साधला.प्रारंभिक बालविकास उपक्रमांतर्गत सहभागी मातांच्या घरी भेट देऊन जिल्हाधिकारी मित्तल यांनी त्यांच्या अडचणी, अनुभव आणि उपक्रमातून मिळणाऱ्या मदतीची माहिती जाणून घेतली. तसेच अंगणवाडी केंद्राला भेट देऊन उपक्रमाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचा आढावा घेतला.यावेळी मातांचे मानसिक आरोग्य, स्तनपान, बालसंगोपन आणि बालकांच्या सर्वांगीण विकासात कुटुंबातील सदस्यांची भूमिका या महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा करण्यात आली. गृहभेटींच्या माध्यमातून मातांना मिळणारे मार्गदर्शन भावनिक आधार आणि कुटुंबपातळीवर घडणारे सकारात्मक बदल यांचीही त्यांनी माहिती घेतली.दरम्यान, जिल्हाधिकाऱ्यांनी स्वामी समर्थ केंद्र,आरोग्य उपकेंद्र तसेच प्रगतिशील शेतकरी अनिल पारखे यांच्या शेतीला भेट देऊन तेथील कामकाजाची पाहणी केली. शेतीतील नावीन्यपूर्ण प्रयोग, पर्यावरण संवर्धन आणि ग्रामविकासासाठी स्थानिक पातळीवर सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती त्यांनी घेतली.क्षेत्रभेटीदरम्यान ग्रामस्थांशी संवाद साधताना त्यांच्या सूचना, समस्या आणि अपेक्षा जाणून घेण्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी भर दिला. शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी, लोकसहभाग आणि गावपातळीवर निर्माण होणारे सकारात्मक बदल यांचा प्रत्यक्ष आढावा घेणे हा या भेटीमागील मुख्य उद्देश होता. बालकांचा सर्वांगीण विकास केवळ अंगणवाडीपुरता मर्यादित न राहता त्यामध्ये माता, पिता आणि संपूर्ण कुटुंबाचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा आहे. या दृष्टिकोनातून मातांचे सक्षमीकरण आणि स्थानिक स्तरावरील चांगल्या उपक्रमांना प्रोत्साहन देणारी जिल्हाधिकाऱ्यांची रेवगाव भेट ग्रामविकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरली.



घुंगर्डे हादगावात बिबट्याने
पाडला गायीचा फडशा



घुंगर्डे हादगाव बंडू शिंगटे :- अंबड तालुक्यातील घुंगर्डे हादगाव शिवारात बिबट्याचा वावर पुन्हा वाढला आहे. बुधवारी ता.१८ पहाटे चारच्या सुमारास घुंगर्डे हादगाव शिवारातील गट क्रमांक २१८ मध्ये बिबट्याने चार वर्षांच्या गायीचा फडशा पाडला शारदा दतुसिंग पवार यांच्या मालकीच्या गायीवर झालेल्या या हल्ल्यामुळे शेतकरीवर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मागील एक वर्षापासून घुंगर्डे हादगाव व परीसरातील शिवारात बिबट्याचा वावर वारंवार आढळून येत आहे. यापूर्वीही या परिसरातील बिबट्याने गायी,शेळ्या,व इतर प्राण्यावर हल्ले करून ठार केले आहे.वारंवार घडणाऱ्या या घटनेमुळे शेतकरी व शेतमजूर यांच्यामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सकाळी आणि संध्याकाळी शेतात जाणे शेतकऱ्यांना अवघड झाले आहे.दरम्यान वन विभागाचे अधिकाऱ्यांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली पान २ वर..

राज्यस्तरीय साहित्य संमेलनात शीतल भोईटे यांच्या कवितेने जिंकली रसिकांची मने
राधेच्या काळजातला कृष्ण कवितेला उत्स्फूर्त दाद
जालना जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा



जालना प्रतिनिधी : साहित्याच्या प्रांतात आपल्या प्रतिभेचा ठसा उमटवत बदनापूर तालुक्यातील ढासला येथील शिक्षिका तथा कवयित्री शीतल रामकृष्ण भोईटे यांनी राज्यस्तरीय साहित्य संमेलनात जालना जिल्ह्याचे नाव उंचावले आहे. पनवेल येथील सर्जनशील शब्दवेल साहित्य संघाच्या सहाव्या राज्यस्तरीय शब्दवेल साहित्य संमेलना'त निमंत्रित कवयित्री म्हणून सहभागी होत त्यांनी आपल्या काव्यप्रतिभेने रसिकांची मने जिंकली.श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयात १४ व १५ नोव्हेंबर २०२६ रोजी पार पडलेल्या या साहित्य संमेलनात शीतल भोईटे यांनी राधेच्या काळजातला कृष्ण ही भावस्पर्शी कविता सादर केली.प्रेम,भक्ती आणि भावविश्वाचा पान २ वर..

जालन्याच्या वजाहत शकील अहमद खान
यांना मलेशियाच्या विद्यापीठाची पीएच.डी.
नॅनो मटेरियल्स विषयात संशोधन आंतरराष्ट्रीय स्तरावर जालन्याचा नावलौकिक

जालना शेख फारुक :- जालना शहराचे सुपुत्र तथा प्राचार्य डॉ.शकील अहमद खान यांचे चिरंजीव वजाहत शकील अहमद खान यांना मलेशियातील प्रतिष्ठित युनिव्हर्सिटी ऑफ मलाया या विद्यापीठाकडून नॅनो मटेरियल्स विषयात पीएच.डी. ही संशोधन पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे जालना शहराच्या शैक्षणिक क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. डॉ. वजाहत खान यांचा शैक्षणिक प्रवास जिद्द,मेहनत आणि संशोधनाच्या आवडीचे दर्शन घडविणारा आहे. पीएच.डी.पूर्वी त्यांनी पुणे येथून मेकॅनिकल इंजिनिअरिंगमध्ये बी.ई. पदवी तर बेंगळूरू येथून नॅनो मटेरियल्स विषयात एम.टेक. पदव्युत्तर पदवी संपादन केली. त्यानंतर मलेशियातील नामांकित विद्यापीठातून संशोधन पूर्ण



करीत त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली आहे.त्यांचे वडील डॉ. शकील अहमद खान हे अंकुशनगर येथील मत्स्योदरी महाविद्यालयात प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना येथे इंग्रजी विषयाचे प्राध्यापक म्हणून ३५ वर्षांहून अधिक काळ शैक्षणिक सेवा बजावली आहे. शैक्षणिक आणि संस्कारक्षम वातावरणात घडलेल्या वजाहत खान यांनी मिळविलेले हे यश त्यांच्या कुटुंबीयांसाठी अभिमानास्पद ठरले आहे. या यशाबद्दल माजी मंत्री तथा मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेशभैय्या टोपे संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ.बी.आर.गायकवाड, संस्थेतील सर्व प्राचार्य,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी डॉ. शकील अहमद खान आणि त्यांच्या कुटुंबीयांचे अभिनंदन केले. जालना शहरातील विविध क्षेत्रांतूनही डॉ. वजाहत खान यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांच्या पुढील संशोधन कार्यासाठी आणि उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

प्रभाग क्रमांक ८ मध्ये
विकासकामांचा धडाका
पाणीपुरवठा,ड्रेनेजसह
सी.सी.रस्त्यांच्या कामाचे उद्घाटन



जालना प्रतिनिधी : शहरातील प्रभाग क्रमांक ८ मध्ये नागरिकांच्या मूलभूत सुविधांना प्राधान्य देत विविध विकासकामांचा शुभारंभ करण्यात आला. नगरसेवक दुर्गेश कठोठीवाले आणि नगरसेविका पूजा दिनेश भगत यांच्या नेतृत्वाखाली पिण्याच्या पाण्याची नवीन पाइपलाइन टाकणे, भूमिगत ड्रेनेज व्यवस्था उभारणे तसेच ट्रिमिक्स पद्धतीने सी.सी. रस्त्यांची निर्मिती करणे या महत्त्वपूर्ण कामांचे उद्घाटन करण्यात आले. प्रभागातील नागरिकांना नियमित व सुरळीत पाणीपुरवठा व्हावा, सांडपाण्याचा प्रश्न मार्गी लागावा तसेच अंतर्गत रस्त्यांची दर्जेदार सुविधा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने ही विकासकामे हाती घेण्यात आली पान २ वर..

शेतकरी,कष्टकरी आणि गरजू महिलांसोबत शिवसेनेची दिवाळी
अंबडमध्ये आनंदाच्या शिध्याचे वाटप शेतकरी हेच आमचे कुटुंब
त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणे हीच दिवाळीची खरी भावना -संभाजी गुढे
जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांच्या हस्ते गरजू माता-भगिनींनाशिधा वाटप



अंबड प्रतिनिधी :- दिवाळी म्हणजे केवळ दिव्यांचा उत्सव नव्हे तर समाजातील वंचित गरजू आणि संकटग्रस्त घटकांच्या आयुष्यात आनंदाचा प्रकाश निर्माण करण्याचा सण होय. याच सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवत शिवसेनेच्या वतीने यंदाची दिवाळी दुष्काळग्रस्त शेतकरी,दिव्यांग,वृद्ध, विधवा आणि गोरगरीब महिलांसोबत साजरी करण्यात आली.अंबड शहर शिवसेनेचे शहरप्रमुख संभाजी गुढे यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या आनंदाचा शिधा वाटप उपक्रमामुळे अनेक माता-भगिनींच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले.शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली तसेच शिवसेना उपनेते आमदार अर्जुनराव खोतकर,जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे,भास्कर अंबेकर आणि पंडित भुतेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे म्हणाले की शिवसेनेची दिवाळी यंदा शेतकरी आणि गोरगरीब महिलांना आनंदाचा शिधा वाटप करून साजरी करण्यात आली. समाजातील गरजू घटकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणे हीच शिवसेनेची खरी सामाजिक बांधिलकी आहे. शहरप्रमुख संभाजी गुढे यांनी आपली भावना व्यक्त करताना सांगितले की शेतकरी हेच आमचे कुटुंब आहे.शेतकऱ्यांच्या कष्टाला सन्मान देणे आणि त्यांच्या कुटुंबातील माता-भगिनींच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणे हीच यंदाच्या दिवाळीची खरी भावना आहे.दिवाळी संपली म्हणून शेतकरी आणि गोरगरीब महिलांप्रती आमची जबाबदारी संपणार नाही.त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी शिवसेना कायम त्यांच्या पाठीशी उभी राहील.मदतीचे तोरण हेच शिवसेनेचे धोरण या भावनेतून अंबड शहरातील विविध ठिकाणी शेतकरी बांधव आणि गरजू महिलांशी संवाद साधत त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याचा प्रयत्न करण्यात आला. जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे आणि शहरप्रमुख संभाजी गुढे यांच्या हस्ते आनंदाचा शिधा वितरित करण्यात आला.या उपक्रमातून केवळ मदतीचा हातच नव्हे तर आपुलकीचा आधारही देण्यात आला.या उपक्रमात शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे,प्रवीण पाटील फुके,भालचंद्र भोजने,उपजिल्हाप्रमुख रावसाहेब पवार,शहरप्रमुख संभाजी गुढे,संतोष जेधे,प्रदीप जिवने,युवासेना पदाधिकारी महेश रायकर,अजय शेवाळे,बबलू घुगे, साईराज शेवाळे,कैलास गुडे,संतोष ताजी,दशरथ ताजी,ओसामा



पटेल,मोहित गुडे,नैतिक शेवाळे,मानव गुडे,ओम इंगळे,हरि शेवाळे,वैभव कामटे, भाऊसाहेब जाधव,दत्तू पाचूदे,जुनून गुडे, जुंन शेवाळे,रोहित गुढे यांच्यासह शेतकरी बांधव,गरजू महिला,शिवसेना पदाधिकारी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

..संपादकीय.....

दुष्काळाची वाढती दाहकता शेतकऱ्यांच्या जगण्याचा प्रश्न ऐरणीवर!

पाण्याचा प्रत्येक थेंब अनमोल ठरत असताना प्रशासनाचे नियोजन कुठे हरवले

दुष्काळ हा केवळ पावसाअभावी निर्माण होणारा नैसर्गिक संकटाचा प्रकार नाही तर तो लाखो शेतकरी,शेतमजूर आणि ग्रामीण कुटुंबांच्या जगण्यावर घाला घालणारा गंभीर प्रश्न आहे. आज ग्रामीण भागात दुष्काळाची दाहकता दिवसेंदिवस वाढत असून पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना भटकंती करावी लागत आहे तर दुसरीकडे शेतीसाठी पाणी उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यांत अश्रू आणि मनात भविष्याची चिंता दाटून आली आहे.पावसाने ओढ दिली की सर्वप्रथम संकट कोसळते ते शेतकऱ्यांवर. महागडी बियाणे,खते,औषधे आणि मशागतीचा खर्च करून पेरणी केलेल्या पिकांना पाणी मिळत नाही.पिके डोळ्यादेखत करपू लागतात.शेतकऱ्यांनी कर्ज काढून उभे केलेले पीक हातातून निसटते.वर्षभर कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची आशा असलेली शेतीच संकटात सापडते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी जगायचे तरी कसे हा प्रश्न अधिक गंभीर बनत आहे.दुष्काळाची झळ केवळ शेतकऱ्यांपुरती मर्यादित राहत नाही. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण होतो पाण्याचे टँकर अपुरे पडतात विहिरी आणि बोअरवेल कोरड्या पडतात. महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी मैलोन्‌मैल भटकावे लागते. रोजगाराच्या संधी कमी झाल्याने ग्रामीण भागातील मजुरांचे स्थलांतर वाढते.म्हणजेच दुष्काळ हा संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेला पोखरणारा प्रश्न बनतो.प्रश्न असा आहे की दरवर्षी दुष्काळाचे संकट येणार हे माहीत असतानाही कायमस्वरूपी उपाययोजना का होत नाहीत जलसंधारण,शेततळे,बंधारे,नालाखोलीकरण, पाणी अडवा–पाणी जिरवा,पुनर्भरण योजना आणि सिंचन प्रकल्प यांची प्रभावी अंमलबजावणी का होत नाही कोट्यवधी रुपयांच्या योजनांची घोषणा होते मात्र प्रत्यक्षात गावागावांत पाण्याची समस्या कायम राहते. कागदावरील विकास आणि जमिनीवरील वास्तव यातील अंतर कमी करण्याची वेळ आता आली आहे.प्रशासनाने दुष्काळाकडे केवळ आकडेवारीच्या चष्म्यातून पाहू नये. गावनिहाय पाणीटंचाईचे सर्वेक्षण करून टँकरचे नियोजन, विहिरींचे अधिग्रहण, जनावरांसाठी चारा छावण्या, रोजगार हमीची कामे आणि पात्र शेतकऱ्यांना पीक नुकसानीची मदत तातडीने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.मदत जाहीर करून थांबण्यापेक्षा ती प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचते की नाही, यावर प्रशासनाने लक्ष ठेवले पाहिजे.लोकप्रतिनिधींनीही दुष्काळाच्या काळात केवळ दौरे, पाहण्या आणि आश्वासनांपुरते मर्यादित न राहता शासनदरबारी ठोस पाठपुरावा करणे गरजेचे आहे.पाण्याच्या प्रश्नावर पक्षीय राजकारण न करता सर्वांनी एकत्र येण्याची आवश्यकता आहे.कारण तहानलेल्या माणसाला राजकारण नको तर पाणी हवे आहे. उपाशी जनावराला घोषणा नको तर चारा हवा आहे आणि संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला आश्वासन नको तर प्रत्यक्ष आर्थिक मदत हवी आहे.आज गरज आहे ती दीर्घकालीन जलव्यवस्थापनाची.पावसाचे पाणी गावातच अडवणे, भूजल पातळी वाढवणे उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे आणि शेतीला शाश्वत सिंचनाची जोड देणे, या उपायांना सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. अन्यथा दरवर्षी दुष्काळ येणार पंचनामे होणार मदतीच्या घोषणा होणार आणि पुन्हा पुढील वर्षी तीच परिस्थिती निर्माण होणार, हे दुष्टचक्र कायम राहील.दुष्काळ हा निसर्गाचा प्रकोप असू शकतो; मात्र दुष्काळग्रस्तांना वाऱ्यावर सोडणे ही व्यवस्थेची चूक ठरू शकते. तहानलेल्या गावांना पाणी,संकटग्रस्त शेतकऱ्यांना आधार आणि ग्रामीण जनतेला जगण्याची हमी देणे ही शासनाची जबाबदारी आहे.आता घोषणांचा पाऊस नको तर प्रत्यक्ष मदतीचा ओलावा हवा कारण पाणी नाही तर शेती नाही शेती नाही तर ग्रामीण अर्थव्यवस्था नाही आणि ग्रामीण अर्थव्यवस्था कोलमडली तर देशाच्या विकासालाच मोठा तडा जाईल.

पान १ वरून....

घुंगर्डे हादगावात बिबट्याने

आहे.मात्र,वारंवार होणाऱ्या बिबट्याच्या हल्ल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे.त्यामुळे वन विभागाने या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन घुंगर्डे हादगाव शिवारात तातडीने पिंजरा लावावा आणि बिबट्याचा बंदोबस्त करावा.तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्याला शासनाकडून तातडीने आर्थिक भरपाई द्यावी,अशी मागणी ग्रामस्थातून होत आहे.

प्रभाग क्रमांक ८ मध्ये

आहेत. या कामांमुळे प्रभागातील पायाभूत सुविधांना चालना मिळणार असून नागरिकांची अनेक दिवसांची गैरसोय दूर होण्यास मदत होणार आहे. यावेळी पाणीपुरवठा विभागाचे दासवाड, रघुवीर जैस्वाल, हाजी सलीम सेठ, अश्फाक पटेल, चाँद मणियार, वसंत जैस्वाल, सिद्धू यांच्यासह संबंधित विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी मूलभूत सुविधांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

दिव्यांग बांधवांचे मासिक पेन्शन ५ ते ६ हजार रुपये करा

आ.चंद्रकांत दानवे यांची दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे यांच्याकडे ठाम मागणी



भोकरदन इसरारखान पठाण :- वाढत्या महागाईच्या काळात दिव्यांग बांधवांना मिळणारे मासिक पेन्शन अत्यंत अपुरे पडत असून त्यांचे जीवनमान सुसह्य करण्यासाठी मासिक पेन्शनमध्ये वाढ करून ते किमान ५ हजार ते ६ हजार रुपये करण्यात यावे अशी ठाम मागणी भोकरदन-जाफ्राबाद विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार चंद्रकांत पुंडलिकराव दानवे यांनी राज्याचे दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.मुंबई येथील विधान भवनातून १९ नोव्हेंबर २०२६ रोजी सादर केलेल्या निवेदनात दानवे यांनी दिव्यांग बांधवांच्या विविध प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधले आहे. सध्याच्या महागाईत औषधोपचार, प्रवास, अन्नधान्य आणि दैनंदिन गरजा भागविताना दिव्यांग व्यक्तींना मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत मिळणारे अल्प आर्थिक सहाय्य त्यांच्या गरजा पूर्ण करण्यास अपुरे ठरत आहे. त्यामुळे पेन्शन वाढ ही केवळ आर्थिक मदत नसून दिव्यांग बांधवांना सन्मानाने जगण्याचा अधिकार देणारी गरज असल्याचे दानवे यांनी निवेदनात नमूद केले आहे.केवळ पेन्शन वाढीपुरती मागणी मर्यादित न ठेवता दिव्यांग बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठीही त्यांनी शासनाकडे विविध उपाययोजनांची मागणी केली आहे. दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या निधीचा प्रभावी वापर करावा, पात्र लाभार्थ्यांना घरकुल योजनांचा लाभ वेळेत द्यावा, स्वयंरोजगारासाठी विशेष योजना व सुलभ कर्ज सुविधा उपलब्ध करून द्याव्यात तसेच शिक्षण आणि आरोग्याच्या सुविधा सहज उपलब्ध करून द्याव्यात अशा मागण्यांचाही निवेदनात समावेश आहे.याशिवाय शासकीय योजनांचा लाभ कोणत्याही विलंबाशिवाय थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली आहे.दिव्यांगांना केवळ सहानुभूती नको तर हक्क आणि सन्मान हवा या भूमिकेतून दिव्यांग बांधवांच्या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून मासिक पेन्शन ५ ते ६ हजार रुपये करण्यासह इतर मागण्यांवर शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा अशी विनंती आ. दानवे यांनी दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे यांच्याकडे केली आहे. या मागणीमुळे भोकरदन-जाफ्राबादसह राज्यातील दिव्यांग बांधवांच्या प्रश्नांना पुन्हा एकदा वाचा फुटली असून शासन यावर काय निर्णय घेते, याकडे दिव्यांग बांधवांचे लक्ष लागले आहे.

अत्याचार पीडितांच्या वारसांना सरकारी नोकरीची संधी

२० नोव्हेंबरपर्यंत अर्ज करण्याचे समाजकल्याण विभागाचे आवाहन

जालना प्रतिनिधी : अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत अत्याचारामुळे मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबातील एका पात्र वारसाला शासकीय अथवा निमशासकीय सेवेत नोकरी देण्याची तरतूद करण्यात आली आहे. यासाठी पात्र वारसांनी आवश्यक कागदपत्रांसह २० नोव्हेंबर २०२६ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन समाजकल्याण विभागाने केले आहे.शासनाच्या २० नोव्हेंबर २०२५ रोजीच्या निर्णयानुसार ही सुविधा लागू करण्यात आली आहे. अर्जाचा विहित नमुना शासन निर्णयातील परिशिष्ट-अ मध्ये उपलब्ध असून, अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, जालना यांच्यामार्फत सादर करावा लागणार आहे.मृत व्यक्तीचा पात्र वारस अज्ञान असल्यास सज्ञान झाल्यापासून तीन वर्षांच्या आत अर्ज करण्याची तरतूद आहे. मात्र, निर्धारित मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. त्यामुळे पात्र कुटुंबीयांनी मुदतीपूर्वी अर्ज सादर करावेत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त डॉ. अनिता राठोड यांनी केले आहे.

एसआयआर आणि दुष्काळाच्या प्रश्नावर काँग्रेस ॲक्शन मोडमध्ये

महाराष्ट्र प्रभारी डॉ.प्रसाद,प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांचा झिरपीत बीएलए-स्व नागरिकांशी संवाद



अंबड प्रतिनिधी : मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेचा आढावा घेण्यासाठी महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी डॉ. सिरिवेल्ला प्रसाद आणि प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अंबड तालुक्यातील झिरपी येथे भेट देऊन काँग्रेसच्या बीएलए-२, पदाधिकारी आणि नागरिकांशी संवाद साधला. यावेळी एसआयआर प्रक्रियेत सरकारी बीएलओंकडून अपेक्षित सहकार्य मिळत नसल्याची तक्रार करण्यात आली. तसेच सत्ताधारी पक्षाच्या दबावामुळे पात्र मतदारांची नावे वगळली जाण्याची शक्यता असल्याचा आरोप स्थानिक प्रतिनिधींनी केला. गणेश हामने आणि बबन राठोड यांनी प्रक्रियेदरम्यान येणाऱ्या अडचणी मांडल्या.दरम्यान, झिरपीतील दुष्काळ आणि पाणीटंचाईचा प्रश्नही यावेळी उपस्थित करण्यात आला. ऊस, कापूस, सोयाबीन व फळबागांचे नुकसान झाले असून शासकीय मदत अपुरी असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. जायकवाडीचा कालवा जवळ असूनही सिंचनासाठी पाणी मिळत नाही. सुमारे पाच हजार लोकसंख्येच्या गावाला केवळ एका टँकरने पाणीपुरवठा होत असल्याने ग्रामस्थांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.कोणताही पात्र मतदार मतदानाच्या हक्कापासून वंचित राहू नये, यासाठी मतदार नोंदींची काळजीपूर्वक पडताळणी करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. खासदार डॉ. कल्याणराव काळे, जिल्हाध्यक्ष कल्याणराव दळे, श्याम उमाळकर, राजेंद्र राख, राजाभाऊ देशमुख, डॉ. विशाल धानुरे, प्रभाकर मामा पवार, कल्याण तारडे, श्रीरंग कामेटे, जाकेर डावरगावकर, गणीभाई, गौरी कुलकर्णी यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी व नागरिक उपस्थित होते.

३० नोव्हेंबरपर्यंत मतदार गणना प्रपत्रांचे वितरण व संकलन

२२ डिसेंबरला अंतिम मतदार यादी होणार प्रसिद्ध

एसआयआर प्रक्रियेला १८ नोव्हेंबरपासून सुरुवात

जालना प्रतिनिधी : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्रात मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमाला सुरुवात होत असून, १८ नोव्हेंबरपासून गणना प्रपत्रांचे वितरण आणि संकलन करण्याची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. ही संपूर्ण प्रक्रिया ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असून, त्यानंतर २२ डिसेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.या विशेष पुनरीक्षण मोहिमेंतर्गत अनुपस्थित, स्थलांतरित, मृत तसेच दुबार मतदारांची (एएसडीडी) माहिती संकलित करण्यासाठी गणना प्रपत्रे (इन्युमरेशन फॉर्म) ईसीआयनेट प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात आली आहेत. संबंधित मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी (ईआरओ) ही प्रपत्रे डाउनलोड करून त्यांची छपाई करावी. तसेच प्रपत्राच्या मागील बाजूस परिशिष्ट-ब, परिशिष्ट-क आणि आवश्यक सूचना स्वतंत्रपणे छापून ती मतदारांना वितरित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.दरम्यान, मतदारांना वितरित करण्यात आलेल्या गणना प्रपत्रांच्या पोहोच पावत्यांची स्वतंत्र नोंदवही मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी (बीएलओ) ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. मोबाईलवर व्हॉट्सॲपची सुविधा उपलब्ध असलेल्या मतदारांना पूर्ण भरलेल्या गणना प्रपत्राची प्रत व्हॉट्सॲपद्वारे पाठविण्यात येणार आहे. तर व्हॉट्सॲपची सुविधा नसलेल्या मतदारांना प्रपत्राची पोहोच स्वतंत्रपणे देण्याचेही सूचित करण्यात आले आहे.मतदार यादीतील नोंदी अचूक व अद्ययावत करण्याच्या दृष्टीने ही मोहीम महत्त्वपूर्ण मानली जात आहे. त्यामुळे मतदारांनी गणना प्रपत्रातील माहिती काळजीपूर्वक भरून संबंधित बीएलओंकडे वेळेत जमा करावी, जेणेकरून पुनरीक्षण प्रक्रिया निर्धारित वेळेत पूर्ण होऊन अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करता येईल.

इंदिराजी गांधी यांच्या जयंतीनिमित्त जालना जिल्हा काँग्रेसच्या वतीने अभिवादन

काँग्रेसचे राज्य प्रभारी डॉ.सिरीवेल्ला प्रसाद,प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची उपस्थिती

जालना प्रतिनिधी :- देशाच्या राजकारणात कणखर नेतृत्व,धाडसी निर्णयक्षमता आणि राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान,भारतरत्न स्वर्गीय इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त जालना जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने अभिवादन करण्यात आले. जिल्हा काँग्रेस कमिटी कार्यालयात इंदिराजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवरांनी त्यांना आदरांजली वाहिली.यावेळी इंदिरा गांधी यांनी देशाची



एकता, अखंडता आणि सार्वभौमत्व अबाधित राखण्यासाठी घेतलेले धाडसी निर्णय तसेच राष्ट्रच्या विकासासाठी दिलेले योगदान यांचे स्मरण करण्यात आले. प्रतिकूल परिस्थितीतही ठाम भूमिका घेण्याचे धैर्य आणि देशहितासाठी केलेला त्याग हा त्यांच्या नेतृत्वाचा विशेष गुण होता. त्यांचे विचार, कार्य आणि राष्ट्रसेवेचा वारसा आजही नव्या पिढीला प्रेरणा देणारा असल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.या कार्यक्रमाला महाराष्ट्र काँग्रेसचे राज्य प्रभारी डॉ. सिरीवेल्ला प्रसाद, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खासदार डॉ. कल्याण काळे, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष कल्याण दळे, प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख, अल्पसंख्याक विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष बदर चाऊस, राजाभाऊ देशमुख, महानगराध्यक्ष डॉ. विशाल धानुरे, जिल्हा सरचिटणीस शांतीलाल बनसोडे, राजाभाऊ कुलकर्णी, तालुकाध्यक्ष कृष्णा पडुळ, अजय बनकर, विवेक घरे, भागवत घाटे, सुनील चौधरी, राम कु-हाडे, अशोक उबाळे, दिग्विजय धांडगे यांच्यासह काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.इंदिराजींच्या स्मृतींना अभिवादन करत त्यांच्या विचारांचा आणि राष्ट्र सेवेच्या कार्याचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प यावेळी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

सावंगीतील ह.भ.प.देवेंद्र चैतन्य स्वामींच्या मृत्यूचे गूढ उकलणार का?

मृत्यू प्रकरणाची सखोल चौकशी करा ग्रामपंचायत व ग्रामस्थांचे उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांना निवेदन

भोकरदन इसरारखान पठाण :- सावंगी अ.येथील ह.भ.प.देवेंद्र चैतन्य स्वामी उर्फ दौलतगिरी महाराज यांच्या आकस्मिक मृत्यूने संपूर्ण गावात शोककळा पसरली असून या घटनेबाबत विविध चर्चांना उधाण आले आहे. महाराजांच्या मृत्यूमागील नेमके कारण स्पष्ट व्हावे आणि घटनेची सत्य परिस्थिती समोर यावी, यासाठी ग्रामपंचायत व समस्त ग्रामस्थांनी पोलीस प्रशासनाकडे सखोल आणि निष्पक्ष चौकशीची मागणी केली आहे.यासंदर्भात बुधवार दि.१८ नोव्हेंबर रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी भोकरदन यांना निवेदन देण्यात आले.तसेच पारध पोलीस ठाण्यातही ग्रामस्थांनी एकत्र येत निवेदन सादर केले.निवेदनातील माहितीनुसार रविवार दि. १५ नोव्हेंबर रोजी सकाळी सहा वाजेच्या सुमारास पाताळेश्वर महादेव मंदिराजवळील खोलीत ह.भ.प.देवेंद्र चैतन्य स्वामी उर्फ दौलतगिरी महाराज यांचा मृतदेह आढळून आला.या घटनेने गावकऱ्यांना मोठा धक्का बसला असून महाराजांच्या मृत्यूबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.महाराज असे पाऊल उचलू शकत नाहीत ग्रामस्थांची भूमिका महाराजांना गावातील सर्व जाती-धर्मातील नागरिकांकडून आदराचे स्थान होते.त्यामुळे त्यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले असावे यावर ग्रामस्थांनी शंका व्यक्त केली आहे.ही घटना नेमकी आत्महत्या आहे की त्यामागे अन्य काही कारण अथवा घातपात आहे याचा तपासातून उलगडा व्हावा अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. प्रकरणातील प्रत्येक बाबीची बारकाईने तपासणी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी.तपासात कोणाचाही दोष आढळल्यास संबंधितांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी अशी मागणी



ग्रामस्थांनी केली आहे. पोलिसांनी अफवांना आळा घालून सत्य परिस्थिती स्पष्ट करावी अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. निवेदन देतेवेळी सरपंच बागवान अरबाज अब्दुल मन्नान,उपसरपंच नकुल गणेश फुसे,ग्रामविकास अधिकारी ए.आर.काकडे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य आणि सर्व समाजांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आता पोलीस तपासाकडे ग्रामस्थांचे लक्षमहाराजांच्या मृत्यूचे नेमके कारण काय या प्रश्नाचे उत्तर निष्पक्ष पोलीस तपासातूनच समोर येणार आहे.त्यामुळे या प्रकरणाचा गांभीर्याने तपास करून सत्य जनतेसमोर आणण्याचे मोठे आव्हान पोलीस प्रशासनासमोर आहे. महाराजांना न्याय मिळावा आणि गावातील संभ्रमाचे वातावरण दूर व्हावे अशी अपेक्षा सावंगी ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.